# माणूस

शनिवार । ३० ऑगस्ट १९८०

एक रुपया


## वांझोट्या बुद्धिवादाला विवेकवादाने दिलेले उत्तर

पृष्ठ....९



**शिवाय :** शेतमजुरांनी माळरानावर फुलवलेल्या एका वसंतऋतूची राजकारण्यांनी केलेली वाताहत पृष्ठ....२

# सप्रेम नमस्कार....

¤ आपला १९ जुलैचा 'विशेष' अंक वाचला. वेगवेगळे उपक्रम घडवून आणण्यात व ते यशस्वी करण्यात आपला नेहमीच हातखंडा असतो. 'एक लेखकी अंका' ची जाहिरात वाचूनच मला विजय परुळकराची आठवण झाली. एक सर्वांगसुदर, विविधतेने नटलेला असामान्य अंक वाचायला मिळणार म्हणून या अंकाची वाट पहात होतो; परंतु जे काही वाचावयास मिळाले त्यास 'काही विशेष' म्हणणे कठीण आहेच; पण सामान्य लिखाणातला प्रामाणिक भाबडेपणा-सुद्धा नाही !

अगदी सुरुवातीचे र. वि. सोमणांचे पत्रा-पासून या अंकाच्या वैशिष्टचाला गालबोट लागले आहे. श्री. वा. दा. रानडेंसारख्या दर्जेदार इतिहासलेखकाने 'कै. सजय गांधीवर खालच्या पातळीवर येऊन, संयम सोडून आरोप करावेत व केवळ कपोलकल्पित स्वत:च्या कल्पनावर आधारित टीका करावी हे योग्य नव्हे,' असे सोमणाचे प्रामाणिक मत; त्यानी त्याच्या पत्रातून जाहीर केले. श्री. वा. दा. रानडयाचा लेख वाचून माझेही हेच मत झाले होते.

बरे, या पत्रातील 'धूसरपणा' कमी कमी करण्यासाठी आपण सतीश कामत याचा 'एक लेखकी' अंक आमच्या हातात दिला. धूसरपणा कमी करणे सोडाच; पण राजकीय अंधारात कोठे काडीही त्यांनी ओढलेली दिसत नाही !

प्रस्तुत लेखकमहोदय संजय गाधीचे मोठेपण, नेतृत्व, कर्तृत्व स्वत: मान्य करीत नाही, लोकानी केलेले त्यांना सहन होत नाही. उलट सजय गाधीबद्दलच्या विकृत कल्पना क्षणोक्षणी उफळून येतात. असा 'माणूस' संजय गांधीबद्दल, त्याच्यानंतरच्या दिल्लीबद्दल काय लिहिणार ? यापेक्षा त्यांनी का लिहावे हाच प्रश्न पडतो. गेल्या-नंतरही हा माणूस नगण्य होता, नेतृत्व वगैरे काही नव्हते, हे भासविण्यातला आनंद त्याना होत नाही ना असे वाटते.

त्या रटाळ मुलाखती काय वर्णाव्यात ? स्पष्ट दिशा, स्पष्ट ध्येय कोणापुढेही नाही ! ज्यांनी संजय गाधीना जवळून बघितले उदा. खा. अबिका सोनी, त्यानी त्याचे कर्तृत्व मान्य केले आहे; परंतु तेथून कामतानी काढता पाय घेतला आहे व पिलू मोदीच्या कोठीवर इंग्रजीचे कौतुक करण्यात वेळ खर्च केला आहे !

या अंकात आम्हाला संजय गाधी दिसले नाहीत, त्याच्यानतरची दिल्लीही दिसली नाही. दिसली ती प्रवासी दिल्ली ! दिल्लीत रिक्षाला स्कुटर म्हणतात, तेथे छकडाही मिळतो, त्याचे भाडे स्वस्त आहे, कुल्फी, चना, भटोरा रस्तोरस्ती छान मिळतो, संसद-भवनाच्या बाजूला पोस्टर्सचे युद्ध चालते, रस्ते रुंद आहेत, आयलंड्स खूप सुदर आहेत – करोलबाग हे एक चागले मार्केट आहे, दिल्लीत हिरवळ छान आहे, लोक-सभेचे कँटीन वातानुकूलित आहे, तेथील वेटर पुण्यासारखे वागतात इत्यादी सर्व प्रवासी माहिती कामतांनी पुरवली. दिल्लीत गेल्यास हा अंक मी नक्कीच जवळ ठेवणार आहे !

हो, अजून एक गोष्ट महत्त्वाची कळली. ती म्हणजे माननीय सतीश कामत एम्. ए. वुइथ इंग्लिश आहेत. पिलू मोदीना पचेल इतके सफाईदार इंग्रजी ते बोलू शकतात. म्हणून मला वाटते त्यानी आमच्या 'माणूस' साठी काम करण्यापेक्षा राजा ट्रॅव्हल्ससाठी काम करणे तमाम जनतेच्या हिताचे होणार आहे. याबाबतीत ते लाखोचे नेतृत्व करू शकतील. खूप माहिती व छान इंग्रजीची खरी तेथे गरज आहे.

कै. संजय गांधीचे मोठेपण मार्च ७७ च्या आधी व फेब्रुवारी ८० च्या नंतर, काहीही असो, परंतु मधल्या काळात ज्या हिमतीने, राज्यसत्तेचा आधार सोडा; पण खाऊ की गिळू पहाणारे सरकार दिल्लीत असताना त्यानी निर्भय सामना दिला, त्यात आहे ! निर्भयता 'माणूस'ची असो की खा. संजय गांधीची असो, ती मानली पाहिजे असे माझे नम्र मत. त्याबद्दल त्यांच्या मृत्यूनंतर अवाक्षर नाही. हा कसला विशेष अंक ?'

आज संजय गांधी जगात नाही. ते ज्यांना हवे होते व ज्याना नको होते त्यांचा मतांचा अर्थ संपला आहे. 'मारुती मोटर्स' हे प्रकरण फसलेही असेल, परंतु त्यांची भरारी या देशास दिशा दाखवून गेली आहे. प्रत्येकाच्या जीवनात सर्वच यश नसते; कोठे दारुण परा-भवही असतो. केवळ पराभवाचे मूल्यमापन करून 'माणूस' समजत नाही. आज असलेले सर्व मोटारकारखानदार मोटारतंत्रात निष्णात नाहीत. हा व्यवहार न कळणारे असंख्य तंत्रज्ञ तरुण आहेत !

तसेच भारतभर लाखो, कोटचवधी तरु-णांची मने काबीज करून ढोबळमानाने का होईन युवाशक्तीस दिशा देणारा तरुण (खा. दंडवत्यांच्या मते मनाने तरुण) आज पैदा होण्याची खरी गरज आहे. कोणत्या पक्षाचा हा प्रश्नही गौण आहे. कोणाचा पुत्र, कोणाचा बाप हा फार खालच्या पातळीचा वाद झाला. संकटात तो वागतो कसा हा प्रश्न आहे. संजय गाधी केवळ इदिरा गांधीचे पुत्र असते तर मधल्या काळात त्यानी घर सोडले नसते. निर्भयतेने घर सोडले हाच त्यांचा पुरुषार्थ आहे !

'माणूस'ची मते काहीही असोत मी माणूसचा चहाता आहेच ! एक अक पटला नाही म्हणून आम्ही 'माणूसकी' सोडणार नाही! शेवटी एकच सांगतो. तुम्ही स्वीकार-लेल्या राजकीय मतामुळे 'माणूस' मोठा नाही. तुमच्या नि:स्पृह मताचा चहाता महा-राष्ट्रभर आहे त्याच्या विचारावर कधी बलात्कारही होतो. टाळता येत नाही म्हणून ते एंन्जॉय करतात इतकेच !

कै. संजय गाधी नंतरची दिल्ली—ती पाहिली नाही; परंतु सतीश कामत नंतरची दिल्ली मला स्पष्ट दिसत आहे ! ही दिल्ली कमी विकृत, मनाने स्वच्छ व कमी पूर्वग्रह-दूषित आहे !

२० जुलै नि. म. आव्हाड, नासिक


## साप्ताहिक माणूस

वर्ष : विसावे

अंक : तेरावा

३० ऑगस्ट १९८०

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरवरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

# जातीयवादाचे आव्हान

वा. दा. रानडे

मोरादाबादपासून सुरू झालेला जातीय दंगलीचा वणवा आता शमला असला तरी तो पुन: केव्हा, कोठे धुमसेल व आणखी कोठें पसरेल हे सागता येणार नाही. जातीय दगलीच्या मुळाशी असणारी जातीयवादाची विषवल्ली मुळासकट पूर्णपणे उखडून टाकली जात नाही तोपर्यंत या दंगली मधूनमधून धुमसत राहणारच. जातीयवादावर आम्ही मात का करू शकलो नाही याचा या अनुषंगाने पुन: एकदा अतर्मुख होऊन विचार करायला हवा.

तात्कालिक आणि दीर्घकालीन अशा दोन्ही दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पहायला हवे. एकाच दिवशी अनेक ठिकाणी दंगली होतात यामागे काही पूर्वनियोजित आखणी किंवा कट असावा काय ? तसा संशय केंद्रीय गृहमंत्री झैलसिंग यानी व्यक्त केला आहे. देशात पुन: आणीबाणी आणण्यासाठी निमित्त मिळावे म्हणून हेतुपूर्वक दंगली घडवून अशातता निर्माण केली जात आहे अशा स्वरूपाचे आरोप भाजपचे नेते करीत आहेत. आसाम समझोत्याकडून दुसरीकडे लक्ष वेधण्यासाठी या दंगली घडवून आणण्यात आल्या असाही एक आरोप आहे. काश्मीरमध्ये पाकधार्जिण्या शक्तींच्या हालचाली चालू आहेत. अंतर्गत प्रश्नापासून दुसरीकडे लक्ष वेधण्यासाठी पुन: एकदा भारत-पाक-संघर्ष घडवून आणण्यासाठी दोन्ही देशातल्या काही शक्ती पाउले टाकीत आहेत काय अशीही शंका व्यक्त केली जात आहे. दंगलीमागे परकीय पैशाचा प्रभाव आहे. सौदीअरेबिया, लिबिया, पाकिस्तानातून येथील मुस्लीम जातीयवादी संघटनांकडे पैसा येत आहे अशाही बातम्या आहेत. बेकायदा चोरट्या शस्त्रांची आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे. एकट्या मोरादाबाद शहरात इंग्लडपेक्षा जास्त शस्त्रे असल्याची बातमी बोलकी आहे. या साऱ्या हालचालींची सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांना, अधिकाऱ्यांना आगाऊ काहीच कल्पना नव्हती का ? मोरादाबादमध्ये तणाव वाढत असल्याबद्दल अधिकाऱ्यांनी आगाऊ कल्पना दिलेली होती असे सागण्यात येत आहे. जागरूक राहून वेळीच उपाय योजले असते तर दगलीचा डोंब पेटला नसता. सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांचा, अधिकाऱ्यांचा गाफीलपणा व अकार्यक्षमता हे सध्याच्या दंगलीचे तात्कालिक कारण आहे व त्यावर तात्कालिक उपाय आता योजले जात आहेत.

पण प्रश्न तात्कालिक नसून दीर्घकालीन आहे व त्याला कायमचा आळा घालण्यासाठी सर्व बाजूनी विचार करून दीर्घकालीन उपाययोजना करायला हवी आणि ती जीवनाच्या सर्व क्षेत्रात विचार आणि कृती या दोन्ही पातळीवर हवी. येथे जातीयवादाच्या विचारात भिन्नधर्मीयातील संघर्षाप्रमाणेच भिन्न जातीमधील संघर्षाचाही समावेश आहे. ब्रिटिशपूर्वकाळ, ब्रिटिशकाळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ अशा तीन टप्प्यानी या प्रश्नाचा विचार करायला हवा. हिंदु-मुस्लीम प्रश्न मुस्लिमांच्या स्वाऱ्या या देशात सुरू झाल्यापासून निर्माण झालेला आहे, तर हिंदुधर्मातील जातीयवाद जाती-पोटजातीच्या स्थापनेपासून निर्माण झालेला आहे. स्वाऱ्या करणाऱ्या मुस्लिम सुलतानांनी केलेले अत्याचार, हिंदु मंदिराचा विध्वंस, सक्तीचे धर्मांतर हा मुस्लिमाबद्दल हिंदु समाजाचा पहिला अनुभव, पुढे मोगल राजे भारतातच स्थायिक झाले आणि दोन्ही समाजाच्या संस्कृतीचा एकमेकांवर प्रभाव पडून एक मिश्र संस्कृति विकसित झाली. विविध जाती व धर्मांच्या लोकांचा हा देश असून धर्माधिष्ठित राष्ट्रवादावर येथील राष्ट्रवादाची उभारणी करता येणार नाही. कॉंग्रेसच्या रूपाने या देशात सर्व जाति-धर्मांचे लोकाना सामावून घेणारी धर्मनिरदेक्ष राष्ट्रवादी चळवळ उभी राहिली. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविरोध किंवा धर्माचा अभाव नव्हे तर सर्व धर्म समान 'सेक्युलर' या इंग्रजी शब्दाचे भाषातर म्हणून 'निधर्मी' हा चुकीचा शब्द वापरला गेल्याने जे गैरसमज निर्माण झाले आहेत ते प्रयत्नपूर्वक दूर करायला हवेत. देव व धर्मविरुद्ध कट्टर मोहीम रशियात कम्युनिस्ट क्रातीच्या सुरुवातीच्या काळात हाती घेण्यात आली होती; पण अनुभवाने त्यांचीही धर्मविषयक भूमिका बदलत गेली आहे. धर्मोपासना ही वैयक्तिक बाब मानली जावी. सार्वजनिक जीवनात तिचा हस्तक्षेप नको आणि धर्माविरुद्ध कट्टर मोहीम हाती घेण्याची आवश्यकता नाही असा तेथील सध्याचा विचारप्रवाह आहे आणि धर्माबाबत हाच योग्य दृष्टिकोन होय. प्रत्येकाला त्याच्या श्रद्धेनुसार उपासना करण्याचा हक्क असला पाहिजे, हे तत्त्व सर्वमान्य झाले पाहिजे.

धार्मिक संघर्षाचा विचार करताना प्रामुख्याने डोळ्यांपुढे येणारा प्रश्न म्हणजे बहुसख्य आणि अल्पसंख्य याचे संबंध. भारतात हिंदू बहुसंख्य आणि मुस्लीम व इतर धर्मीय अल्पसंख्य आहेत. संघर्ष मुख्यत: हिंदु–मुस्लिमात आणि सवर्ण व हरिजन याच्यातच झालेले आहेत. बहुसंख्य हिंदू आपल्या बहुसंख्येच्या बळावर तुमच्यावर वर्चस्व गाजवितील अशी भीति राष्ट्रीय चळवळीत फूट पाडण्यासाठी ब्रिटिशानी मुस्लिम समाजाच्या मनात हेतुपूर्वक निर्माण केली आणि मुस्लिमांना राष्ट्रीय चळवळीपासून दूर ठेवण्यासाठी मुस्लीम लीगची स्थापना ब्रिटिश राज्यकर्त्यांच्याच प्रेरणेने झाली. मुस्लीम लीगची प्रतिक्रिया म्हणून हिंदुमहासभेची स्थापना झाली. मुस्लीम जातीयवाद ब्रिटिश प्रोत्साहनाने फोफावला व त्याचे पर्यवसान अखेर देशाच्या फाळणीत झाले !

पाकिस्तानच्या स्थापनेनंतर हिंदु–मुस्लीम संघर्ष मिटेल अशी आशा नेहरू–पटेलाना वाटत होती ती फोल ठरली. दोन जमातीच्या या सघर्षाला दोन देशांच्या संघर्षाचे स्वरूप आले. एवढेच नव्हे तर भारतात हिंदु–मुस्लीम संघर्ष व दंगे मधूनमधून चालूच राहिले ! बहुसंख्य मुस्लीम समाज राष्ट्रीय प्रवाहापासून दूरच राहिला. हिंदुवर्चस्वाच्या त्याला वाटणाऱ्या भीतीचा फायदा मुस्लीम जातीय-

वादी नेत्यांनी आपले बळ वाढविण्यासाठी करून घेतला आणि निवडणुकीत त्यांच्याशी युती करून आमच्या राजकीय पक्षानी या जातीयवादाला खत पाणी घातले. जनसंघ, हिंदुसभा यासारखे कट्टर हिंदुत्वनिष्ठ पक्ष सोडले तर कांग्रेसपासून कम्युनिस्टांपर्यंत सर्व पक्षांनी मुस्लीम लीगशी युती करून मुस्लीम जातीयवाद पोसण्यास मदत केली. या प्रवृत्तीने जातीयवादाचे निर्मूलन होणार कसे ?

जातीयवादी प्रवृत्तीविरुद्ध जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रखर लढा द्यावयास हवा. तात्पुरत्या फायद्यासाठी जातीयवाद्यांशी तडजोड करायची नाही, हे पथ्य स्वतःला धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादी म्हणणाऱ्या सर्वच पक्षांनी पाळायला हवे. मुस्लीम व इतर अल्पसंख्याकांच्या न्याय्य हक्कांचे व हितसंबंधाचे रक्षण होईल; पण त्याचबरोबर बहुसंख्य हिंदूचे हक्क व हितसंबंध यांना ज्यामुळे बाध येईल अशा कोणत्याही गोष्टी मान्य केल्या जाणार नाहीत हेही स्पष्ट करण्यात आले पाहिजे. धर्म प्रत्येकाने आपल्या घरी त्याच्या श्रद्धेप्रमाणे पाळावा; पण राजकारणात व सार्वजनिक जीवनात धर्माचा हस्तक्षेप चालू दिला जाणार नाही. तेथे जनहित लक्षात घेऊनच बहुमताने निर्णय घेतले जातील. अल्पसंख्याकांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात योग्य संधी मिळते की नाही याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाईल आणि बहुसंख्य समाज केवळ आपल्या बहुसंख्येच्या बळावर सर्व जागा आणि संधी बळकावून बसणार नाही हेही पाहिले जाईल. असे धोरण अमलात आणल्यास संघर्षाला व कटुतेला जागा राहणार नाही. अल्पसंख्याकाना न्याय देताना त्याना वाजवीपेक्षा जास्त सवलती देऊन त्यांचा अनुनय करण्याचीही प्रवृत्ती टाळायला हवी. राष्ट्रीय एकात्मतेचा नुसता शाब्दिक घोष न करता ती कृतीत दिसायला हवी. □

डॉ. पॉवलो कॅरीनोच्या विचारांचा सारांश ....

# पांचवा वर्ण, पुरुष, पैसा इत्यादी....

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी

आमच्या नशिबी परदेशयोग असल्याचे गेली १२ वर्षे ऐकत आल्यावर प्रत्यक्ष जाण्याचा 'सिंहस्थ' योग अजून तरी आलेला नाही. परंतु आमचे मित्रगण परदेशात जातात, काही स्थायिक होतात. शेवटी दुसऱ्याच्या प्रवासात आपला प्रवास सामावून समाधानाची सवय अंगवळणी एवढी पडली आहे की, अजून महाराष्ट्रातला एकही जिल्हा पुरता पाहिलेला नाही. थोडं (का बरच) विषयांतर झाले, पण तो व्यावसायिक अंगाचा अवयव आहे. असो.

परका रोमहून युनेस्कोशी संबंधित कुठल्याशा कचेरीत कर्मचारी असणाऱ्या एका मित्राचे पत्र आले. ते पत्र नव्हते, प्रवचन होते. कुठल्याशा विचारगोष्टीत (सिपोसियम) भारतासंबंधी जे काही. आमच्या मित्राच्या सहचाऱ्यानी खाजगीत चर्चिलेल्याचा तो अहवाल होता. चर्चिलेले विषय साधारणपणे असे होते.

भारतातील कुटुंबनियोजन, स्त्री–पुरुष–संबंध (बलात्कार) पोलीस, बेकारी वगैरे.

एक इटालियन – (सध्या न्यूयॉर्कमध्ये राहणारा, अहमदाबाद विद्यापीठात दोन वर्षे राहून गेलेला) डॉ. प्रा. पॉवलो कॅरीनो हे जास्त बोलले. आमचा मित्र डॉ. जॉन मार्क भारतावरील टीकेने हुळहुळून 'डिफेन्सिव्ह' पोज घेऊन होता. एकूण चर्चेचा साराश.

१ : भारतातील बेकारीच्या संदर्भात नोकरी ही भारतात एक प्रकारची 'मिरास' (प्रॉव्हिलेज) मानली जावी. म्हणून तिची मर्यादा २५ वर्षांपेक्षा जास्त नसावी. २५ वर्षे नोकरी केलेल्या माणसांना खुषीने वा सक्तीने निवृत्त करावे. उशीरा विवाह हा भारतीय संस्कृतीशी विसंगत आहे. तेव्हा विवाह लवकर होण्यास परवानगी देण्याचे दोन फायदे होतील.

२ : उपरोक्त २५ वर्षांची नोकरीची कालमर्यादा पूर्ण होईपर्यंत व्यक्तीची मुले हाताशी येतील. हल्ली ३०–३२ व्या वर्षी लग्न करण्याच्या पद्धतीने ५८ वर्षापर्यंत मुलगा हाताशी येईल याची खात्री नसते.

३ : विवाह लवकर करण्यास परवाना दिला तरी मुलांच्या संख्येवर सक्त नियंत्रण– दोनपेक्षा अधिक नाही अशी व्यवस्था असावी.

४ : भारतात विवाहपूर्व लैंगिक संबंध, कुमारी माता इ. घटना मान्य होणे शक्य नसल्याने लैंगिक दडपणे, कोंडी व कोंदट वातावरण कमी करण्याच्या दृष्टीने लैंगिक आरोग्य व वातावरण टिकविण्याचे दृष्टीने बाल नव्हे तरुण–विवाह रूढ होण्यात वाईट नाही.

५ : अमेरिकेत शारीरिक शिक्षणाच्या तासाला हल्ली गर्भार मुलींना (नववी–दहावीकरता)–शिशुसंगोपनाचे शिक्षण देण्याची पाळी येऊनही लोकसंख्येचा स्फोट झालेला नाही. विवाहाचे वय आणि अल्प संख्या यांची सांगड घालण्यात शास्त्रीय तथ्य नाही.

६ : पॉवको कॅरीनोच्या मते भारतासारख्या देशात विवाहसमयी स्त्रीच्या कौमार्याला मोठे महत्त्व दिल्याने लैंगिक दलदल निर्माण होण्याची खात्री वाटते. विवाहाचे वय वाढते पण लैंगिक शक्ती कोंडून राहते. ते 'प्रेशर' वाढून क्वचित प्रसंगी बलात्कारा-

साख्या लैंगिक विकृतीतून ते अभिव्यक्त होते. मानव हा सृष्टीतील एकमेव प्राणी आहे की, जो सामाजिक यम-नियम व नियमतात अडकून राहिल्याने वयात येऊनही लैंगिक कृती करू शकत नाही. उदा. १४ व्या वर्षी वयात येणाऱ्या तरुणीला विवाह होई-पर्यंत ४ ते १२ वर्षे 'ॲब्सटिनन्स' पाळावे लागते.

७ : भारतासारख्या देशात तरुण-तरुणी (गेली ३०-४० वर्षे स्त्री-पुरुष सहशिक्षण असूनही) मोकळेपणाने व्यक्ती म्हणून (नर-मादी म्हणून नव्हे) एकत्र येऊ शकत नाहीत. हजारो सण-उत्सवांच्या या देशांत जरी स्त्री-पुरुष एकत्र (वावरताना) दिसले तरी मनाने ते वखवखलेलेच राहतात व चोरटे चिमटे व स्पर्श व चावट शब्दोच्चा-राच्या तालावर त्याना तहान भागवावी लागते.

८ : बलात्काराच्या कारणात पोलिसी बेपर्वाई, सिनेमा, उत्तान पोशाख याहून सांस्कृतिक परंपरा बलिष्ठ आहेत. विशेषत: ग्रामीण भागात (वाचा : गोदूताई परुळेकरांचे 'जेव्हा माणूस जागा होतो.') पूर्वी जमीन-दार हक्काने मजुराच्या बायका भोगत असे; ते हल्ली नवीन जागृती-जाणीवेमुळे 'भोग' किंवा चोरटा सक्तीचा मामला ठरण्याऐवजी बलात्कार ठरतात !

९ : भारतातील जातीय म्हणजे विषम समाजरचनेचा उपसर्ग पोलीस खात्याला लागणे अपरिहार्य ठरते. तेव्हा आपल्या 'खालच्या' किंवा 'वरच्या' जातीची स्त्री मटकावता आली तर पोलिसी डोके एक प्रकारच्या जातीय समाधानाने तुटून पडतात. उदा. खालच्या जातींना मिळणाऱ्या सवल-तींचा संताप म्हणून व उच्च जातींवरचा तुंबलेला सूड उगविण्याची संधी म्हणून ! म्हणजे चातुर्वर्ण्यव्यवस्थेत 'स्त्रिया' हा अन्याय करण्यासाठी पाचवा वर्ग उपलब्ध झाला आहे. बलात्कार, ही विकृती एक प्रकारचे विद्रोही-सूडकरी वर्तन असल्याने; तो करताना केवळ 'प्रतिशोध' ही भावनाही प्रबळ असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारताच्या तुलनेने 'बलात्कार' 'वेश्या-वृत्ती' ह्या गोष्टी पाश्चात्य समाजात कमी गंभीर व निंद्य आहेत. रोममध्ये वाढत्या बलात्कारप्रसरणामुळे पोलिसांनीच म्हणे 'बेअर इट विथ ए ग्रीन' (दात विचकून सोसा !) असा सल्ला स्त्रियाना दिला आहे. कारण प्रतिकार करताना शारीरिक हल्ले होण्याची वा विद्रूप होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

'बलात्कार' हा गांजा, चरस, मारी-हुवानाप्रमाणे एक लैंगिक 'किक्'चा (तुर-तरी) प्रकार आहे. ज्या देशात नॉर्मल लैंगिक संबंध स्त्री-पुरुषात नाहीत (भारतात दड-पण-वातावरणामुळे व पाश्चात्य देशांत मोकाटपणामुळे) तिथे बलात्कारासारखे प्रकार रुचिपालट म्हणून वापरले जाणे असंभवनीय नाही. पाश्चात्य देशात 'वाइफ स्वॅपिंग' (बायका बदलणे) वयात न आलेल्या बालिकांशी संभोग, समसंभोग आदी प्रकार विवाहापूर्वी एवढे बोकाळल्याने प्रत्यक्ष विवाह केल्यानंतर तरुण-तरुणींना परस्प-राच्या शरीराचे आकर्षण काय उरणार ? बालविवाह किंवा जुन्या भारतीय विवाहात शरीराकर्षण हा महत्त्वाचा फॅक्टर होता, इकडे हल्ली कानाडोळा होतो. अशा वेळी शक्य आहे त्यांनी 'योग्य' वेळी विवाह करून एक-दोन मुले झाल्यानंतर निरामय वैवाहिक जीवन जगणे हा लैंगिक दडपण दूर करण्याचा मार्ग ठरू शकतो. स्विंगिंग हा प्रकार विवाह व कुटुंब म्हणजेच स्त्री-पुरुष-संबंधाचा प्रमुख शत्रु आहे.

१२ : बर्ट्रंड रसलेनी ज्या समाजात लैंगिक दडपणे अधिक तो समाज सर्वच दृष्टींनी बाझोटा ठरतो अशा अर्थाचे विधान केल्याची त्याच्या आत्मचरित्रात नोंद आहे. भारतीय समाजातील लैंगिक दडपणे कमी होण्याची शक्यता नसल्याने बहुतेक स्त्रीपुरुष स्वत:ला कथा-कादंबऱ्या व सूचक-भडक चित्रपटातील पात्रे समजून प्रत्यक्ष जीवनातही व्यवहार करतात. शरीराने केलेले प्रमाद दुरुस्त होऊ शकतात; पण मनांची जर भूमिगत ड्रेनेजेस् झाली तर लैंगिक गुन्ह्यांची वाढ व स्त्रीचा दर्जा घसरणे अपरिहार्य ठरते.

१३ : वैवाहिक वा कौटुंबिक सुखाची भरपाई करण्यासाठी पैसा व भौतिक सुखे पुढे येतात. हल्ली पेन्शन मिळालेले देखील नोकऱ्या शोधताना दिसतात ! भारत सर-कारने साठी उलटलेल्यांना नोकरी करण्यास (व्यवसाय नव्हे) बंदी घातली पाहिजे ! ४४ वी वा ४५ वी घटनादुरुस्ती सत्कारणी लागून तरुण दुवा देतील.)

१४ : हल्ली स्त्रियांच्या नोकऱ्यांविरुद्ध (विशेषत: नवरा-बायको दोघेही नोकऱ्या करत असतील तर) बराच ओरडा चालू आहे. जगातील दरिद्री देशात हा ओरडा नैसर्गिकही आहे; पण ग्रामीण भागात शेकडो वर्षांपासून लक्षावधी स्त्रिया श्रमतात-कष्टांचे प्रचंड डोंगर उपसतात, त्याविरुद्ध कोणाची तक्रार दिसत नाही. तक्रार 'कापडी' किंवा इस्त्रीच्या नोकऱ्याविरुद्ध आहे. (युरोप-अमे-रिकेत तरुण कोणतेही काम करण्यास तयार असतात.) शहरी शिक्षित मुलींचा ओढा व लोंढा दिखाऊ नोकऱ्यांकडे (कारकून, मास्तरणी इकडेच जास्त आहे.) नोकरीच्या निमित्ताने कुटुंबासाठी काही अर्थपूर्ण कार्य केल्याचे कागदी (नोटा) समाधान व मुख्यत: पुरुषात मिसळण्याच्या हसण्या-खिदळण्याच्या संधी राजरोस मिळतात त्यामुळे ज्याला इंग्रजीत 'पेटिंग' व मराठीत 'स्पर्शसुख' म्हणतात ते मिळते. नोकरी एका अर्थाने 'सब्स्टिट्यूट (फॉर सेक्स) मेकॅनिझम ठरू शकतो !

१५ : डॉ. इरावती कर्वे यांनी ६० व्या वर्षी सक्तीच्या इच्छा (?) मरणाची संकल्पना सुचविली होती. गेल्या वर्षी बिहार-मध्ये पक्ष्यांनी सामूहिक आत्महत्या केल्याचा प्रकार ठाऊक आहेच; लेकडेही अशा प्रकारे समुद्रात घुसून आत्महत्या करतात म्हणे ! भारतात बेकारी व लैंगिक सुव्यवस्था याची गुतागुत झाल्याने नोकरीची मर्यादा पाच वर्षांनी कमी करावी. सुरुवातीस ज्याना स्वेच्छने निवृत्त व्हायची इच्छा आहे त्याना १०, १५, २० वर्षांनी निवृत्त झाल्यास निर्वाह-पेन्शनची सोय करावी. त्यांच्या खर्चाची तरतूद एखादा नवा कर (प्रोफेशन टॅक्सप्रमाणे) बसवून करावी असेही डॉ. कॅरीनोनी सुचविले आहे.

कोणतीही सामाजिक समस्या एकपदरी नसते. तेव्हा नोकरी, लग्नाचे वाढते वय, बेकारी, बलात्कार, जुने परपरागत विचार आणि लोकशाही याचा गुंता समाधानकरपणे सुटल्याशिवाय (तो सुटणार नाही एवढ्यात) किंवा झटका देऊन तोडून विद्रोहाने सोड-विल्याशिवाय (तेही तूर्त शक्य नाही) काहीच शक्य नाही. तोवर डॉ. पॉवल कॅरीनो-प्रणीत उपाय ऐकूनही, उमजूनही आपण फक्त मागील पानावरून (कार) कीर्द पुढं चालू ठेवायची का ? जरा विचार करा ! □

# योग्य कर भरा — राष्ट्राला बलवान करा.

※ कर भरण्यायोग्य प्राप्ती असल्यास अशा व्यक्तींनी स्वेच्छेनेच प्राप्तीकर विवरणपत्रके दाखल करणे त्याची कायदेशीर जबाबदारी आहे.

※ यांत दिरगाई केल्यास भूर्दंड व्याज आणि शिक्षा पण होऊ शकते.

## अशी पाहणी करण्याचे काम चालू आहे.

※ प्रत्येक घरी जाऊन अशी पाहणी आणि तपासणी करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर, प्राप्तीकर खात्यातर्फे प्रारंभ करण्यात आले आहे. कर भरण्यायोग्य प्राप्ती असतानाही ज्या कोणी व्यक्तीने स्वखुषीने प्राप्तीकर विवरणपत्रके दाखल केली नसतील, तो दूर करण्यायोग्य अडचणीत सापडेल.

## कायदेशीर कारवाईपासून स्वतःचा बचाव करा.

※ अशा अडचणीत सापडण्यापूर्वी स्वत.च आपली प्राप्तीकर विवरणपत्रके दाखल करा. कर जमा करा आणि तपासणी तसेच करआकारणीच्या कामात त्या खात्यांच्या लोकांबरोबर सहकार्य करा.

त्यानतर प्राप्तीकर कायदा १९६१ मधील कलम २७३ ए च्या अतर्गत प्राप्तीकरात फेरबदल करण्यासाठी, व्याज कमी करण्यासाठी अथवा भूर्दंड रद्द करण्यासाठी आपण प्राप्तीकर आयुक्तांना भेटू शकता.

※ स्वखुषीने प्राप्तीकर विवरणपत्रके दाखल केल्यानंतरही आपण वरील सवलतीचा फायदा घ्या.

अधिक माहितीसाठी प्राप्तीकर आयुक्त / प्राप्तीकर अधिकारी अथवा जनसपर्क अधिकाऱ्याकडे चौकशी करा.

**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन**
(रिसर्च, स्टॅटिस्टिक्स अँड पब्लिकेशन)
**इन्कम टॅक्स डिपार्टमेंट**
नवी दिल्ली

DAVP 80/170 (Marathi)

दि. बा. मोकाशी

# स्त्री लेखिकांचे आक्रमण

साहित्य परिषदेच्या सभागृहात दिनांक ११-८-८० या दिवशी सायंकाळी साडे· सहा वाजून दहाएक मिनिटांनी सौ. कुसुम अभ्यंकर जेव्हा जोरानं पदर खोचून बोलायला उभ्या राहिल्या तेव्हा श्रोत्यांत बसलेल्या पुरुष लेखकांना व टीकाकारांना जरा भयच वाटलं; पण भाषणारंभीच कुसुमताईंनी दिलासा दिला. त्या म्हणाल्या, 'मी पदर खोचून बोलायला उभी राहिले तरी कसल्या अभिनिवेशाने नाही. मला जाणीव आहे की पुणेरी लोकांपुढे बोलताना प्रत्येक शब्द तोलून बोलायला हवा. शिवाय आजचे अध्यक्ष (श्री. ज. जोशी) टपलेलेच आहेत. आजपर्यन्त स्त्रियांच्या प्रश्नावर चर्चा होत. आज स्त्रियांच्या लेखनाचा प्रश्न चर्चेला आहे. या चर्चा स्त्री लेखिकांच्या लोकप्रियतेच्या हेव्याने तर होत नाहीत ना ?'

सौ. कुसुम अभ्यंकर या आजच्या स्त्री लेखिकांत सर्वांत जास्त लोकप्रिय लेखिका आहेत. खरे म्हणजे त्यांना केवळ लेखिकांत पहिला नंबर देताना मी त्यांचा अपमानच करीत आहे. लेखक व लेखिका दोहोत त्यांचा पहिला नंबर आहे; पण मराठीत लेखक व लेखिका यांना समान असा शब्द नसल्यानं मी लेखिका शब्द वापरला. माझ्या बरेच दिवसांपासून कानावर होते की त्या पानाला पाऊणशे रुपये या दराने कादंबरीचे पैसे घेतात. ते सुद्धा अगाऊ ! यांतही त्यांचा लेखक-लेखिकांत पहिला नंबर आहे. मलाच काय पण आजचे अध्यक्ष श्री. ज. जोशी यांनाही त्यांचा हेवा वाटत असल्याचे समारोपाच्या आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले. कुसुमताई पानाला म्हणे इतके पैसे घेतात हे खोटे वाटून त्यांनी म्हणे प्रकाशकाकडे चौकशी केली. तेव्हा प्रकाशक म्हणाला; 'तुम्हाला कळलेला आकडा फार कमी आहे!'

¤

आजपर्यंत स्त्री लेखिकांकडे माझे लक्षच गेले नव्हते. त्या अशा काही लिहितील की, आम्हा पुरुष लेखकांच्या पुस्तकांचा सेल मारून टाकतील हे स्वप्नातही नव्हतं. माझ्याकडे काही वर्षांपूर्वी माझा एक मित्र आला होता तेव्हाच पुरुष लेखकांना उत्पन्न झालेला धोका मला कळायला हवा होता. जवळजवळ पस्तीस-चाळीस वर्षांनंतर म्हातारा होऊन, हा बालमित्र मला भेटायला आला. तो निवृत्त झाला होता व त्याच शहरात एका कॉलनीत त्यानं छोटं घर बांधलं होतं. आता म्हातारपणी उद्योग म्हणून त्यानं घरात वाचनालय काढलं होतं व त्यासाठी पुस्तक-खरेदी करण्यास तो पुण्याला आला होता. मी प्रकाशकांशी लेखक म्हणून संबंधित असल्यानं माझ्या ओळखीनं जास्त कमिशन मिळेल असे वाटून हव्या असलेल्या पुस्तकांची यादी घेऊनच तो माझ्याकडे आला होता. अडीचशे पुस्तकांच्या त्या यादीत नव्याण्णव टक्के पुस्तके स्त्री लेखिकांची होती आणि त्यांच्यापैकी एकीचेही नाव मी ऐकले नव्हते. मी मित्राला विचारले, 'अरे, यात भावे, गोखले, गाडगीळ, व्यंकटेश नाहीत; पण आमचा आनंद यादव नाही. महानोरही हवा !' मित्र हसून म्हणाला, 'हल्ली स्त्रियांशिवाय कुणी पुस्तक वाचीत नाही आणि स्त्रियांना पुरुष लेखकांची पुस्तके मुळीच नको असतात. त्या स्त्रीलेखिकांशिवाय कुणाचं वाचायला तयार नसतात !'

हा प्रसंग घडला तेव्हाच आम्हा पुरुष· लेखकांवर होणाऱ्या आघाताची कल्पना येऊन मी सावध व्हायला हवं होतं; पण 'सगळा मूर्खांचा बाजार आहे, ही लाट ओसरेल !' असं म्हणून मी दुर्लक्ष केलं. मला वाटतं एकदाच हा प्रसंग मी एका संपादक मित्रास सांगितला. त्याने सुचवले की, मी यापुढे दि. बा. मोकाशी (म्हणजे दिगंबर बाळकृष्ण मोकाशी) या नावाने न लिहिता अनुसया मोकाशी हे नाव घेऊन लिहावे. या विनोदावर आम्ही दोघेही हसलो; पण आता मला वाटतंय की, त्याने सुचविलेले मी अमलात आणले असते तर आज सौ. कुसुम अभ्यंकर यांचा हेवा करण्याचा प्रसंग माझ्यावर आला नसता !

¤

जाहीर झालेल्या 'स्त्री-लेखिकांची भूमिका' हा विषय बदलून व्याख्यातींनी 'मी-एक स्त्रीलेखिका' हा विषय घेतला. त्या म्हणाल्या, मी लेखिका झाले त्याचे मूळ असलेला असा कोणता प्रसंग सांगता येईल याचा शोध घेऊ लागले तेव्हा लक्षात आले की, असा मूळ प्रसंग नाही. जीवनातील सर्व प्रसंगांचा हा परिणाम आहे. दैवजात स्फूर्ति अधिक परिश्रम यांनी लेखिका घडते. माझ्या बाईंनी मला सांगितलं होतं, लेखिका व्हायचं असेल तर सर्वांगीण वाचन कर. सर्व माणसांशी जातिभेद न पाळता बोल. मला बोलभांड म्हणतात; पण सर्वांशी बोलणारी म्हणून मी बोलभांड आहे. अर्थात परमेश्वरानं स्त्रीच्या रक्तात दिलेलं भांडण ते माझ्यातही आहे. भांडण कुणाचं होतं ? मतभेद होतात त्यांचं. मतं आहेत म्हणून मतभेद होतात आणि मत कुणाला असतं, जो विचार करतो त्याला. बोलभांड ही शिवी नसून कौतुक आहे. बोलता बोलता

दुसऱ्यास जाणण्याची शक्ती. पंचवीस वर्षं विवाहाला होऊन मी माझ्या पतीला व पतीने मला संपूर्ण जाणलेले नाही. कोणत्याही व्यक्तीला संपूर्ण जाणून घेऊ नये. मग काहीच उरत नाही. उघड्या डोळ्यानी जीवन पहा. समोर जे दिसताय त्याचा कार्यकारणभाव ओळखून घ्या. कुणी काही म्हटलं तरी राग नसावा.

¤

एकोणीसशेसत्तर साली कादंबरीलेखनास आरंभ करून आजपर्यंतच्या दहा वर्षात सौ. कुसुम अभ्यंकर यांनी वर्षास तीन याप्रमाणे सुमारे तीस कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्या सध्या चाळिशीत असाव्यात. म्हणजे याच वेगाने त्यांनी कादबऱ्या लिहिल्या तर साठी गाठण्यापूर्वी शंभर कादबऱ्या पुऱ्या करण्याचा स्त्रियातला पहिला मान त्यांना मिळेल! त्याचे वास्तव्य रत्नागिरी येथे असून तेथे त्यांचे यजमान डॉ. रामचंद्र अभ्यंकर यांच्या वैद्यकीय व्यवसायात त्या मदत करीत असतात. संपूर्ण इंग्लिश घेऊन त्या एम्. ए. झाल्या आहेत. रत्नागिरीतील अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांच्या सचालकमंडळावर त्यानी काम केले आहे. राजकारणात पडूनही लेखन करणाऱ्यात नानासाहेब गोरे पहिले तर त्या दुसऱ्या ठरतील. त्या भाजपतर्फे आमदार म्हणून निवडून आल्या आहेत.

लेखिका घडते कशी हे सागितल्यावर सौ. कुसुमताईंनी स्त्री लेखिकांच्या मर्यादांबद्दल म्हटले, 'मी एक मध्यमवर्गीय स्त्री. वाटयाला जी चौकट आली तिच्या बिंदूला जाणून लेखन केलं; पण त्या चौकटीमुळं मी मर्यादित झाले हे मला मान्य नाही. चौकटीचा दोष हा स्त्रीचा नाही. स्त्री ही पुरुषाना कळलीच नाही!'

आजच्या नव्या लेखिकांची ही चढाईची भूमिका मागच्या लेखिकात नव्हती. प्रख्यात कथाकार वसुंधरा पटवर्धन या माझ्याजवळ एकदा म्हणाल्या होत्या की, स्त्री लेखिकांना मोकळेपणाने अनुभव घेता येत नाहीत यामुळे त्यांना मर्यादा पडतात. म्हणजे साधे रस्त्यात उभं राहून पाहणं हे सुद्धा स्त्री लेखिकेला करता येत नाही. मग कुठं अपरिचित ठिकाणी जाऊन, बोलून साहित्यासाठी सामग्री गोळा करणं दूरच. रात्र पडली आहे, गावापासून दूर बसलो, आहोत या साध्या अनुभवाला स्त्री पारखी आहे.'

मागच्या व या दोन पिढीतील लेखिकेतील फरक अतिशय गमतीचा आहे. वसुंधराबाईंनी त्यांच्या वेळच्या पुरुषाच्या बरोबरीनं कथा लिहिल्या आणि काही वेळा त्यांच्याहूनही कसदार लिहिल्या. वसुधराबाईंप्रमाणेच मालतीबाई बेडेकर, शांता शेळके, डॉ. तारा बनारसे, उर्मिला शिरूर या व इतर लेखिका पुरुष लेखकांच्या पाटाशी पाट मांडून बसल्या; पण त्याच काळी असा एक विचारप्रवाह लेखिकांत होता की, पुरुषी वाङमयाशी स्पर्धा करण्याचे आम्हा स्त्रियांना काही कारण नाही. आम्हा स्त्रियाचे वाङमय स्वतंत्र, स्वयंभू आहे. त्या वेळेपासून काही लेखिका करीत असलेला हा दावा सौ. कुसुम अभ्यंकरसारख्या आजच्या लेखिकांनी खरा असल्याचे सिद्ध केले. इतके की, श्री. ज. जोशी याच्यासारख्या स्त्रियांत प्रिय असलेल्या लेखकाना त्यांचा हेवा वाटू लागला.

¤

स्त्रियांचं जग वेगळंच आहे. त्यांचं वाङमयही वेगळं हवं ही गोष्ट सिद्ध होऊनही त्याला पुरुषी मान्यता नव्हती. आपल्याकडे नव्हे तर जगभर ही स्थिती होती. तेव्हा स्त्री-पुरुषांची मासिके एकच असत. म्हणजेच पुरुषांची असत. स्त्रियांसाठी शंभर पानांतली दोन पाने राखून ठेवली जात. इंग्लडमधील कोणा एका बाईच्या ही गोष्ट लक्षात येऊन तिनं स्त्रियाचं, त्यांच्या अडचणींचं, स्त्रियाच्या आवडीनिवडीचं आणि स्त्रीच्या दृष्टीतून पुरुषाला पाहणारं मासिक काढलं. ते जगातलं सर्वांत जास्त खपाचं मासिक ठरलं.

स्त्रियांच्या आवडीनिवडीचं वेगळेपण अजूनही काही पुरुषाना पटलं नसेल तर त्यांनी नीट लक्ष ठेवावं. स्त्रियांना सारखे बरेवाईट वास येत असतात. पुरुष वैतागतात; पण स्त्रियांचे नाक निसर्गत.च जास्त तिखट असते हे पुरुष विसरतात. तसेच पातळांचे अनेक रंग पाहून त्यांना पातळ पसंत पडत नाही याचे कारण त्याना रंगातले बारकावे जास्त कळतात. स्त्रियाच्या स्वभावाचं हे वेगळेपण अभ्यंकरबाईंनी एका प्रसंगातून नकळत सांगितलं. त्याच्या बाळंतिणीच्या दवाखान्यात सतरा अठरा वर्षांची एक मुलगी बाळंतपणासाठी आली. कळा येऊन ती ओरडत होती. बाहेर तिचा नवरा आला असल्याचं तिला सागितलं. तेव्हा त्या कळामधून ती ओरडली, 'मला त्या माणसाच तोंड पाहावयाचं नाही!' नंतर त्या मुलीला आठ पौंडी मुलगा झाला. तेव्हा ती अभ्यंकरबाईंना म्हणाली, 'बाई! त्यांना मुलगा दाखवा...म्हणावं तुम्ही जेवन या!' हा प्रसंग सांगून सौ. कुसुम अभ्यंकर म्हणाल्या, 'ती एक खेड्यातील साधी मुलगी; पण केवळ आपल्या मुलाचीच नव्हे तर नवऱ्याची आणि यच्चयावत जगाची आई झाली!'

¤

हल्ली प्रा. भालचंद्र फडके यांनी लेखिकांवर बडगा उगारला आहे. पण त्याआधी सौ. कुसुम अभ्यंकरसारख्या तेव्हाच्या लेखिकांना न मानणारा एक संपादक होता. तो म्हणजे 'हंस' मासिकाचे अनंत अंतरकर. ते म्हणत—'वसुधरा पटवर्धनसारख्या एक-दोन लेखिका सोडल्यास बाकीच्या लेखिकांना माझ्याकडे मज्जाव आहे!' अंतरकर यांच्या या म्हणण्याला आता पुष्कळ वर्षे झाली. अंतरकरांनी मज्जाव करावा अशांची संख्या आता किती तरी वाढली आहे. तरीही मला वाटतं की अंतरकर किंवा भालचंद्र फडके यांची स्त्री लेखिकांविषयी मते बरोबर आहेत का याचा पुनर्विचार व्हावा. बहुसंख्य लेखिकांच्या लिखाणात वाङमयीन मूल्यांचा टीकाकारांना अभाव वाटला तरी एक गोष्ट मान्य करावी लागेल की, ते शंभर टक्के स्त्रीवाङ्मय आहे. अशा कादंबऱ्या पुरुषलेखकांना या जन्मी लिहिता येणे शक्य नाही! स्त्रियांची आता कुठे सर्वांगीण जागृती होत आहे. आता कुठे स्त्रीलेखिका खरे स्त्रीजीवन रंगवू लागल्या आहेत. त्याचप्रमाणे आता कुठे स्त्रिया वाचन करू लागल्या आहेत. पुढच्या पिढीत त्याच्या लिखाणाला खोली येऊ लागेल.

¤

पण तोपर्यंत पुरुष लेखकापुढे प्रश्न येऊन उभे राहतील. जे खपत नाही ते लिहावयाचे का? किंवा टोपणनाव धारण करावयाचे? मला वाटले होते, की अध्यक्ष श्री. ज. जोशी पुरुष लेखकवर्गासाठी काही तरी मार्ग काढतील. त्यानी स्त्री लेखिकांची बाजू घेऊन निराशा केली. विशेषत: भालचंद्र फडके यांचे स्त्रीलेखिकावरचे पुस्तक कसे परस्पर विरोधी व अप्रस्तुत आहे 'याबद्दलच ते खूप बोलले. 'स्त्रीलेखिकांची भूमिका' हा जाहीर झालेला विषय ऐनवेळी व्याख्यातीनी बदलल्यामुळे त्यांचा घोटाळा झाला असेल; पण त्यामुळे त्यांचा समारोप कंटाळवाणा झाला व बरे, पुरुषलेखक आपापसात भाडत आहेत, म्हणून सौ कुसुम अभ्यंकर व समोरच्या श्रोत्या स्त्रिया गम्मत पहात बसल्या. ❑

# माळरानावर फुललेल्या एका वसंताला श्रद्धांजली

**रघुवीर मुळे**

गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून वर दिलेल्या शीर्षकासारखं शीर्षक एखाद्या लेखाला दिलं रे दिलं की, उगाचच्या उगाच वाचकांना वसंतदादा पाटलांसंबंधीचंच आर्टिकल असल्याचं वाटतं. उजाड माळरान म्हटलं की एक तर वसंतदादा असले पाहिजेत नाही तर रत्नाप्पाअण्णा आणि हे दोघे म्हटले की, माळरानावर वसंत हा फुललाच पाहिजे! अर्थात् सहकारी साखरकारखाना काढून या मंडळींनी कर्तृत्व 'होलसेल' गाजवलंही असेल; पण ह्या प्रकारच्या 'घाऊक' व्यवहाराला न पत्करता 'रिटेल' उत्कर्ष साधू पाहाणारे देखील 'वसंत' आहेतच. तळचे. त्याची दखल?

–घेण्यासाठीच तर हा प्रपंच!!

इसवी सन १९६२. महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन उणीपुरी दोन (च) वर्षं झालेली. नासिक जिल्ह्यातला नांदगाव तालुका. सातत्यानं वंचित. निसर्गानं नं नेतृत्वानंही त्याच तालुक्यातला एक सामान्य माणूस. भाडवलदार–तेही चार-चौघंच; पण त्याच्या गांधीचौकातल्या कीर्दखतावणीत तालुका दावणीला बांधलेला पाहून हा सामान्य माणूस तळमळतो न कळत 'कम्युनिझम'चंही आकर्षण. विविध आंदोलने-लढे यात आघाडीवर. केवळ मोर्चे आणि तुरुंगवास यातून काही साधेल असा विश्वास वाटत नसल्याने ठोस काम करण्याचा ध्यास.

वसंतराव सुरसे हे 'या माणसाचे नाव. एक कार्यकर्ता. ठोस काम करण्याचं मनात आल्यावर काय उशीर! त्याच्याच पुढाकारानं साकोरे (ता. नादगाव) भूमिहीन को ऑपरेटिव्ह कलेक्टिव्ह फार्मिंग सोसायटी स्थापन झाली. त्याच संस्थेची ही कथा. संदर्भासाठी आपण सोसायटी असे म्हणू.

ही सोसायटी १९६३ साली स्थापन झाली. सोसायटीची सदस्यसंख्या एकशेदहा होती. त्यात सारेच भूमिहीन होते; पण एकाच जातीचे नव्हते. मराठा, माळी, भिल्ल, सुतार, न्हावी, चांभार, लोहार; गोसावी, आदिवासी, कोकणा, ठाकूर या मंडळीचा सदस्यात समावेश होता. भागभांडवल जमविण्यास सुरुवात झाली. प्रत्येक भाग ५ रुपये (शेअर) किमतीचा होता. दोनेक हजार रुपयांचे भागभाडवल जमले असेल-नसेल. पैशापेक्षा उत्साह आणि काही तरी करून दाखवण्याचा आवेग मात्र जबरदस्त होता. नांदगाव हा नासिक जिल्ह्यातला दुष्काळीच तालुका. औरंगाबाद आणि जळगाव जिल्ह्याच्या सीमारेषेवर गिरणा-मन्याड या परजिल्ह्यातल्या जमिनींना संतुष्ट करणारी धरणं इथंच. वसंतराव सुरसे यांनी शोधाशोध केली. साकोरे गावाजवळच कुसळालाही उगवायला दटावणारी ही सुमारे एक हजार एकर जमीन पडित होती. फॉरेस्ट-खातेही पावसाचा अभाव म्हणून व्यर्थ खर्च करण्याकडे लक्ष देत नव्हते. काही काळानंतर ही जमीन वनखात्याकडून सरकारकडे वर्ग करण्यात आली होती. सोसायटीने ही जमीन आपल्याला कराराने मिळावी म्हणून प्रयत्न केले आणि ३१ मार्च १९६४ रोजी ही जमीन सोसायटीला एक वर्षाच्या कराराने मिळाली.

जमीन मिळाल्यानतर भूमिहीन शेतकऱ्यांनी या जमिनीच्या विकासासाठी अक्षरशः जिवापाड कष्ट उपसले. श्रमदानाने तीन विहिरी खोदूनही पाण्याचा पत्ता नाही; पण चौथ्या वेळेस मात्र त्यांच्या घामाचे चीज झाले आणि विहिरीला पाणी लागले! ह्या जमिनीचे एकूण क्षेत्र १ हजार १९० एकर २४ गुंठे एव्हढे होते. ती सर्व्हे नंबर २८२ ए, ३३४, ३३५, ३३६ व ३३७ यात विभागलेली होती. ह्या माळरानावर पहिल्याच वर्षी वसंत फुलला. ही जमीन डी–फॉरेस्ट झाल्यानंतर एका अमेरिकन कंपनीने निलगिरीच्या लागवडीसाठी राखून ठेवली होती; पण नंतर त्यांनीही नाद सोडून दिला होता. एकशेदहा सदस्यांनी तिथं कष्टानं (सरकारला) आपली ताकद दाखवली आणि सरकारलाही आपलं दान सत्पात्रीच असल्याचं पटलं. पहिल्याच वर्षी जवळजवळ १ हजार क्विंटल बाजरी आणि दोन हजार क्विंटल भुईमुगाचं उत्पन्न निघालं. नांदगाव तालुका तर ह्या अचंब्यान हादरलाच! याची कारणे मात्र वेगवेगळी होती. श्रीमंत शेतकरी या ११० सदस्यांपैकी अनेकांना (कुटुंबियासह) वर्षानुवर्षे ५० ते ७५ रुपये सालीना देऊन शेतावर राबवून घेत असत. सोसायटी तर १०० रुपये महिना देई. त्यामुळे शेतमजुराची टंचाई तर निर्माण झालीच; पण जे मिळत त्यानाही सोसायटीएवढी मजुरी नकळत, नाइलाजानं वाढवून देणं भाग पडलं. मजुरीबरोबरच धान्याचीही अडचण दूर झाली. सहकारखाते, शेतकीखाते कौतुक करू लागले. केवळ नासिक जिल्ह्यातलेच नव्हे तर महाराष्ट्रातले कार्यकर्ते ह्या बदलाचा आणि सहकारी शेती कशी यशस्वी करावी याच्या अभ्यासासाठी साकोऱ्याला पायधूळ झाडू लागले.

आता कर्तृत्वाने वेग घेतला होता. १९६७ साली ह्या जमिनीचे सभासदात वाटप होण्यास संमती मिळाली. प्रत्येक सभासद ह्या दहा एकरांचा मालक झाला. सगळ्यांचाच अनुभव चांगला होता.

जमिनीच्या विकासासाठी, शेतीसाठी नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पीककर्ज म्हणून ७५ हजार रुपये, ट्रॅक्टर-खरेदीसाठी ५० हजार रुपयाचे कर्ज दिले होते. नादगाव तालुक्यातला पहिला ट्रॅक्टर ह्या सोसायटीचा. सोसायटीच्या प्रामाणिक सभासदांचे कष्ट फळाला आले होते; पण फळ पाहून त्याचे मन चळले नाही. बँन्केचे कर्ज मागेपुढे माफ होईल, कशाला परतफेड करा असा विचारही कोणाच्या मनात आला नाही. दुसऱ्याच वर्षी उत्पन्नातून ४० हजाराची कर्जफेड सोसायटीने करून टाकली. हा पायंडा नवीनच होता. सरकारही आशेने सोसायटीच्या कारभाराकडे पाहू लागले होते. सरकारने भूविकासासाठी म्हणून सोसायटीला एकरकमी एक लाख रुपयांचे अनुदान दिले. अकराशेनव्वद एकरांपैकी ८०० एकर जमीन माळरानातून उठून लागवडीखाली अवघ्या दोन वर्षांत येणं हा चमत्कार साकोऱ्याला घडला होता! परिसरातील मजूर सोसायटीकडे आकर्षित झाल्याने शेतकरी मात्र संतापाने जळत होते आणि त्यांनी आपलं 'काम' करायला प्रारंभ केला. मजुरात–सभासदात कळलावेपणा केला. त्याची आग मात्र ते तात्काळ भडकवू शकले नाहीत. उलट पूर्वानुभवाने मजूरसभासदही शहाणपण शिकले होते. पिढ्यान्‌पिढ्या ज्या गावात हातातोंडाशी गाठ असलेल्या परिस्थितीत गेल्या तिथं त्यांना काळ्या आईचा आसरा मिळाला होता, तो त्यांना महत्त्वाचा वाटत होता. सोसायटीने पापइलाइनचे काम हाती घेऊन एव्हाना तेही पूर्ण केले होते; पण इथच कुठं तरी दृष्ट लागली! दुसऱ्याही साली निसर्गानं साथ दिली. ९०० क्विंटल कांद्याचे उत्पादन झाले आणि भाव मात्र ७ रुपये क्विंटलवर घसरले. भाजीपाल्याच्या उत्पन्नानेही म्हणावासा हात दिला नाही. १९७२ पर्यन्त सोसायटी सातत्याने 'अ' वर्गात होती. ती बँकेच्या दृष्टीने 'थकित' झाली. तरीही सभासदांनी धीर सोडला नाही. कर्तृत्व कोमेजले नाही! निसर्गाच्या प्रकोपापुढे कोणाचाच इलाज नव्हता.

एके दिवशी या दुष्काळी भागातील सोसायटीचे कर्तृत्व ऐकून हिंदुस्थान लिव्हर लिमिटेड या मोठ्या कंपनीचे अधिकारी साकोऱ्यात येऊन दाखल झाले. त्यांनी मातीचा नमुना घेतला. विनामूल्य पृथक्करण करून खते–बी–बियाणे वापराचा सल्ला तर दिलाच; पण जवळजवळ अडीच हजार रुपयाची रासायनिक खतेही विनामूल्य पुरवून भुईमुगाचे पीक घ्या! खरेदीची हमी आम्ही घेतो असे सुचविले. उपलब्ध पाण्याचा अधिकाधिक वापर व्हावा म्हणून 'स्प्रिंक्लिंग'ची यंत्रणा राबविण्याचीही तयारी दर्शविली. ७२–७३ साली तर महाराष्ट्रात सर्वत्रच दुष्काळ पडला! सोसायटीने सरकारच्या शेतीखात्याकडे तज्ज्ञाची मागणी केली. ती पत्रव्यवहारातच अडकून पडली! तीनेक वर्षांत सोसायटीच्या 'ॲसेट्स'मध्ये चांगलीच भर पडली होती. ट्रॅक्टर तर होताच; पण २४ बैल व २४ म्हशीही होत्या. (शिवाय फोन अन् 'तारेचा पत्ता!') नादगाव हे तालुक्याचे ठिकाण. जवळजवळ सर्वच अधिकाऱ्यांना सोसायटी अल्पनफ्याने दुधाचा पुरवठा करीत होती.

१९७२ साल उजाडले. सर्वत्र दुष्काळ असूनही लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी जिल्हा परिषद निवडणुकीचे नगारे वाजू लागले. कनुशेठ नहार हे तालुक्यातले एक प्रस्थ! त्यांनी नादगाव गटातून परिषदेसाठी आपला अर्ज दाखल केला तर त्यांच्याच विरोधात वसंतराव सुरसे यांनी काम केले. मग शह–काटशहाला सुरुवात झाली होती. नहारांनी आपले वजन वापरून सोसायटीच्या सभासदांचे कर्तृत्व 'लिक्विडेशन'च्या शिक्क्याने पुसून टाकले. प्रांताधिकाऱ्याकडे तर दादच लागत नाही. प्रांत रघुनाथराव राठोडांची ऊठबस तर आमदार असताना नहारांकडे अधिकच. महाराष्ट्रात सर्वत्र भूमिहीनांना जमीनवाटपाचा गाजावाजा होतो. साकोऱ्याच्या सोसायटीच्या एकशेदहा सदस्यांना मात्र तो कायदा लागू नाही. दांडेकर समितीच्या शिफारशी इथे डावलल्या जातात. गेली तीन वर्षे इथे या सोसायटीवर प्रशासक आहे आणि गेल्या तीन वर्षांत एक हजार एकशेनव्वद एकर जमिनीने पुन्हा माळरानाचे स्वरूप धारण केले आहे! □


## – नवीन दाखल झालेली पुस्तके –

### — ENGLISH —

| | | |
|---|---|---|
| 1. | **The White House Years**—Henry Kissinger | Rs. 284/— |
| 2. | **The Memoirs of Richard Nixon** | RN– $ 19 93 |
| 3. | **Stormy Decade** ( Politics )—Balraj Madhok | Rs. 45/— |
| 4. | **The Crucible** ( Play on Salem Witch-hunting )— Arthur Miller | 11/10 |
| 5. | **Jane Fonda** ( Biography )—Thomas Kiernan | 21.15 |
| 6. | **Lifetide** ( Occultism-Biology of the Subconcious ) Lyall Watson— | £ 1.50 |

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

विठोबाला 'भेदरट' व भक्ताला 'बावळट' म्हणून बुद्धिवादी काय साधणार आहेत ?

# बुद्धिवादाची दशा आणि दिशा

राजा दीक्षित

१८ जुलैला 'रोहिणी' या भारतीय उपग्रहाने श्रीहरिकोटा येथून यशस्वी प्रक्षेपण केले. भारतीय वैज्ञानिकांनी हे प्रचंड यश मिळविले तेव्हा श्रीहरिकोटयाच्याजवळ राहणाऱ्या लोकाना त्याचा पत्ताच नव्हता ! तेथून वीस कि. मी. अंतरावरच्या सुलुरपेटा या गावच्या पंचवीस हजार लोकांपैकी फारच थोडे घराबाहेर आले आणि त्यांनी हे प्रक्षेपण पाहिले. गंगाम्मा नावाच्या एका बाईने तर या अग्निबाणाबद्दल मोठी गंमतीशीर प्रतिक्रिया व्यक्त केली – 'आकाशात तो उडवण्याची गरजच काय ? आपण दिवाळीत रॉकेट उडवतोच की !' गंगाम्माचे हे उद्‌गार आमच्या देशातल्या असंख्य लोकांचे प्रातिनिधिक उद्‌गार आहेत. हे लोक बिचारे अडाणी तरी आहेत; पण 'रोहिणी'च्या प्रक्षेपणाचे सूत्रधार असणाऱ्या वैज्ञानिकानी प्रक्षेपणापूर्वी पूजाविधी केला, हा एक थोर विनोद आहे !

'रोहिणी'च्या प्रक्षेपणानंतर चार-पाच दिवसानी (२३ जुलैला) महाराष्ट्रातल्या पंढरपूरला आषाढी एकादशीची महायात्रा भरली आणि यंदा पाच लाखाच्या विक्रमी सख्येने वारकऱ्यांनी विठ्ठलाचे दर्शन घेतले !

इकडे पुण्याला २६ जुलैला सदाशिवपेठेत महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या पटवर्धनसभागृहात चक्क एक बुद्धिप्रामाण्यवादी मेळावा भरला ! मेळाव्यात बोलणाऱ्याची जी नावं जाहीर झाली होती ती वाचल्यावर मनात विचार आला की, म. सा. प. चे छोटेसे सभागृह या मेळाव्याला पुरणार का ? गंगम्मासारखे लोक किंवा पंढरीचे वारकरी नाही यायचे या मेळाव्याला; पण तरीही जी गर्दी होईल ती बऱ्यापैकी असेल !

...पण माझा अंदाज खोटा ठरला. म. सा. प. चे सभागृह या मेळाव्याला पुरून उरले ! बेताची गर्दी पाहून वाईट वाटलं. बर, जे काही थोडे लोक आले, ते तरी सच्चे बुद्धिप्रामाण्यवादी असावेत ना ? तर छे ! इतर कोणत्याही वक्त्यापेक्षा त्यांनी खराखुरा प्रतिसाद दिला तो बुद्धिप्रामाण्याला विरोध करणाऱ्या गणेशशास्त्री शेंड्याच्या भाषणाला ! शास्त्रीबुवांच्या भाषणाला मिळणाऱ्या हशा–टाळ्यांमागे खास पुणेरी उपरोध असता तर ते एक वेळ समजण्यासारखं होतं; पण त्या हशा–टाळ्या म्हणजे चक्क त्यांच्या भाषणाला मिळालेली मनपसंत पावतीच होती !

तर, बुद्धिप्रामाण्यवादाची दशा एकूण ही अशी आहे ! अशा परिस्थितीत वाईचे डॉ शरद अभ्यंकर महाराष्ट्रात बुद्धिप्रामाण्यवाद्याची एक चळवळ संघटित करू पहात आहेत. (पुण्यातल्या मेळाव्याचे सयोजक तेच होते.) बुद्धिवाद हा मानवी प्रगतीचा पाया आहे आणि आपल्या समाजात तर बुद्धिवादाच्या प्रसाराची फारच आवश्यकता आहे. या दोन गोष्टी लक्षात घेता, बुद्धिवादी चळवळ सुरू होणार असेल तर तिचे स्वागतच करायला हवे; पण बुद्धिवादी नसणारे लोक जसे स्वागत करतात, तसे ढोलबडवे आणि भाबुक स्वागत करून उपयोगाचे नाही. तेव्हा, बुद्धिवादाची दशा काय आहे आणि दिशा काय असावी याविषयी काही परखड विचार मांडणे हाच स्वागताचा उत्तम प्रकार.

ह्या लेखात पुण्यातला बुद्धिप्रामाण्यवादी मेळावा 'माणूस'च्या २ ऑगस्टच्या अकातला श्री. ग. माजगावकरांचा 'बुद्धिवाद आणि मृत्यू' हा लेख, ९ ऑगस्टच्या अंकात त्या लेखाबाबत आलेले डॉ. शरद अभ्यंकराचे पत्र आणि २३ ऑगस्टच्या अंकात 'पंढरपूरची वारी' यासबंधी लिहिलेला लेख – या सर्वांचाच आवश्यक तेथे विचार करणार आहे.

बुद्धिवादी चळवळ उभी करताना प्रथम दोन गोष्टी करणे आवश्यक आहे. बुद्धिवाद्यानी आत्मपरीक्षण करायला हवे आणि दुसरे म्हणजे चळवळीच्या मार्गातल्या अडचणीचा वस्तुनिष्ठ विचार करायला हवा.

पुण्यातल्या बुद्धिप्रामाण्यवादी मेळाव्यात अध्यक्ष लक्ष्मणशास्त्री जोशी यानी असे सांगितले की, 'बुद्धिवाद हा सगळयात नम्रवाद आहे.' आता तात्त्विकदृष्टया हे कितीही खरे असले, तरी बुद्धिवादी लोक मात्र नम्र असतात असे नव्हे. विशेषत: प्रा. स. शि. भावे यानी मेळाव्यात सांगितल्याप्रमाणे, 'महाराष्ट्रातली बुद्धिवाद्यांची परंपरा विलक्षण आक्रमक आहे.' बुद्धिवादाची चळवळ संघटित करायची असेल, तर असे आक्रमक राहून चालेल का याचा बुद्धिवाद्यानी विचार करायला हवा. तसेच ह्या आक्रमकांनी आपण स्वत:च तर दांभिक नाही ना हेही तपासायला हवे ! दिनकर साक्रीकरानी मेळाव्यात सांगितले की, 'वास्तुशात करणारा मार्क्सवादी, मुंज करणारा समाजवादी, बायकोला समजावून सागण्याऐवजी मारहाण करणारा विचारवंत–असले आदर्श आज आमच्यासमोर आहेत !' साक्रीकरानी सांगितलेली वस्तुस्थिती अगदी खरी आहे !

बुद्धिवाद्याचा दांभिकपणा हा दोन तऱ्हेचा असू शकतो. एक तर त्याचे वर्तन नेहमीच बुद्धिवादी असते असे नाही. उक्ती एक आणि कृती एक अशी स्थिती असू शकते. दुसऱ्या पातळीवरील दांभिकता म्हणजे विविध प्रकारच्या प्रश्नांची बुद्धिवादी चिकित्सा करताना केला जाणारा पक्षपात. उदाहरणार्थ, संघवाले गरीब पडले म्हणून

मोठा बुद्धिवादी आव आणून त्याना ऊठसूठ धोपटायचं आणि इंदिरावाद्याच्या गुंडगिरीसमोर मात्र मूग गिळून गप्प बसायचं हे योग्य नव्हे. हिंदुधर्मावर सतत कोरडे ओढायचे आणि मुस्लिम धर्माबाबत, डोळ्याला पक्षपाती पट्टी बाधायची – हे चालायचं नाही वास्तविक पाहता मुस्लिमधर्म हा जगातला अत्यंत कडवा आणि परंपरानिष्ठ धर्म आहे. ह्या धर्मात हमीद दलवाईंसारखे सुधारक थोडे. हल्ली तर जगात मुस्लिम सर्वंकषवाद पुन्हा फोफावतोय. अशा वेळेला बुद्धिवाद्यांनी ह्या धर्माचीही स्पष्ट चिकित्सा करायला हवी. एका पुरुषाने चार बायका करण्यास अनुमती देणारी चाल ही नैतिकदृष्ट्या, स्त्रीस्वातंत्र्याच्या भूमिकेतून आणि लोकसंख्येला मर्यादा घालण्याच्या धोरणातूनही धिक्काराहंच आहे. साधी एखाद्या शहरातली एक मशीद रस्तारुंदीसाठी (नष्ट करण्याचा नव्हे, तर) हलवण्याचा प्रश्न घ्या. रस्तारुंदीमध्ये येणारं एखादं देऊळ जरूर हलवायला हवं; पण तशीच मशीदही हलवायला हवी! त्याला आंधळ्या अल्लाभक्तानी विरोध केला तर तो जुमानता कामा नये आणि मशीद हलवल्यावरही अल्लाभक्त त्या जागी नमाज पढू लागले तर त्यांचे फालतू लाड चालू देता कामा नयेत. ही भूमिका प्रसंग येतो तेव्हा बुद्धिवादी घेणार की नाही? दलित चळवळीबाबतही असेच म्हणता येईल. ह्या चळवळीला सहानुभूती असावी, तिला सहकार्यही द्यावे; पण हे करताना इतराप्रमाणेच दलितामधला जातीयवाद, धर्म 'शरण'ता आणि दांभिकता यावर टीका करायला हवी. 'बाबावाक्यं प्रमाणम्' हे केव्हाही वाईटच; पण ते बाबासाहेब आंबेडकराच्या अनुयायांमध्येही येत नाही ना, हेही तपासायला हवे. वाईट चाली, दुराग्रह, दोष, क्रौर्य, आंधळेपणा वगैरे गोष्टी कोणत्याही धर्मात, पंथात, जातीत किंवा पक्षात असल्या तरी त्या वाईटच असतात! एकदा बुद्धिवाद स्वीकारला की पक्षपात आणि कातडीबचाऊपणा चालायचा नाही! खऱ्या बुद्धिवाद्याजवळ फार मोठे धैर्य असावे लागते आणि धैर्य हे वारा वाहील तशी पाठ फिरवत नाही आणि पाशवी विरोधापुढेही नमत नाही!

## नास्तिकता आणि पौरोहित्य

आता थोडे आक्रमकतेबद्दल. समाजातल्या वाईट आणि बुद्धिहीन प्रथांवर टीका करणे हे बुद्धिवाद्याचे कर्तव्यच असते. त्यामुळे ते त्यानी परखडपणे पार पाडले तर त्याना दोष देण्याचे कारण नाही; पण अशी टीका करताना विवेक सुटू नये हे नक्की. ज्याच्यावर टीका करायची ते सुधारायला हवे असतील तर टीका अति आक्रमक आणि टवाळखोर असता कामा नये. कारण अशी टीका कितीही आकर्षक दिसली तरी ती वांझ असते! आता उदाहरणार्थ, डॉ. शरद अभ्यंकरांनी पंढरपूरच्या यात्रेवर लेख लिहिला तो कशासाठी? केवळ आपल्याला नाव मिळावं आणि मोबदला मिळावा एवढ्यासाठी खासच नव्हे! त्यांना ह्या यात्रेतला फोलपणा समजाला पटवून द्यायचाय म्हणून त्यानी अत्यंत कळकळीने लेख लिहिला; पण ह्या लेखाच्या शेवटी आलेल्या एका वाक्याचा विचार करू.–'असा हा भेदरट विठोबा, त्याचे उर्मट पुजारी, बावळट भक्त आणि ढोंगी मंत्री याची ही यात्रा...' हे वाक्य मोठ चमकदार आहे. कदाचित माझ्यासारख्या नास्तिक माणसाला ते वाचताना मोठी मजा वाटेल; कोणत्याही धर्मश्रद्ध देवभक्ताला हे वाक्य चांगलेच खटकेल! विशेषत: 'भेदरट विठोबा' आणि 'बावळट भक्त' ही विशेषणे त्याला कमालीची दुखावतील. साहजिकच असा माणूस म्हणेल, 'हा शिवराळ माणूस कोण आलाय आम्हाला शिकवणारा?' तेव्हा, ज्याला सुधारायचे, तोच माणूस आक्रमकतेमुळे असा दुरावणार! अभ्यंकरासारखी टीका आजवर अनेकांनी केली. अनेकांनी असले कडक लेख लिहिले; पण तरीही पंढरपूरला पाच लाख लोक जमताहेतच. हे असे का होते? याचा विचार व्हायला हवा! बुद्धिवाद्यांचे हे अपयश तर नव्हे ना? याचा दोष बुद्धिवाद्यांकडे तर जात नाही ना? माझ्या दृष्टीने तो दोष मुख्यत: बुद्धिवाद्यांकडेच जातो. बुद्धिवादाला विवेकवादाची आणि व्यवहारवादाची जोड नसेल तर बुद्धिवादाची दशा ही अशीच राहणार! अगदी निखळ बुद्धिवादाने जाणे व्यवहारात उपयोगी ठरत नाही. तसं पाहायला गेलं तर स्वातंत्र्य आणि समता ही तत्त्वं परस्परविरोधी आहेत; पण त्यांचा मेळ घातला जातो तेव्हा निखळ बुद्धिवादापेक्षा विवेक आणि व्यवहारवादाचा वापर केला जातो. जात, धर्म, प्रादेशिकता अशी बंधने बुद्धिवादाने तोडली तरी राष्ट्रवादाच्या बंधनात आपण अडकतो तेव्हा विवेकाने बुद्धीला थोपवलेले असते. नास्तिक लक्ष्मणशास्त्रींनी सोमनाथांची प्राणप्रतिष्ठा केली यावर खुलासा देताना डॉ. अभ्यंकर अशा अर्थाचे स्पष्टीकरण देतात की, अस्पृश्यांना पूजेचा अधिकार असावा, या गोष्टीला विरोध करून शंकराचार्य आणि पूजाशास्त्राधिकाऱ्यांनी प्राणप्रतिष्ठेला नकार दिला होता. तेव्हा समाजातील मोठ्या घटकावरील अन्याय दूर व्हावा म्हणून शास्त्रीबुवा वैयक्तिक मताला मुरड घालून प्राणप्रतिष्ठेसाठी पुढे सरसावले. आता लक्षात घ्या की, निखळ बुद्धिवादात हे बसते का? कोणत्याही कारणासाठी का होईना, नास्तिकाने पौरोहित्य करणे हा काय बुद्धिवाद झाला? एखादा निखळ बुद्धिवादी अस्पृश्यांना म्हणाला असता, 'नाही ना तुम्हाला पूजेचा अधिकार? खुशाल नसू दे! अरे, ज्याची पूजा करायची, तो देव ही चीजच मुळी अस्तित्वात नाही! तेव्हा पूजा करण्यात आणि देवभक्तीत जे मॅनअवर्स वाया जातात, ते जर तुम्ही दुसरीकडे कारणी लावलेत तर तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल! तुमच्या उद्धाराचा तो एक महत्त्वाचा मार्ग आहे.'–पण असे न करता मताला (अर्थातच बुद्धीलाही) मुरड घालून शास्त्रीबुवांनी पौरोहित्य केले. ते करण्यात त्यांनी विवेकच केला ना? व्यवहारच पाहिला ना?

प्रा. गो. मा. पवार यांनी आपल्या 'विवेकनिष्ठ जीवनदृष्टी' ह्या पुस्तकात 'बुद्धिवाद' याऐवजी 'विवेकवाद' हा शब्द वापरलाय. तो मला जास्त व्यापक आणि योग्य वाटतो. प्रा. पवार विवेकबुद्धीबद्दल आपल्या पुस्तकात म्हणतात, 'माणसाची सारासार विचार करण्याची शक्ती म्हणजे विवेकबुद्धी, असे आपणास स्थूल मानाने म्हणता येईल. विवेकबुद्धी दोन क्षेत्रात काम करीत असते. ज्ञानाच्या क्षेत्रात आणि आचरणाच्या क्षेत्रात. ज्ञानाच्या क्षेत्रात विवेकबुद्धीला सत्य-असत्याचा विवेक करावयाचा असतो. सत्य काय याचा निर्णय घ्यावयाचा असतो. आचरणाच्या क्षेत्रात इष्ट-अनिष्ट अथवा चांगले-वाईट याचा विवेक करायचा असतो.' याच पुस्-

कांला लिहिलेल्या प्रस्तावनेत दि. के. बेडेकर म्हणतात, 'खरी विवेकनिष्ठा मानवी तर्कबुद्धीबरोबरच श्रद्धेला, कल्पनाशक्तीलाही सामावणारी असते.' अगदी यथार्थ आहे हे म्हणणे.

आम्हाला हवाय तो विवेकी आणि व्यवहारवादी बुद्धिवाद, आक्रमक, टवाळखोर, टोकाला जाणारा आणि वाझोटा बुद्धिवाद आम्हाला नकोय. ज्यांच्यात सुधारणा करायची, ज्यांना बुद्धिवादी बनवायचंय त्यांना झिडकारणारा तुसडा बुद्धिवाद आम्हाला नकोय! त्यांना बरोबर घेऊन् जाणारा समंजस बुद्धिवाद आम्हाला हवाय! बुद्धी आणि भावना, तर्क आणि श्रद्धा, तत्त्व आणि व्यवहार याचा विवेकनिष्ठ मेळ घालण्याची नितांत आवश्यकता आहे. तो मेळ जोवर घातला जात नाही तोवर आमच्या 'रोहिणी'चे रहस्य आमच्या गंगम्माला समजायचे नाही!

आपल्या देशात अजूनही खऱ्या अर्थाने प्रबोधन झालेले नाही. आपला समाज अजूनही बराचसा मध्ययुगीन अवस्थेत आहे. या समाजात अडाणी गंगम्मा आहेतच; पण ग्रहणात दार बंद करून बसणारे सुशिक्षित आणि वैज्ञानिक प्रयोगाच्या यशासाठी पूजा करणारे शास्त्रज्ञही आहेत! मुकुंदराव किर्लोस्करांचे, 'शिक्षणाने बुद्धिवाद वाढलेला नाही' हे पुण्यातील २६ जुलैच्या मेळाव्यात मांडलेले निरीक्षण अक्षरश: खरे आहे. तेव्हा अशा समाजात बुद्धिवादी चळवळ उभी करायची तर तिला 'चळवळ' म्हणण्याइतपत तरी यश यायला हवे. मेळाव्यात डॉ. अरुण लिमये यांनी म्हटल्याप्रमाणे बुद्धिवादी कार्यकर्त्यांची फौज उभी करायला हवी; पण ही फौज आणणार कोठून? आपल्या समाजातूनच ना? मग, कितीही टिंगल केली किंवा बंदीचा बडगा दाखवला तरी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला अधिकाधिक कार्यकर्ते मिळत जातात; कितीही शिव्याशाप दिले, तरी विठ्ठलाच्या पायावर नम्र होणारी डोकी वाढतात; आणि आपल्या मेळाव्याला म. सा. प. चा हॉलदेखील भरत नाही—यामागील रहस्य बुद्धिवाद्यांनी शोधायला हवे! आपल्या आक्रमकतेला लगाम घालून सामान्यजनाशी सहाभूतीनं वागलं पाहिजे. अशी सहानुभूती बाळगण्यालाही काही महत्त्वाची कारणं आहेत. प्रा. स. शि. भावे यानी २६ जुलैच्या मेळाव्यात ती स्पष्ट केली.-माणसांकडे अनुवांशिकतेने येणारी बुद्धी सारखीच नसते. बुद्धीचे वाटप हे विषम असते. आपले समाजीकरण कसे व्हावे, आपल्यावर कोणते संस्कार व्हावेत हे व्यक्तीच्या हातात नसते. मानवी जीवनात बुद्धीप्रमाणेच भावनेला महत्त्व असते. मृत्यूची भीती माणसाला पूर्ण बुद्धिवादी बनू देत नाही. माणसाच्या मेंदूची उत्क्राती पुरेशी झालेली नसल्याने त्याच्या मनात सतत द्वंद्व असते.—हे असे घटक लक्षात घेतले तर सामान्य माणसाबद्दल सहानुभूती बाळगण्याची आवश्यकता का आहे, हे समजेल. तेव्हा, सामान्य माणसाला समजावून घेतलं पाहिजे आणि समजावून दिलं पाहिजे. डावपेचांचा भाग म्हणून का होईना, त्यासाठी तडजोड करायला हवी.

## अमेरिका—रशियातील धर्म

तडजोडीच्या संदर्भात धर्म आणि बुद्धिवाद या दोन गोष्टीची थोडी विस्ताराने चर्चा करणे मला आवश्यक वाटते. प्रथम मी हे स्पष्ट करतो की, मी स्वत: नास्तिक आहे, इहवादी आहे. कोणत्याही धर्माबद्दल मला प्रेमही नाही आणि दुष्ट पूर्वग्रहही नाही. धर्म ही सामान्यत: मानवी प्रगतीच्या मार्गातली एक घोड असते असे मी मानतो. तथाकथित धर्मांपासून मुक्त अशा समाजात राहणे मला आवडेल; पण असे सर्व असूनही, आपल्या समाजाचा किंवा एकूणच मानवी समाजाचा विचार करताना धर्म दुर्लक्षून चालणार नाही, 'धर्म नष्ट करा!' असा हेका धरून चालणार नाही आणि धर्माशी थोडी तडजोड केल्यावाचून भागणार नाही, असे मी मानतो. कारण वस्तुस्थितीचे भान ठेवून मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. आपल्या देशातल्या सामान्यजनांवर धर्माचा किती विलक्षण पगडा आहे, हे नव्याने सांगायला नको. आपला समाज मध्ययुगीन आहे म्हणून एक वेळ तो बाजूला ठेवू; पण जेथे प्रबोधन झाले, धर्मसुधारणेच्या चळवळी झाल्या, अनेक महान क्रांत्या झाल्या आणि विज्ञान—संस्कृती विकसित झाली, त्या युरोप—अमेरिकेचे काय? आधी एक छोटंसं उदाहरण सांगतो. विंबल्डन टेनिस स्पर्धेतला या वर्षीचा अंतिम सामना अनेकानी टी. व्ही. वर पाहिला असेल. ह्या रोमहर्षक सामन्यात जेव्हा बियॉन बोर्ग विजयी झाला, तेव्हा त्या विक्रमी टेनिस—सम्राटाने जमिनीवर गुडघे टेकून आकाशाकडे पाहिले आणि ईश्वराला विनम्र अभिवादन केले. महान कर्तृत्व सिद्ध करून मग श्रद्धेचं प्रदर्शन करणाऱ्या ह्या जादुगाराला आम्ही हसणार का? त्याची आणि तो जिचं प्रतिनिधित्व करतो त्या संस्कृतीची आम्ही टवाळी उडविणार का? तर नाही. ते योग्य नव्हे! मला तर त्या प्रसंगी क्षणभर असं वाटून गेलं की, आत्ता बोर्गवर आकाशातून पुष्पवृष्टी व्हावी. (याला भावना म्हणतात!) मध्यंतरी 'SPAN' च्या एका अंकात (ऑगस्ट १९८०) अमेरिकेतील धर्माबद्दल थोडीशी माहिती छापून आलीय. त्यातली आकडेवारी असं सांगते की, अमेरिकेतले ९५ टक्के लोक ईश्वर मानतात आणि दर १० लोकांमागे ६ लोक त्यांच्या जीवनात धर्मश्रद्धा 'अत्यंत महत्त्वाची," मानतात. अमेरिकेचे उदाहरणही एक वेळ सोडून देऊ; पण 'धर्म ही अफूची गोळी आहे' असं मानणाऱ्या साम्यवाद्याच्या रशियात सुद्धा धर्म आहेच! 'सोव्हिएट देश'चा २३ मार्च १९८० चा अंक याची साक्ष देतो. रशियन राज्यघटनेचे ५२ वे कलम नागरिकांना श्रद्धास्वातंत्र्य, पूजास्वातंत्र्य बहाल करते. रशियात धार्मिक संघटनांना कायदेशीर संरक्षण दिलेले आहे. ५० निरनिराळी धार्मिक प्रकाशने सोव्हिएत संघराज्यात काढण्यात येतात. आणि हे कशाला, रशियाचे अध्यक्ष लिओनिद ब्रेझनेव हे शस्त्रास्त्रनियंत्रणाच्या संबंधात अमेरिकन अध्यक्ष जिमी कार्टर याना काय म्हणाले माहितीय? "God will not forgive us if we fail." (आधार : 'Indian Express' १८ जून १९७९, पृष्ठ १) आता बोला! साम्यवादी रशियाच्या अध्यक्षाच्या तोंडीसुद्धा हा देव जाऊन बसला! आणि जेथे देव तेथे धर्म! आता हा धर्म तुम्ही केव्हा आणि कसा घालवणार? जर तो मानवी समाजाला इतका व्यापून टाकत असेल, जर बहुसंख्य मानवांची ती एक मानसिक गरज असेल, तर या धर्माशी थोडे जुळते—मिळते घ्यायलाच हवे!

महात्मा गांधीच्या नेतृत्वातल्या जादूमागचे रहस्य आपण शोधायला लागलो तर त्यांच्या धर्मसन्मुखतेपर्यंत आपण जाऊन पोहोचतो. (तो एकमेव नव्हे, तरी महत्त्वाचा घटक होता.) गांधीनी धर्मश्रद्धा'

ठोकरली नाहीच; पण ईश्वर आणि अल्ला अशा दोघांनाही सामावून घेऊन लोकांना पुढे नेले. भारतीय माणूस हा विलक्षण श्रद्धाळू आहे. त्याची हीच श्रद्धा गांधींनी स्वातंत्र्यलढ्याकडे वळवून घेतली. गांधींच्या मोठेपणाचे रहस्य यात आहे! आमच्या श्रद्धाळू वारकऱ्याला 'बावळट' म्हणून झोडपण्यापेक्षा त्याच्या श्रद्धेचे मानसशास्त्र जाणून घेऊन त्यातून काही व्यावहारिक दिशा शोधता येईल का याचा विचार बुद्धिवाद्यांनी अवश्य करायला हवा. येथे एक गोष्ट स्पष्ट करतो. धर्माशी व्यावहारिक तडजोड करावी याचा अर्थ सुधारणा करू नये, धर्माला शरण जावे आणि धर्माच्या नावाखाली काहीही खपवून घ्यावे, असा नव्हे. मार्टिन ल्यूथरने धर्मसुधारणेची चळवळ उभी केली; पण धर्म मोडीत काढला नाही! राजा राममोहन रॉय यांच्यापासून महर्षी शिंद्यांपर्यंत अनेक भारतीय सुधारकानी धर्माशी फारकत न घेता धर्मसुधारणेचा लढा दिला. ह्या सर्व सुधारकांना आपण बुद्धिहीन म्हणणार की काय? बुद्धी, विवेक आणि व्यवहार याचा त्यांच्या कार्यात सुंदर मेळ घातला गेला हे लक्षात घ्यायला हवे. तेव्हा प्रश्न आहे तो व्यवहार म्हणून तरी समजुतीने वागण्याचा आहे. आमच्या सामान्य माणसाला ऊठसूठ हिणवण्यापेक्षा आणि झोडपण्यापेक्षा त्याला असं सांगायला पाहिजे की, ठेव बाबा तू तुझ्या देवावर श्रद्धा; पण बडव्यांची दादागिरी तर बंद व्हायला हवी की नको? देव आणि भक्त याच्यामध्ये दलालाची गरज आहे का? खुशाल साजरा कर तू गणेशोत्सव; पण बिचाऱ्या गणपतीबाप्पाला 'शोले'चे डायलॉग्ज आणि मुंगळा डान्सचं गाणं ऐकायचा त्रास का देतोस? आणि दारू ढोसून गुलालाबरोबर गुण का उधळतोस? श्रद्धा जरूर ठेव; पण खरा संत कोण हे ओळखायला शिक. रजनीशसारखे मुख्यतः श्रीमंतांचे आणि परकीयांचे विकृत 'बुवा' हे खरे संत, का रंजल्यागांजलेल्यासाठी आयुष्य वेचणारे खरे संत, हे तूच ठरव!'

बुद्धिवाद्यांनी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संदर्भही समजावून घ्यायला हवेत. या दृष्टीने पुण्यातल्या मेळाव्यात मांडल्या गेलेल्या काही विचारांचा उल्लेख करतो. डॉ. अनिल अवचट यानी बुवाबाजीचे 'वर्गीय' स्वरूप स्पष्ट केले. खालच्या वर्गातल्या समाजाला अंगात येणारा मांत्रिक बुवा असतो. मध्यमवर्गाला कुंडलिनी जागृत करणारा 'सोफिस्टिकेटेड' महाराज लागतो, तर वरिष्ठ वर्गाला रजनीशासारखा श्रीमंती थाटाचा बुवा लागतो. अवचटांच्या मते बुवाबाजीमागेही जातीयता असते. उदा. गुळवणीमहाराज किंवा न्यायरत्न विनोद हे मुख्यतः ब्राह्मणांचे 'बुवा' होते. एक मराठ्यांनाच कोणी बुवा नव्हता,तर तोही दत्ता बाळांच्या रूपाने मिळालाय! डॉ. अवचटांचं विवेचन गंभीरपणे विचारात घेतलं तर आपण आपल्या समाजस्थितीकडे जाऊन पोहोचतो. प्रा. रावसाहेब कसबे यांच्या भाषणात अंधश्रद्धेच्या प्रश्नाची आर्थिक बाजू स्पष्ट झाली. विशेषतः त्यांनी, 'नोकरी देत असाल तर पोतराजकी सोडतो' असं म्हणणारा पोतराज आणि 'दे दान सुटे गिराण' ही प्रथा सक्तीने बंद केली तर त्यामुळे अन्नवस्त्राला वंचित होणारी बाई यांची जी उदाहरणे दिली ती मोठी बोलकी होती. मुकुंदराव किर्लोस्करानी अंधश्रद्धेच्या प्रश्नाच्या राजकीय संदर्भाला स्पर्श केला. त्यांच्या मते बुद्धिवादाचे सगळ्यात मोठे शत्रू धार्मिक 'बुवा' नसून राजकारणी 'बुवा' आहेत! समाजातल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आमच्या खिशात आहे असा आव ते आणतात आणि लोकाना सुचवतात, 'तुम्ही विचार करू नका, सारं आम्हालाच समजतं!' ह्या तिन्ही वक्त्यांच्या विवेचनातला मुख्य सूर असा होता की, विविध रूढी, परंपरा, अंधश्रद्धा याचा फार खोलात शिरून विचार करायला हवा. आपली सामाजिक परिस्थिती, आर्थिक समस्या, राजकारणाचे स्वरूप हे सारे लक्षात घ्यायला हवे आणि बदलाची प्रक्रिया तेथूनच सुरू करायला हवी.

## नवे प्रश्न

थोडक्यात, आमचे बुद्धिवादी सारखे ज्या फांद्या तोडताहेत त्यांची मुळं आमच्या राजकारणात, समाजकारणात आणि अर्थकारणात आहेत, हे त्यानी विसरू नये. बुद्धिवादाची चळवळ उभी करायची असेल तर या सर्व आघाड्यावर लढायची तयारी ठेवायलाच हवी. आज डॉ. अभ्यंकर असं म्हणू शकतात की, 'समाजघातक ठरणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा आम्ही बीमोड करू असा काही बुद्धिवाद्याचा दावा नसतो' पण उद्या जर ते चळवळीत पडले तर त्याना अशा बीमोडासाठी झटावेच लागेल. जेव्हा तुम्ही व्यक्तिगत जीवनात बुद्धिवादी म्हणवता तेव्हा आम्ही तुम्हाला काही शिकवायला येत नाही; पण जेव्हा बुद्धिवादाची चळवळ तुम्ही उभी करता, तेव्हा आम्ही नक्कीच मोठ्या अपेक्षा ठेवणार! शेवटी, बुद्धिवादाची चळवळ चालवणे हे काही एखादं भजनीमंडळ किंवा हौशी महिलामंडळ चालविण्याइतकं सोपं आणि छोटं काम नव्हे! बुद्धिवादाची चळवळ ही व्यापक प्रबोधनाची चळवळ असेल तो काही टिंगलटवाळी करण्याचा अड्डा नव्हे!

ह्या चळवळीच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या प्रश्नांकडे मी लक्ष वेधतो. बुवाबाजी, गोहत्या, पंढरीची वारी, भविष्य अशा ठराविक विषयावरचा काथ्याकूट आमचे बुद्धिवादी सतत करतात. त्यांनी आता जरा नव्या दिशा धुडाळाव्यात. नवे प्रश्नही हाती घ्यावेत. वेगळ्या मुद्द्यांचाही विचार करावा. प्रश्न अनेक आहेत. विचारासाठी त्यातले काही समोर ठेवतोय.

एक प्रश्न माजगावकरांनी आपल्या लेखात मांडलाय. मंडलिकांनी 'इच्छामृत्यू' संबंधी समाजाला जे आवाहन केलंय त्याची बुद्धिवादी चिकित्सा आणि व्यावहारिक विचार व्हायला पाहिजे. तसेच ज्यांचे कार्य थंडावले आहे अशा वृद्ध लोकांच्या मृत्यूबाबत आपण जे खोटारडे दुःखसोहळे करतो त्याबाबतची माजगावकराची टीका बुद्धिवाद्यानी विचारात घ्यावी. (मृत्यू ही गोष्ट एकूणच आम्ही किती हास्यास्पद करतो याचे अप्रतिम उपरोधिक चित्र सतीश आळेकरांच्या 'महानिर्वाण' या नाटकात रंगवलेले आहे. त्याचा उल्लेख करण्याचा मोह अनिवार्य आहे!) राष्ट्रीयनेत्यांचे मृत्यू, त्या मृत्यूचे अवडंबर, त्या मृत्यूंमुळे मिळणाऱ्या सुट्ट्या (अभ्यंकर, करा वायाजाणाऱ्या वर्किंगअवर्सचा हिशेब!), मृत्यूनंतर वाहिल्या जाणाऱ्या श्रद्धांजल्या आणि त्यातला ढोंगीपणा, रेडिओवरची असह्य रडगाणी ह्या सगळ्याची बुद्धिवादी चिकित्सा व्हायला हवीय!

विचारात घेण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे आपल्याकडची व्यक्तिपूजा! आपल्या लोकाचा तो एक राष्ट्रीय दुर्गुणच आहे! गांधी,

नेहरू, जयप्रकाश, शिवाजी, आंबेडकर अशा सगळ्यांचं मोठेपण निर्विवाद आहे त्यांच्याबद्दल कृतज्ञताभाव अवश्य बाळगायला हवा. त्यांच्या जीवनातून आणि विचारातून काही शिकायलाही हवं; पण त्यांची अतिरेकी व्यक्तिपूजा कितपत योग्य आहे? त्यांचे ज्या पद्धतीने देव्हारे माजवले गेलेत, ती एक भयानक अंधश्रद्धाच नव्हे काय? इतके दिवस निदान कर्तृत्ववान श्रेष्ठ विभूतींची तरी आपण पूजा करत आलो; पण आता संजय गांधीसारख्या सामान्य दर्जाच्या माणसाचीही आंधळी पूजा आमच्याकडे होत आहे! ह्या तरुणाचा अपघाती मृत्यू अत्यंत धक्कादायक होता यात वाद नाही; पण ह्या मृत्यूमुळे लगेच त्या व्यक्तीला हुतात्मा आणि महात्मा बनवू पाहणे कितपत योग्य आहे? येशू ख्रिस्त, अलेक्झांडर द ग्रेट, टिपू सुलतान आणि विवेकानंद हे सगळे ३३ व्या वर्षी मरण पावले आणि संजय गांधीही ३३ वर्षीच मरण पावले, त्या अर्थी संजयजीही ह्या सर्वांइतकेच थोर होते, असे अजब अंकगणित आमच्याकडे मांडले जाते! तेव्हा आपल्याकडच्या अशा आंधळ्या व्यक्तिपूजेची बुद्धिवादी चिकित्सा होण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

लैंगिक शिक्षणाचा प्रश्नही बुद्धिवाद्यांनी जरूर विचारात घ्यावा. मुलांच्या व्यक्तिमत्त्वविकासात लैंगिक गोष्टींविषयीचे अज्ञान आणि भीती यामुळे काही प्रश्न निर्माण होतात हे लक्षात घेऊन आजच्या बदलत्या काळात आणि समाजात विशिष्ट वयाच्या मुलांना पद्धतशीर लैंगिक शिक्षण देणे अप्रस्तुत ठरू नये; पाप तर नक्कीच ठरू नये. अशा व्यापक शिक्षणाला किंवा एकूणच लैंगिक व्यवहारांना जे पाप समजतात त्यांना बुद्धिवाद्यांनी योग्य उत्तरे देण्याची आवश्यकता आहे.

स्त्रियांच्या प्रश्नाचीही बुद्धिवाद्यांनी गंभीर दखल घ्यावी. एक स्त्री पंतप्रधान झाली की तेवढ्याने काही देशातल्या स्त्रियांचे प्रश्न सुटत नसतात. देवदासीची दुष्ट प्रथा अद्यापही अस्तित्वात आहे. बलात्काराच्या बातम्या आपल्या रोज छापून येत आहेतच. स्त्री पुरुषांमधली आदर्श समता सोडा; पण स्त्रीला साधी माणुसकी, सहानुभूती आणि न्यायाची वागणूक तरी मिळावी का नाही? पुरुषांनी स्त्रियांवर किती गुलामगिरी लादलीय आणि तशी ती लादणे बुद्धिवादात बसते का याची चिकित्सा व्हायला हवी. डॉ. अभ्यंकर यानी पंढरपूर-यात्रेमुळे वाया जाणाऱ्या मॅनअवर्सचं गणित मांडलय. अशा गणितात त्याना असणारा रस लक्षात घेता दुसरे एक गणित त्यांच्यासमोर ठेवतो. आतरराष्ट्रीय मजूरसंघाने ( ILO ) दिलेली ही आकडेवारी आहे–स्त्रिया आणि मुली जगाच्या लोकसंख्येत निम्म्या आहेत; पण जगाच्या एकूण कामाच्या तासांपैकी ( working hours ) दोन-तृतियांश इतके काम त्या करतात. ( अधिक माहितीसाठी जिज्ञासूनी ३ ऑगस्ट १९८० च्या 'Sunday Standard' मधला Peter Adamson यांचा 'The Breadwinners' हा लेख अवश्य वाचावा. ) याचा अर्थ, स्त्रिया आणि पुरुष यांची संख्या साधारणपणे समसमान आहे. पुरुष अधिक शक्तीशाली असतात असे म्हणतात; पण काम मात्र स्त्रियाच जास्त करतात. बुद्धिवादी याची दखल घेतील काय? स्त्री मुक्ती, अशा मुक्तीची आवश्यकता आणि त्या मुक्तीची मर्यादा–या साऱ्याच गोष्टींची बुद्धिवादी चिकित्सा होण्याची आणि त्यातून काही व्यावहारिक फलित शोधून काढण्याची आज नितांत गरज आहे.

तेव्हा, प्रश्न खूप आहेत. आव्हानं मोठी आहेत. काम प्रचंड आहे. मुख्य म्हणजे बुवाबाजी, पंढरपूरयात्रा वगैरे तेच तेच ठराविक प्रश्न उकरून काढून नुसत्या बौद्धिक कसरती करण्याने काही काम भागणारे नाही. बुद्धिवाद ही काही अशा चार-दोन प्रश्नाभोवती नाचवायची बाहुली नव्हे, तर ती एक जीवनदृष्टी आहे म्हणूनच तिची कक्षा फार व्यापक आहे. ह्या व्यापकतेचे भान सुटता कामा नये. बुद्धिवादाची आणि बुद्धिवादी चळवळीची आवश्यकता नक्कीच आहे. फक्त ही चळवळ विवेकवादी, व्यवहारवादी, सामान्यजनाबद्दल सहानुभूती बाळगणारी आणि सृजनशील असावी. अशा चळवळीचे स्वागतच आहे. ती जन्मो, जगो आणि वृद्धिंगत होवो! □

## आदिवासींच्या मुक्तीसाठी काळ्या गुळाचा व्यापार बंद पाडा!

आदिवासींना हातभट्टीच्या दारूचे व्यसन लावून लुबाडण्याची प्रथा डहाणू तलासरी यासारख्या आदिवासी विभागात फार पूर्वीपासून रुजलेली आहे. मोहाच्या फुलापासून तयार केलेली दारू मौज मजेसाठी पिणाऱ्या आदिवासीला काळा गूळ व नवसागर यापासून तयार केलेल्या दारूचे व्यसन लावण्यात आले आहे. उत्तर प्रदेशातून रेल्वेने हा काळागूळ आदिवासी विभागात आणला जातो. हा गूळ माणसांनी खाण्यास अयोग्य असतो. त्यापासून दारू पाडली जाते. दारू पाडणे, विकणे व पिणे या सर्व गोष्टी आदिवासी करतात. यापासून फायदा मात्र उत्तरप्रदेशच्या गूळउत्पादकाना व स्थानिक गूळव्यापाऱ्याना होतो आणि याच्या बळावर आदिवासीना व्यसनी ठरवून त्यांची पिळवणूक करण्याचा मालदारांना परवाना मिळतो. या सर्व व्यवहाराची व्याप्ती प्रचंड आहे.

उत्तरप्रदेशातून डहाणूरोड रेल्वेस्टेशनवर दररोज एक लाख किलो वजनाच्या एक लाख पंचाहत्तर हजार रुपये किंमतीच्या काळ्या गुळाच्या पाच वाघिणी रिकाम्या केल्या जातात. यातला गूळ प्रामुख्याने डहाणू व तलासरी तालुक्यांत विकला जातो. डहाणू तालुक्यात डहाणू, आशागड, गंजाड, कासा, सायवान, धुंदलवाडी व आबोली अशा सात व तलासरी तालुक्यात उधवा व तलासरी अशा दोन बाजार असणाऱ्या गावांमध्ये तो मोठ्या प्रमाणात विकला जातो. अशा बाजाराच्या गावात साधारणपणे पाच दुकाने हा गूळ विकण्याचा धंदा करतात. प्रत्येक दुकानदार आजही दिवसात सरासरी पाचशे किलो गूळ विकतो. आज लोकांकडे जेवणासाठीही पैसा नाही अशा वेळी दुकानदार दिवसाला बाराशेपन्नास रुपयांचा काळा गूळ विकतो. सुगीच्या दिवसात आठवड्याच्या बाजाराच्या दिवशी तर गुळाची विक्री दुपटीने होते. माणसाना खाण्यासाठी पूर्णपणे निरुपयोगी असणाऱ्या या गुळाचा एवढा प्रचंड व्यापार आदिवासी विभागात सुरू आहे; परंतु सरकारी अंमलदार व पोलिस या प्रकाराकडे सोइस्करपणे डोळेझाक करत आहेत.

सरकारी अंमलदार म्हणतात की, हा गुळाचा व्यापार आम्ही कायद्याने बंद करू शकत नाही. कारण हा गूळ पशुखाद्य म्हणून विकला जातो. परंतु असे असले तरी स्थानिक पातळीवरचे सरकारी कर्मचारी व पोलीस, आदिवासींना दारू गाळतात म्हणून दमदाटी करण्यास, त्यांच्याकडून हप्ते वसूल करण्यास मागेपुढे पहात नाहीत. अशा रीतीने काळ्या गुळाचा व्यापार हा सर्व बिगरआदिवासीना फायदेशीर ठरतो. आदिवासीची पिळवणूक, लूटमार वाढवण्यास हा व्यापार बंद पडला पाहिजे. सरकारने गुळाच्या व्यापाराला बंदी केली पाहिजे!

माणसाला अपाय करणारा हा गूळ उत्तरप्रदेशसारख्या दूरच्या ठिकाणाहून सरकारी रेल्वेने येथे येतो. त्याला प्रतिबंध करणे ही गोष्ट शासनाला अवघड नाही. एका बाजूला गुळाची वाहतूक बंद करून त्याच्या विक्रीवर काही नियंत्रणे लादून व दुसऱ्या बाजूने लोकशिक्षणाद्वारे लोकाना तो विकत न घेण्यास प्रवृत्त करून सरकार या प्रकाराला आळा घालू शकेल. तसेच या अनिष्ट व्यापाराविरुद्ध जे लोक आंदोलन करू इच्छितात त्यांना सहकार्य देणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. आम्ही या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधीत आहोत. सरकारने व शासनाने आम्हाला सहकार्य द्यावे.

[ कष्टकरी संघटना, डहाणू, यामार्फत प्रसृत झालेले एक पत्रक. ]




लेखकाच्या मध्यपूर्वेतील
मनमुराद भटकंतीवर
व
इराणमधील वास्तव्यावर
आधारलेली वेगळी
लेखमाला

□

लेखांक चवथा

# शहा अब्बासने वसवलेल्या इस्फहान नगरीत

माणूस नावाच्या द्विपाद प्राण्यानं 'उचलली जीभ आणि लावली टाळघाला' त्यातून वाणीचा जन्म झाला. वास्तविक षड्रसांचा आस्वाद घण्याचं कार्य मुख्यत: अभिप्रेत असलेली ही जीभ; पण मेंदूमधील अविचार-सुविचारांनी तिला प्रेरित केली. ती वळवळू लागली आणि माणूस बडबडू लागला. भाषणं देऊ लागला, उपदेश करू लागला, आश्वासनं देऊ लागला, धमक्या देऊ लागला. माणसाची ही अखंड बडबड जेव्हा केवळ श्रुतिस्मृतिद्वारा जतन करणं अवघड होऊ लागलं तेव्हा अक्षर जन्माला आलं. प्रथम नुसतीच चिन्हं, रेघा, ठिपके आणि खुणा. कालांतरानं ह्या खाणाखुणांना लयदार वळणं प्राप्त झाली आणि लिपी निर्माण झाली. दगडावर, भूर्जपत्रावर, ताम्रपटावर मानव वाचा कोरू लागला.

कोरून कोरून बोटं झिजू लागली आणि त्याच वेळी चीनमध्ये कुणी तरी कागद आणि शाईचा शोध लावला. कोरण्याऐवजी लिहिणं सुरू झालं. बोटांना थोडा दिलासा मिळाला; पण हा विसावा अल्पकाळच टिकला. माणसाच्या बडबडीचा वेग इतका प्रचंड वाढला की हस्तलेखनाची अवस्था सशाबरोबर स्पर्धा करणाऱ्या कासवासारखी झाली! बोटं थकू लागली. माणसाच्या भल्यामोठ्या मेंदूतील विचारांच्या वादळातून निर्माण होणाऱ्या वैखरीच्या धबधब्याबरोबर स्पर्धा करण्यासाठी छापखान्याची निर्मिती करण्यात आली. पत्रकं, मासिकं, दैनिकं, पुस्तकं ह्यांचा सुळसुळाट झाला. सर्वत्र रद्दीचं साम्राज्य सुरू झालं.

मानवानं प्रगतीचं (?) पहिलं पाऊल उचललं तेव्हा पृथ्वीवर अनेक देश आणि असंख्य भाषा अस्तित्वात आल्या होत्या. जगातील भाषाशास्त्रज्ञांच्या मते इराणमधील 'फार्स' ह्या प्रांतातील, म्हणजेच इस्फहान शिराझच्या परिसरातील प्राचीन आर्य लोकांची भाषा संस्कृत भाषा. ही सर्व आधुनिक युरोपियन भाषांची जननी. इराणमधील आर्यांच्या काही टोळ्या पाचसहा हजार वर्षांपूर्वी हिंदुकुश ओलांडून, खैबरखिंड पार करून भारतामध्ये आल्या. आपल्याबरोबर त्यांनी चातुर्वर्ण्य तर आणलाच; पण संस्कृत भाषा देखील आणली.

संस्कृतमधील मातृ, पितृ, भ्रातृचं फार्सी भाषेत मॉदर, पेदार आणि बरदार झालं आणि नंतर इंग्रजीत त्याचं रूपांतर मदर, फादर आणि ब्रदर असं झालं. युरोपियन भाषेमधील अनेक शब्दांचं मूळ संस्कृत–फार्सीमध्ये सापडतं. उदाहरणार्थ 'पद' म्हणजे पाऊल हा शब्द. ह्यापासून इंग्रजीत 'पेडल' आणि 'पेडेस्ट्रियन' हे शब्द निर्माण झाले. वास्तविक इंग्रजीत पाउलाला 'फूट' म्हणतात. त्यातून 'फुटल' आणि 'फुटेस्ट्रियन' असे शब्द झाले पाहिजेत. तसंच 'शंभर' ला इंग्रजीत 'हंड्रेड' म्हणतात; पण 'सेंचुरी' हा

शब्द संस्कृत 'शतम्' पासून झाला.

*ज्या पश्चिम आशियामधून मी भटकत होतो तेथील रहिवासी* स्वतःला पर्शियनऐवजी इराणी म्हणवून घेणं जास्त पसंत करतात. कारण उघड आहे. फार्स प्रातामधील आर्यांनी सम्राट कुरुष-ए-कबीरच्या नेतृत्वाखाली जेव्हा साम्राज्य स्थापन केलं तेव्हा फार्सचे साम्राज्य म्हणून पर्शिया' हा शब्द जन्माला आला; पण मूळ आर्यांचा 'आर्याना' म्हणजे आजचा इराण. 'फार्स' हा त्या इराण मधील केवळ एक प्रांत. ह्या 'आर्याना' शब्दाचं सेल्टिक भाषेत 'एरीन्' झालं. त्यातून 'ऐर' किंवा आयर्लंडचा जन्म झाला. म्हणूनच आयरिश लोक स्वतःला अजूनही ब्रिटनमधील अँग्लो-सॅक्सन लोकांच्यापेक्षा वेगळे मानतात.

*थोडक्यात काय तर माणूस जसजसा प्रगत (!) होऊ लागला* तसतसा भाषेचा खेळ वाढत गेला. शब्दाच्या सरमिसळीबरोबर सुविचार-कुविचारांची देवाणघेवाण वाढत गेली. ज्यांच्याकडे शब्दाचा प्रसार करण्याची साधनं मुबलक त्यांची विचारसरणी 'वाचकां' च्या मनावर नकळत पकड बसवू लागली. पृथ्वीवर वैचारिक युद्ध पसरलं. ज्यांच्याकडे प्रसारसाधनांची त्रुटी होती ते देश इतरांच्या छापील शब्दाला, आकाशवाणी संदेशाला आणि दृकश्राव्य माध्यमाद्वारा मिळणाऱ्या सूचनेला बळी पडू लागले. एक नवीन गुलामगिरी सुरू झाली. हा सर्व भाषेचाच खेळ !

आपल्याकडं देखील हा खेळ सुरू झाला. दुसऱ्या महायुद्धात *जर्मनीबरोबर लढून ब्रिटन खिळखिळं झालं आणि आम्हाला स्वराज्य* मिळालं. पाकिस्तानप्रमाणेच 'इंडिया दॅट इज भारत' नावाचा एक 'नवा' देश जन्माला आला. ह्या पुनर्जन्मित देशाला राष्ट्रीय एकात्मतेचं महत्त्व पटवून देता देता पंडित नेहरूंनी त्याची भाषावर प्रांतरचना करून टाकली आणि भाषेचा एक नवा खेळ सुरू झाला. हिंदुस्थानात फुटीर वृत्तीचं वारं वाहू लागलं. प्रत्येकाच्या भाषेचा खेळखंडोबा तर झालाच पण त्याचबरोबर राष्ट्रीय एकात्मतेचे तीन तेरा वाजण्याची वेळ देखील आली.

आपल्याला 'स्वराज्य' मिळालं त्याच सुमारास डच वसाहतवाद्यांच्या गुलामगिरीतून मुक्त होणाऱ्या स्वतंत्र इंडोनेशियाचं नेतृत्व सुकार्नोकडे होतं. सुकार्नो म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर येतो-मोठा जनानखाना बाळगणारा हुकुमशहा. अवर्ण लोकांच्या आंग्ल भाषेतील प्रसारयंत्रणेची ही किमया. त्याचं नेतृत्व करायची जबाबदारी सुकार्नोवर आली होती, तो इंडोनेशिया साडेतीन हजार बेटांचा एक समूह. साडेतीनहजार बेटांवर साडेतीनहजार बोलीभाषा. जितक्या भाषा तितक्या लिप्या सुकार्नोनं पहिला कायदा केला तो एकराष्ट्रीय भाषेचा. भाषा इंडोनेशिया त्यानं सर्वांना सक्तीनं शिकवली. इंडोनेशिया एकसंध केला.

त्याउलट आमचा प्रकार.भाषावार प्रांतरचनेनं राष्ट्रीय एकात्मता डळमळू लागली. सुदैवानं एकोणीसशेबासष्ट साली चीननं उत्तर सीमेवर जबरदस्त हमला केला. भाषापंडित शब्दचतुर लोकांची बोबडी वळली आणि राष्ट्रीय एकात्मतेची बंद पडत आलेली श्वसनक्रिया पुन्हा काम करू लागली. त्यानंतर पाकिस्ताननं सीमाप्रांतात अधूनमधून चोर-शिपायाचा खेळ खेळून आमच्या राष्ट्रीय एकात्मतेची काजळी धरलेली मिणमिणती ज्योत फुंकर घालून पेटवत ठेवली. अमेरिकेला ज्याप्रमाणे स्वतःच्या ऐहिक समृद्धीसाठी आणि *आर्थिक स्थिरतेसाठी जगामध्ये कुठं ना कुठं दारिद्रय, अस्थिरता* आणि लढाई आवश्यक असते त्याप्रमाणे आम्हाला आमची राष्ट्रीय एकात्मता जगविण्यासाठी उत्तरसीमेवर काही ना काही गोंधळ आवश्यक असतो. कारण हिमालयाचा परिसर जरा जरी शांत असला तरी आम्ही लगेच 'प्रांतीय' होतो, जातीयतावादी होतो, धर्मवादी होतो. खोलवर रुजलेले, कुजलेल्या विचारसणीतून जन्माला आलेले सडके अंतर्गत हेवेदावे उकरून काढून दंगल माजवत, धुमाकूळ घालत देश पेटविण्याच्या कामी लागतो.

फक्त पंधरा ऑगस्ट आणि सव्वीस जानेवारी ह्या दोनच दिवशी जिच्या नावानं तोरणं-पताका उभारण्याची आम्हाला सवय आहे, *त्या भारतमातेचं काळीज मात्र एरवी आम्ही पोखरत, त्याचे लचके* तोडण्यात स्वतःला धन्य मानतो. आम्ही बुद्धिप्रामाण्यवादी वगैरे असू; पण इतर देशांच्या तुलनेत आम्हा भारतीयांचा स्वदेशाभिमान अतिशय हिणकस दर्जाचा आहे. आम्ही आमच्या भारतीयत्वाबद्दल उदासीन आहोत. मायदेश सोडून इतर देशांतून भ्रमंती करताना आपली ही देशाभिमानशून्यता पदोपदी जाणवते. जपानी, कोरियन, इंडोनेशियन, मलेशियन, अफघाणी-इराणी ह्या साऱ्या-साऱ्यांना स्वतःच्या देशाचा जाज्वल्य अभिमान आहे. मग आम्हीच असे कसे? आमचा स्वदेशाभिमान गेला कुठे ? कसा गमावला ? गमावण्यापूर्वी अशा प्रकारचा स्वदेशाभिमान आम्हा सिंधुवासियांपाशी मुळात होता का ? आर्यांनी ह्या भूमीत पाऊल ठेवण्याअगोदर इथं वस्तीला असणाऱ्याच्या स्वाभिमानाचं काय झालं ? जियून आर्य आले, त्या इराणमध्ये भ्रमंती करून ह्या प्रश्नाचं उत्तर सापडणार का ? आमच्या आजच्या उदासीनतेचं कोडं सुटणार का ?

□

गाडीनं कोम शहर बरंच मागं टाकलं होतं. सर्फराझ आणि हैदरी गप्पागोष्टीत दंग होते. एकमेकांना ते पर्शियन 'जोकस' सांगत असावेत. बहुतेक विनोद चावटदेखील असावेत असं त्यांच्या हसण्यावरून वाटत होतं. मी बराच वेळ माझ्याच तंद्रीत असल्यामुळं सर्फराझनं माझ्याकडे लक्ष दिलं नव्हतं. मी बसल्या-बसल्याच सीटवर चाळवाचाळव केली. पाय ताणून आळस दिला आणि सिगरेट पेटवली. विचारांच्या स्वप्ननगरीतून मी इस्फहानच्या सडकेवर उतरल्याचं सर्फराझनं हेरलं. गाडीतील संत्र्यामुसंब्यांची सालं आणि खारवलेल्या बियांची टरफलं खिडकीतून सडकेवर फेकत सर्फराझ म्हणाला-'आमच्याकडं एक प्रसिद्ध म्हण आहे. आकाशातून उडणाऱ्या देवदूताना मानवी सवयी नाहीत हे किती भाग्याचं ! एरवी आकाशातून माणसावर सतत देवदूतांच्या मलमूत्राचा वर्षाव झाला असता. क्षणापूर्वी गाडीतील कचरा विनदिक्कत हमरस्त्यावर फेकून वर आणि ही म्हण ऐकवणारा सर्फराझ खरोखरच ग्रेट ! कागदी रुमालानं हात पुसून साफ करत घाण बोळा खिडकीतून बाहेर फेकत सर्फराझ म्हणाला, 'एक जोक सागतो ऐक-

'आम्ही इराणी माणसं खुषामत करण्यात पटाईत. एखाद्या गोष्टीची स्तुती करण्यात आम्ही कुणालाच हार जाणार नाही ! ती गोष्ट 'शाही' असेल तर मग विचारायलाच नको. जिभेची चामडी सोलून निघेपर्यंत आम्ही स्तुती करणार ! तर एकदा काय झालं, शहन-

शहानं देशातील सर्व शास्त्रज्ञाना पाचारण केलं आणि फर्मान सोडलं की, 'देशात उंदरांचा खूप सुळसुळाट झाला आहे. उंदरांपासून शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान होत आहे. अन्न-धान्याची प्रचंड प्रमाणावर नासधूस होत आहे. ह्यावर आळा घातलाच पाहिजे! उंदरांचा नाश करण्यासाठी नवीन शोध लावा, जालीम उपाययोजना ताबडतोब तयार करा!' शहनशहाचं फर्मान– अर्थातच सगळे शास्त्रज्ञ भराभरा संशोधनात गर्क झाले. कुणी विषारी गोळ्या तयार केल्या, कुणी नवीन प्रकारचे सापळे आणि कुणी कुणी काय काय बनवलं. शेवटी एका सुप्रभाती उंदीर मारण्यासाठी केलेल्या संशोधनाचं आणि उपाययोजनांच एक भव्य प्रदर्शन भरविण्यात आलं. शहेनशहानं जातीनं प्रत्येक वस्तू बारकाईनं न्याहाळत प्रदर्शनातून फिरू लागला. एका टेबलावरील वस्तूकडे मात्र पाहून काहीच अर्थबोध होईना, तेव्हा शहेनशहा थबकला. एका छोटयाशा फळीवर एक छोटीशी मखमली गादी होती. गादीच्या दोन्ही बाजूना दोन छोटीशी धारदार पाती लावली होती. ती वस्तू खूप वेळ पाहूनदेखील शहेनशहाला काहीच उमज पडेना. शहेनशहा विचारात पडलेला बघून ती वस्तू बनविणारा संशोधक नम्रतेनं म्हणाला,

## 'सावाक' आणि 'जोक'

'महाराज, परवानगी असेल तर मी ह्याचं स्पष्टीकरण करतो. मी हे जं उंदीरविनाशक यंत्र बनवलंय, ते आपल्या इराणी उंदराच्या स्वभावाचा संपूर्ण अभ्यास करूनच तयार केलंय. इराणी माणसाला मखमली मऊ आसन जसं प्रिय, तसंच आपल्या उंदराचं आहे. आता ह्या आसनासमोर शाही बर्फीचा एक तुकडा ठेवायचा. प्रथम आसन बघूनच उंदीर खूष होणार. त्यावर टुणकन् उडी मारून बसणार–समोर बर्फी पाहून तर त्याला स्वतःच्या भाग्याचाच हेवा वाटू लागणार! बर्फीचा तुकडा तोडताच त्या चाणाक्ष इराणी, उंदराच्या लक्षात येणार की, ही बर्फी मामुली नसून 'शाही बर्फी आहे...ताबडतोब तो 'वाह्–वाह्' म्हणत जोरजोरात मान हलवणार...आणि ह्या दोन धारदार पात्यामुळं त्याची खुषामत करणारी गर्दन छाटली जाणार......'

'आहे की नाही असली इराणी जोक?' असं म्हणून सर्फराझ जोरजोरात हसू लागला. हसता हसता एकदम गंभीर होऊन मला म्हणाला, 'अगा–ए–विजे–तू मात्र इराणमध्ये हा जोक कुणाला सागू नकोस ह! नाही तर भलतीच आफत...शहेनशहाबद्दल 'जोक' करायला एकदम मनाई आहे! वर्तमानपत्रात शहेनशहाचं कार्टून काढायला देखील सक्त मनाई आहे! 'सावाक'च्या (इराणमधील सरकारी गुप्त हेरसंघटना) कानावर असले जोक पडले तर आपली धडगत नाही–' आणि काहीसं चेष्टेनं तो हैदरीला म्हणाला,

'आगा–ए–हैदरी–तू तर 'सावाक'चा नाहीस ना?'

'छे–छे...पण तू नाहीस ना?' हैदरीनं प्रतिप्रश्न केला.

दोघाच्यात 'सावाक'बद्दल रसभरित चर्चा सुरू झाली. मला आपल्याकडे घडलेल्या उंदराच्या 'खऱ्या' जोकची आठवण झाली.

आपल्याकडील एका सरकारी विद्वानानं युनोमधील एका संस्थेला असं कळवलं होतं की, महाराष्ट्रामध्ये गणपतिपूजा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. गणपतीचं वाहन उंदीर आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी उंदीर मारण्यास तयार होत नाही. उंदरापासून होणारी प्रचंड हानी थांबवावयाची असेल तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अंधश्रद्धा प्रथम दूर केली पाहिजे. त्यासाठी ह्या अंधश्रद्धेचं मूळ शोधलं पाहिजे. गणेशमहिम्याचा शोध घेतला पाहिजे. हा शोध घेण्यासाठी कुशल, आणि अनुभवी समाजशास्त्रज्ञाच्या (म्हणजे स्वतःच्या) नेतृत्वाखाली एक 'टीम' तयार करावी लागेल. (त्यासाठी अदाजे पधरा लाख खर्च येईल. जिनिव्हा) आणि पॅरिस येथे इतर देशातील समाजशास्त्रज्ञाची परिषद भरवून चर्चासत्रं घेणं आवश्यक ठरेल.) एकदा मूळ सापडलं की, मग उंदराचं महत्त्व कमी करण्यासाठी कौशल्यपूर्ण अशा अनेक 'अँटी उंदीर' फिल्मस् बनविण्यात येतील. त्या दूरदर्शनवरून प्रसारित केल्या जातील. (शेतकऱ्याकडे टिव्हीसेट्स ही बाब गौण आहे, हे एकूण कार्यक्रमाचं 'गांभीर्य' ध्यानात घेता सहजच पटेल. लोकशिक्षण हेच भारतीय दूरदर्शनाचे अग्रक्रमाचं ध्येय आहे हे इथे मुद्दाम नमूद करावंसं वाटत. केवळ लोकांच्याकडे टिव्हीसेट्स नाहीत ह्या क्षुल्लक कारणावरून शिक्षणाकडे कानाडोळा करून चालणार नाही!) दूरदर्शनवरून उंदीरविरोधी मोहीम उघडल्यावर मग फिल्मसडिव्हिजनद्वारे इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराथी, कोकणी, आणि अहिराणी भाषेत लघुपट तयार करून ते महाराष्ट्रातील सर्व सिनेमागृहांतून दाखविण्यात येतील. ह्या सर्व प्रसारानं महाराष्ट्राच्या गरीब आणि कष्टाळू शेतकऱ्याची अंधश्रद्धा एकदाची दूर झाली की मग तो आपोआपच उंदीर मारण्यास प्रवृत्त होईल. (तरी कृपया ह्या योजनेस पन्नास लाख रुपये मंजूर करावेत!)

रोग कुठं आणि औषध कुठं! थोडक्यात काय तर विघ्नहर्त्याच्या नावानं 'अंधश्रद्धा' वगैरे शब्द वापरून पन्नास लाखांचा खर्च! परदेशी वाऱ्या वगैरे फसवाफसवी! त्या मराठी कुणब्याला माहीतही नसेल की, आपल्या नावानं जगभर काय काय उपद्व्याप चालले आहेत. त्याची आहे ती श्रद्धादेखील पातळ होण्याची वेळ आली असताना तो आता अंधश्रद्धा जपत थोडीच बसणार आहे!

## खस्ते ना बाशी......

–एका लहानशा डोगराची वळणं पार करून गाडी एका भव्य कमानीखालून गेली. नक्षीदार अक्षरात कमानीवर लिहिल होतं 'इस्फहान स्वागत करीत आहे' 'इस्फहान, नेस्फ–ए–जहान'– Is fahan is half the world –' सर्फराझनं खुलासा केला.. इराणचा सुप्रसिद्ध कवी सादी आपल्या 'गुलेस्तान' मध्ये– म्हणतो–'इस्फहानच्या तुलनेने कैरोदेखील एखाद्या वाडीवस्तीप्रमाणे वाटतं.' असं हे जगप्रसिद्ध शहर!

गाडी शहरात शिरली. हैदरी माझ्याकडे पहात म्हणाला, 'आगा–ए–विजे–' खस्ते ना बाशी' शब्दशः अर्थ 'दमू नको' पण म्हणण्याचा उद्देश 'आता प्रवास संपत आला आहे. तुझी थकावट लवकरच दूर होऊ दे!' इराणमधील अनेक चटका लावणाऱ्या प्रथापैकी ही एक गोड प्रथा. प्रवास संपला की बसमधील प्रवासी, ड्रायव्हर–कंडक्टरचे आभार मानून त्याला 'खस्ते ना बाशी' म्हणून सांगतात,

त्याचप्रमाणे ड्रायव्हर देखील प्रवाशांना प्रत्युत्तरादाखल तसंच म्हणतो. बराच वेळ एकमेक एकमेकांना 'मग 'खस्ते–ना–बाशी' म्हणत, आदाबपूर्वक रजा मागत, सलामाची देवाणघेवाण करत, आपआपलं सामान उचलून मार्गस्थ होतात. आपल्या एस्. टी. बसस्थानकावर असलं दृश्य आपल्या स्वप्नात तरी दिसेल का?

– शभर–दीडशे मशिदी असलेलं हे शहर अतिशय टुमदार दिसत होतं. शहरातील रस्ते आरशासारखे गुळगुळीत आणि स्वच्छ! तेहरानइतका ट्रॅफिक नव्हता. रस्त्याच्या दुतर्फा दाट झाडी. इथं तेहरानसारखा बांधकामाचा पसारा दिसत नव्हता. प्राचीन बांधकाम इतकं देखणं होत की, ते पाहून सिमेंट–कॉंक्रीटचे ठोकळे उभे कर- करण्याचं धाडस शहेनशहाला देखील झालं नसावं!

झायदे–रुद् नदी ओलांडताना, दूरवर दिसणारा एक अतिशय देखणा पूल दाखवत सर्फराझ म्हणाला, 'तो पूल शहाअब्बास राजानं बांधला...हा आपण जातोय तो नवा पूल हिंदी इंजिनिअर- सनी बांधला आहे.' नव्या पुलाला अर्थातच जुन्या पुलाची सर नव्हती. आपल्या इथं भव्य मोगलवास्तुशिल्पाचा निर्माता म्हणून शहाजहानला मानलं जातं, त्याचप्रमाणे, किंबहुना त्याहूनही अधिक इकडे शहाअब्बासला मानलं जातं. इस्फहान हे शहाअब्बासनं उभं केलेलं देखणं शहर. इराणी लोक इस्फहानला मोठ्या प्रेमानं 'देशाचा कंठमणी' असं म्हणतात!

इस्फहानमध्ये एक आठवड्याचा मुक्काम ठरला होता. राहण्या- साठी एका कारवानसरामध्ये–धर्मशाळेत–व्यवस्था करण्यात आली असल्याच सर्फराझनं सांगितलं. मी मनातल्या मनात जरासा नाराज झालो. इतक्या देखण्या शहरात एखाद्या चांगल्या हॉटेलमध्ये राहता आलं असतं तर बरं झालं असतं! निवांत खाजगी खोली असली म्हणजे दिवसभराच्या कामाचा आढावा घेऊन रिपोर्ट करणं सोपं जातं. धर्मशाळेत हे कसं काय जमणार?

कारवानसरामध्ये 'बिस्तरा' टाकण्याअगोदर दुपारचं जेवण उरकावं असं ठरलं. हैदरी आणि सर्फराझचं म्हणणं की, मी सकाळ- पासून काहीही खाल्लं नसल्यामुळं मला 'जख्म–मेदे' (पेप्टिक अल्सर) होण्याचा धोका, म्हणून न्याहारी आटोपून मगच विश्रांती- साठी 'मेहमूनसरा' पावण्यानं उतरण्याची जागा इथं जावं. मी केवळ निमित्त. ह्या दोघांनाच जेवणावर आडवा हात मारायचा आहे हे मी ओळखलं. अर्थात मला देखील भूक लागलीच होती.

'कुठ जेवण घ्यावं?' हा जणु काही अतिशय गहन आणि कूट– प्रश्न असल्याच्या थाटात दोघाच्यात मग चर्चा सुरू झाली. वीस– पचवीस रेस्टॉरंट्स्ची नावं आलटूनपालटून शेवटी एक 'चेलो कबाबी' निश्चित करण्यात आला.

हात धुऊन तोंडावर पाणी मारून टेबलापाशी आलो तर 'जेवायला काय मागवायचं?' ह्या विषयावर सर्फराझ–हैदरीमध्ये खुमासदार चर्चा रंगलेली. सकाळपासून एक गोष्ट माझ्या ध्यानात येत होती; काहीही करण्याअगोदर चर्चा–ही पुणेकरी सवय–इराणी माणसाना देखील असावी! फरक इतकाच की, इथं चर्चेतून एकमत आणि नतर कृती असा शिरस्ता दिसत होता. अर्थात चर्चेचा विषय 'भोजन' असल्यामुळं एकमत आणि झटपट कृती करण्यात अडचण येत नसावी. ही देखील पुणेकरी सवयच नाही का?

मेनू ठरला. काही क्षणातच समोर वाफाळलेल्या भाताचा प्रचंड डोंगर असलेली प्लेट आली. डोंगराच्या शिखरावर लोण्याची वडी– भाताच्या उष्णतेनं वितळणारी. पाघळलेलं लोणी भाताच्या डोंगरा– वरून ओढ्यानाल्याप्रमाणं वेडवाकडं वाहात प्लेटचा तळ गाठत होतं. भाताबरोबर फोडलेलं कच्चं अडं आणि खिम्याची भाजलेली सुरळी (कबाब–खुबीदे), फिकट हिरव्या रंगाचा दाट द्रव असलेला छोटा पेलादेखील होताच. माझ्या 'हमसफर'नी हिरवा पेला रिचवला– मी डोळे मिटले. त्यानी समोरच्या भातावर आणि खिम्याच्या सुरळीवर हल्ला चढवला. मी देखील मनातल्या मनात हरहर महादेव म्हणत काटा–चमचा घेऊन थाळीशी युद्ध सुरू केलं. पहिला घास रुचकर लागला. दुसरा त्याहूनही रुचकर लागला, तिसरा त्याहूनही हे 'चेलो–कबाब–खुबीदे' प्रकरण जिभेला सुख देणारं होतं. मला आनंदानं घास गिळताना बघून हैदरीनं एक सुटकेचा निश्वास टाकला. मला 'जख्म मेदे' होणार अशी भली मोठी चिंता त्याला ग्रासत होती ती दूर झाली असावी. मी मनात म्हटल इराणमध्ये 'जख्म–मेदे होण्याऐवजी' 'मेदवृद्धी' मात्र होणार हे निश्चित!

न्याहरी आटोपून आम्ही 'धर्मशाळा' गाठली आणि मी गारेगार झालो. एके काळी, शहा अब्बासच्या जमान्यात ही कारवानसराई होती; पण आता समोर दिसत होतं ते एक अतिभव्य हॉटेल–हॉटेल शहा अब्बास. इस्लामी वास्तुशिल्पाचा अप्रतिम देखणा नमुना!

पर्शियन गालीचे तुडवत सर्फराझच्या पाठोपाठ मी रिसेप्शन काउंटरकडे गेलो. नाव नोंदवलं आणि खोलीची किल्ली घेतली.

## 'जलसा'

–शहा अब्बास हॉटेलमधील ही खोली एखाद्या मोगल सम्राटाच्या खाजगी दालनाप्रमाणे सजवलेली होती. प्रशस्त पलंगाशेजारी लावलेल्या तैलचित्रातील 'मस्तानी' कोणत्याही क्षणी सजीव होऊन बाहेर येणार असं वाटू लागलं ह्या असल्या शृंगारलेल्या खोलीत एकट्यानं उठायचं, बसायचं, झोपायचं म्हणजे महाकठीण शिक्षा! सर्फराझनं विचारलं. 'धर्मशाळा आवडली?' मी उत्तराखल नुसताच हसलो. हैदरीला मात्र माझ्या मनातील विचार समजला असावा. माझ्याकडे पहात डोळे मिष्किलपणे उडवत तो म्हणाला, "शॉवर– घे–थोडी विश्रांती घे–बायकोला एक 'नामे' लिही, म्हणजे तुला बरं वाटेल. तीन वाजता मी तुला 'जलाशा'साठी न्यायला येतो'

दुपारी तीन वाजता, रमझानच्या दिवसात 'जलसा?' हैदरी नक्कीच चेष्टा करत असणार! कदाचित इस्फहानमध्ये असेलदेखील एखादी फेमस् कोठी. शहा अब्बाससारख्या रगील्या बादशहाचं हे गाव. माझ्या मनात तवाएफ् वगैरे सारखे शब्द उगाचच उचक्या देऊ लागले. सर्फराझनं ब्रीफकेस उघडून त्यातील एक फाइल हाती देत माझ्या हृदयात उमटणारी गझल कुस्करून तिचा चोळामोळा करत सूचना दिली – 'जमलंच तर वाचून ठेव फाइल. साडेतीन वाजता इस्फहानच्या गव्हर्नरबरोबर 'जलसा –' मीटिंग आहे. नुसती औपचारिक ओळखीची मीटिंग. – जलसा संपला की आपण एक प्रॉजेक्ट बघायला जाऊ!'

खुदा हाफीज करून सर्फराझ गेला. 'जलसा' म्हणजे मीटिंग हे ऐकून साफ पडलेला चेहरा सावरत मी बादशाही थाटाच्या गुसलघरात

हरवल्यासारखा बसून राहिलो. ह्या खोलीपेक्षा धर्मशाळा नक्कीच जास्त सुखावह झालो असतो. मला प्रवासाची खूप सवय. एकटं रहाण्याची सवय; पण मधूनच कधी तरी असा क्षण येतो की, हे एकटपण अतिशय असह्य होत. अशा वेळी तो क्षण तिथच विरू देणं आवश्यक असतं. मनावर एक विचित्र ताण येतो. त्यावर उपाय एकच ! एकाग्र चित्त होऊन डोक्यातील सर्व विचार बंद करायचे. सवयीन हे करता येतं आणि काही क्षण जरी विचारशून्य स्थिती प्राप्त झालो तरी मन एकदम प्रसन्न होऊन उठतं. सगळी मरगळ नाहीशी होते. रक्तामधून उत्साह खेळू लागतो. भोवतालचं वातावरण मग ते कसलही असो, सुसह्य होतं. अनेक वेळा मी हे अनुभवलं आहे.

बरोबर साडेतीन वाजता गव्हर्नरच्या ऑफिसवर 'जलशा' साठी पोहोचलो. गव्हर्नरसाहेब नमाझ पढत असल्यामुळे प्रतीक्षालयात थोडा वेळ थांबावं लागल. शेजारच्या एका खोलीमध्ये सातआठ सुटटायधारी ऑफिसर देखील मनोभावे नमाझ पढत होते. खाली हिरवळीवरती युनिफॉर्म घातलेले दोन गार्डस् कमरेची पिस्तुलं बाजूला ठेवून नमाझात दंग होते. इस्लामची ही गोष्ट, ही शिस्त खराखरच वाखणण्यासारखी. देवाला देखील चोरटा नमस्कार करणारे आम्ही. त्याउलट 'स्वत्व' संपूर्ण विसरून मक्केच्या दिशेनं तोंड करून अतिशय नम्रतेनं अल्लाला शरण जाणारे हे मुसलमान !

गव्हर्नरचा नमाझ संपला. आम्ही ऑफिसमध्ये गेलो. सगळा थाट राजेशाही. भितीवर राजाराणीचो भव्य तैलचित्रं. त्यांच्या मधोमध पण जरा खाली हसऱ्या चेहऱ्याच्या राजकुमार रेझाचं चित्र. प्रथम प्रथम माझं त्या तीन चित्राकडं वारंवार लक्ष जायचं. नंतर जळी, स्थळी, काष्ठा, पाषाणी, दुकानात, ऑफिसात, हॉटेलात सर्वत्र ती चित्रं बघून नजर मेली. चित्र असून देखील नसल्यासारखी झाली. बँकॉकमध्ये तिकडच्या राजाराणीचो चित्रं देखील सर्वत्र दिसायची. त्याच्या चित्रातून नम्रता प्रकट व्हायची. ह्या तीन चित्रांना मात्र दरबारी वलय असल्यासारखं वाटायचं. थायलंडचा राजा स्वतःला फक्त स्वत.च्या देशाचा राजा मानायचा. इराणचा बादशहा मोहम्मद रेझा पहेलवी स्वत.ला सम्राटाचा सम्राट शहेनशाह असं मानायचा !

–सर्फराझनं माझी ओळख करून दिली. गव्हर्नरसाहेबांना इंग्रजी येत नव्हत. फक्त फ्रेंच आणि माझं फ्रेंच 'कामांताले वूऽऽ' नंतर खलास ! त्यामुळं बातचीत का सवाल ही पैदा नहीं हुवा । गव्हर्नर दिसायला एकदम गंभीर ! हातात 'तस्पी' मण्यांशी खेळत घोगऱ्या आवाजात ते सर्फराझला काही सूचना देत होते. सर्फराझ वारंवार 'बाले कुर्बान'– 'बाऽऽले कुर्बान' म्हणत नोटस् घेतल्याचा बहाणा करत वहीच्या पानावर रेघोट्या काढत होता. बोलणं सगळं एकतर्फी. शब्दांना अधिकाराचा दर्प. खोलीत विनाकारण दबावाचं वातावरण. मला असल्या वातावरणाचा अतिशय तिटकारा. आपल्याकडे सचिवालयातील एखादा खडूस सरकारी सचीव उगाचच गंभीर चेहऱ्यानं निरर्थक उपदेश करत आजुबाजूला दबदबा निर्माण करण्याचा प्रयत्न करतो, तशातलाच हा प्रकार.

मला वाटतं मधल्या पातळीचे सर्व अधिकारी इस्फहानच्या ह्या गव्हर्नरसारखेच असतात. आपल्या अधिकाराची दुसऱ्याला सतत जाणीव करून देणारे त्या उलट ज्याच्या हाती खरी सत्ता असते त्याची निदान चारचौघातील वर्तणूक तरी नेहमी हसतमुख, मनमिळावू अशी असते (एक मोरारजीभाईंचा अपवाद सोडून) खासगीत ते कसे असतात ते फक्त त्यांच्या खासगीतील मंडळींनाच ठाऊक.

अनेक आशियायी नेत्यांच्या जवळपास वावरण्याची मला संधी मिळालेली आहे. आपलं 'पब्लिक इमेज' ही मंडळी किती काळजीपूर्वक जोपासतात हे मी पाहिलं आहे. ह्या नेतेमंडळींच्या आसपास राहून फिल्म शूट करताना वेगवेगळ्या प्रकारचा दबाव मी अनुभवला आहे. वास्तविक ज्याच्या सहवासात दिलखुलास मोकळं वाटावं अशा चाचा नेहरूंच्या सान्निध्यात देखील एका विचित्र दबावाखाली असल्यासारखं वाटायचं. त्यांच्या भेटीला आलेल्या परदेशी पाव्हण्याला तर हा दबाव जाणवल्याचं त्यांच्या चेहऱ्यावरच स्पष्ट दिसायच. एक गोष्ट मात्र निश्चित; भारतासारख्या प्रचंड देशाचे पंतप्रधान म्हणून हा दबाव जाणवायचा नाही, नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचाच तो दबाव असायचा. आता पंडितजींचा थाट काहीसा दरबारी असायचा हे मान्य केलच पाहिजे. त्यांची विचारसरणी निश्चितच उच्च होती; पण रहाणी साधी वगैरे अजिबात नव्हती.

## दबदबा–पंडितजींचा

जर्मन टी. व्ही. ची नोकरी करत असताना एकदा एका युरोपियन अर्थमंत्र्याची भारतभेट मी फिल्म करत होतो. युरोपियन माणूस मुळातच जरा ताठ आणि अहंमन्य ! हा युरोपियन तर मिनिस्टर ! मग त्याचा ताठरपणा जरा जादा असला तर नवल नाही. भारतीय अधिकारी, मंत्री, उपमंत्री ह्यांच्याशी तो जरासा 'वरच्या' पातळीवरून बोलत होता आणि आमची मंडळी देखील त्याच्यासमोर लाडक्याच्या पुढ्यातील कोकरासारखी वागत होती. तो अर्थातच सुखावत होता. शेवटी मिनिस्टरमहाशयांची पंडितजींना भेटण्याची वेळ आली.

पार्लमेंट हाउसमधील पंडितजींच्या ऑफिसच्या बाहेरील दालनात मिनिस्टर आला. बसण्यापूर्वी त्यांनी समोरच्या आरशामध्ये पाहून टाय ठीक केला. खिशातून फणी काढून चक्क केस विंचरले आणि मग गंभीर चेहऱ्यानं आपल्या सहकाऱ्याशी तो काही तरी बोलत बसला. त्याचा चेहरा एस्. एस्. सी. च्या परीक्षेला बसणाऱ्या अभ्यास न केलेल्या विद्यार्थ्यासारखा 'टेन्स्' दिसत होता. मी त्याचे दोन तीन शॉटस् घेतले. त्याचा आत्ताचा चेहरा वेगळा होता. त्यावरील भाव वेगळे होते. आताच्या सवच हालचाली कॅमेऱ्याला टिपण्यासारख्या होत्या.

पंडित नेहरू यण्याची वेळ झाली तेव्हा एका सचिवानं आम्हाला पंडितजींच्या ऑफिसमध्ये नेले. आम्ही लाइटस् लावून कॅमेरा सज्ज करून चाचा नेहरूंची वाट पाहू लागलो.

काही क्षणातच बाजूचं दार लोटून पंडित जवाहरलाल नेहरू ऑफिसमध्ये प्रवेश करते झाले. त्यांचा चेहरा काहीसा त्रासलेला आणि चिडका दिसत होता. कॅमेऱ्याची घरघर आणि लाइटस्–क्षणार्धात पंडितजींच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले, दरवाज्यात थांबून

त्यांनीं आम्हा सर्वांकडे–म्हणजे आमच्या कॅमेऱ्याच्या लेन्सेस्‌कडे पाहून अतिशय प्रसन्न हास्य केलं. आम्ही जाम खुश झालो. पंडितजींचं हे हास्य 'हिप्नॉटिक' होतं. हसऱ्या प्रसन्न चेहऱ्याच्या पंडितजींचे शॉटस्‌ घेताना नेहमीच अशी खुशी व्हायची.

आम्हाला भरपूर शॉटस्‌ मिळालेत ह्याची खात्री पटल्यावर पंडितजी चटचट पावलं उचलत टेबलापाशी विराजमन झाले. त्यांचा सेक्रेटरी डायरी उघडून हलक्या आवजात त्यांना काही सांगू लागला. आमचे कॅमेरे चालूच–लाइटस्‌ ऑन्‌. पंडितजींचं मिळेल तितकं 'कव्हरेज' हावरेपणे घेण्याची आम्हाला सवय. कॅमेऱ्याच्या आवाजामुळं, लाइटस्‌मुळं पंडितजींचं लक्ष काहीसं विचलित. सेक्रेटरी काय सागतोय हे चटकन घ्यानात येत नाही हे जाणवताच पंडितजींचा आमच्या बाजूनं एक जळजळीत कटाक्ष. फ्युज उडाल्यासारखे आमचे सगळ्याचे कॅमेरे आणि लाइटस्‌ 'एक साथ बंद'–ह्याच तो विचित्र दबदबा ! उनकी सिर्फ एक नजर काफी थी।

–सेक्रेटरीचं बोलणं ऐकता ऐकता पंडितजींनी चेहरा उगाचच गंभीर केला. बाहेर बसलेल्या युरोपियन मिनिस्टरनं हा चेहरा पाहिला असता तर त्याची कढी पातळ झाली असती ! आम्ही सगळे श्वास रोखून. सेक्रेटरीला काय होत असेल ते तोच जाणे; पण पंडितजींनी डोक्यावरची टोपी काढून टेबलावर ठेवली. गुळगुळीत डोक्यावरून हळुवार हात फिरवत, कानशिलाकडे उगीचच खाजविल्यासारखं करीत सेक्रेटरीला एक दोन प्रश्न विचारून टोपी पुन: डोक्यावर ठेवली. सेक्रेटरीची उत्तरे ऐकताना त्यांच्या चेहऱ्यावर मंद स्मित उमटले. टेबलावर आडव्या पडलेल्या एका पेन्सिलीशी बोटानी खेळत पंडितजी विचारमग्न झाले आणि आम्ही लाइटस्‌ लावून कॅमेरे सुरू केले. त्यांच्या चेहऱ्यावरील कमी होणाऱ्या गांभीर्याचे भाव मी टिपू लागलो.

मग आमच्या दिशेनं आपलं फेमस हास्य फेकत पंडितजी उठून दाराशी आले. सेक्रेटरीनं दारं उघडताच युरोपियन मिनिस्टर आत आला. नेहरूंच्या समोर अदबीनं वाकत त्यानं 'शेकहॅंड' केला. पंडितजींनी दुसरा हात त्याच्या खाद्यावर ठेवून एखाद्या बिगारीतल्या पोराला वाट दाखवावी त्याप्रमाणे खुर्चीपाशी आणले. पडितजी आपल्या आसनात बसेपर्यंत तो नम्रपणे उभा राहिला. पंडितजी बसताच पटकन्‌ बसला. दिवसभर ताठरपणे फिरणाऱ्या ह्या युरोपियन मंत्र्याची पंडितजींसमोर चक्क शेळी झाली होती ! अनेकांची तशी अवस्था मी चित्रित केली आहे. पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वामुळे भारताची मान ताठ होती हे निर्विवाद !

त्यांचा दबदबा वेगळा होता. हवा–हवासा वाटणारा. कदाचित ते आमचे पंतप्रधान, आमचे चाचा नेहरू म्हणून तसं वाटत असावं. इतरांना हा दबाव कितपत रुचायचा कुणास ठाऊक.

## नमाझींच्या शेतावर

इस्फहानच्या गव्हर्नरचं एकतर्फी बोलणं संपलं. सर्फराझनं अखेरचं '*बाऽऽले कुर्बान*' म्हटलं. गव्हर्नरनं मान हलवून जलसा संपल्याचा इशारा केला आणि आम्ही ऑफिसातून बाहेर पडलो सर्फराझ तोंडातल्या तोंडात काही तरी पुटपुटत होता. बहुतेक गव्हर्नरला शिव्या घालीत असावा !

आम्ही प्रॉजेक्ट फार्मवर जाऊन पोहोचलो. मी कॅसेट टेपरेकॉर्डरमध्ये ताज्या बॅटरीझ आणि नवी टेप घातली. ऑफिसचं काम सुरू झालं होतं.

फार्मच्या फाटकावर युनिफॉर्म आणि बंदूकधारी गार्डस्‌ यानी गाडीची पहाणी केली. सर्फराझला पाच दहा प्रश्न विचारले, कुणाला तरी फोन केला आणि मग गाडी आत सोडली. एका अलिशान इमारतीपाशी गाडी थांबली. पोर्चमध्ये एक अद्ययावत्‌ पोशाक केलेली जुनाट वयाची इराणी प्रौढा आमच्या आगमनाची वाट पहात होती. तिनं आम्हाला एका ऑफिसवजा दिवाणखान्यात नेलं. भिंतीवर तीन फोटो होतेच; *पण आश्चर्य म्हणजे कोपऱ्यातील एका स्टुला*वर गांधीजीचा फ्रेम केलेला फोटो देखील होता ! प्रशस्त दिवाणखान्यात, उची आणि किंमती सजावटीत गाधीचा तो फोटो काहीसा चुकलेल्या फकीरासारखा वाटत होता.

मी दिवाणखान्यातील चीजवस्तू न्याहाळत होतो, इतक्यात पन्नाशीचे एक भारदस्त गृहस्थ दमदार पावलं टाकीत प्रवेश करते झाले. उंची सहा फुटांपेक्षा जास्तच असावी. दारासिंगासारखे रुंद खांदे, अफाट छाती, ओठावरून खाली ओघळणाऱ्या मंगोलियन मिशा. चेहरा थोराड, सर्फराझनं ओळख करून दिली.

'हे आगा–ए–नमाझी, इस्फहानमधले प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते. ह्यांच्या समाजसेवेबद्दल शहेनशहानं ह्याना दोन वेळा पदकं देऊन भूषविलं आहे. आगा–ए–नमाझींनी आपलं तन–मन–धन ह्या देशासाठी अर्पण केलं आहे.'

भव्य आकाराचे नमाझी स्वत:ची स्तुती ऐकून चक्क लाजले. *मला वाटलं हे आता कसचं–कसचं म्हणणार; पण त्यानी स्वत.ला* सावरलं. चेहऱ्यावर अतिशय नम्र आणि देशप्रेमानं ओथंबलेले भाव आणून ते म्हणाले,

"शहेनशहानं देशासाठी जो त्याग केलाय किंवा तुमच्या हिंदमधील गांधीजींनी जो त्याग केलाय त्याच्यापुढ माझं काम कस्पटासमान आहे !"

ते बोलत असताना सर्फराझचा चेहरा पाहून मला वाटलं आता हा कसचं–कसचं म्हणणार; पण त्यानं देखील स्वत.ला सावरलं. माझी भलतीच पंचाईत झाली. काय बोलावं तेच सुचेना. आगा–ए–नमाझींना माझी अडचण जाणवली असावी. ते मला माझ्या प्रवासाबद्दल, प्रकृतीबद्दल, बायको-मुलांबद्दल प्रश्न विचारू लागले. मी उत्तरं देऊ लागलो. माझं सर्व ठीकठाक आहे अशी खात्री पटल्यावर नमाझी सागू लागले–

"आमच्याकडे जेव्हा शहा आणि प्रजा ह्यांची सफेद क्रांती झाली तेव्हा मी स्वत:ला जनसेवेला आणि देशसेवेला वाहून घ्यायचं ठरवलं. मनात म्हटलं, 'मी मामुली माणूस, माझ्याकडून अशी काय देशाची मोठी सेवा घडणार ? मग गांधीजींचं जीवन आठवलं आणि गाधीजीप्रमाणं स्वत चं उर्वरित आयुष्य काढायचं असा मी निश्चय केला. आमचा इराण कृषिप्रधान देश. तुमच्यासारखाच आमचा शेतकरी अडाणी, अशिक्षित आणि मागासलेला. शहेनशहाच्या अपार परिश्रमानं आज आमचा देश झपाट्यानं औद्योगिक प्रगती करीत असला तरी जोपर्यंत आमची शती सुधारत नाही, आमचा शेतकरी सुधारत नाही तोपर्यंत ह्या प्रगतीचा काही उपयोग होणार नाही. सुधारणा

ही अगदी तळागाळातल्या माणसापर्यंत पोहोचली पाहिजे. जोपर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील माणूस प्रगतीच्या वाटेवर पाऊल टाकत नाही तोपर्यंत देश प्रगतिपथावर आहे असं म्हणता येत नाही!"

पोर्चमध्ये स्वागत करणारी जुनाट प्रौढा चहाचे प्याले घेऊन आली. नमाझींनी श्वास घेतला. त्यांच्या वक्तव्यानं मी काहीसा भारावल्यासारखा झालो होतो. ते बोलताहेत तेच आपण कुठं तरी ह्याअगोदर ऐकलंय असं सारखं वाटत होतं; पण कुठं आणि कुणाकडून ते नक्की आठवत नव्हतं. स्मृती दगा देत होती. कदाचित नमाझींच्या दिवाणखान्याचा, स्टुलावरील गांधीजींच्या फोटोचा, एकूण काहीशा विसंगत वातावरणाचा परिणाम असावा. सर्फराझ-प्रमाणंच साखरेचा खडा तोंडात टाकून मी चहाचा अर्क ओठांना लावला. नमाझींना रोझे होते. त्यांनी चहा न घेता पुढे बोलायला सुरुवात केली—

"तसं पाहिलं तर मी मूळचा व्यापारी आणि कारखानदार. इराणमध्ये माझा मोठा बिझनेस आहे. मी पर्शियन गालिचे निर्यात करतो. शुमालमध्ये—कास्पियन समुद्राच्या काठाला माझे चहाचे मळे आहेत. तेहरानमध्ये तीन फॅक्टरीज आहेत. कोमजवळ मोठी पोल्ट्री आहे; पण जेव्हा शहा आणि प्रजा ह्यांनी सफेद क्रांती करायचं ठरवलं तेव्हा मी माझा सर्व व्यवसाय माझ्या मुलाच्या हवाली केला. निवृत्त झालो आणि जनसेवेच्या कार्यात स्वत:ला झोकून दिलं!

"मी अगोदर म्हटल्याप्रमाणं इराण हा कृषिप्रधान देश. मी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी माझं उर्वरित जीवन खर्च करण्याचा निश्चय केला...इस्फानमध्ये माझी दोनशे हेक्टर जमीन आहे. कायद्यानं ही जमीन आता शेतकऱ्यांची; पण शेतकरी अडाणी, म्हणून मी सरकारला सांगितलं—मी ह्या जमिनीवर शेतीमधील नवनवीन पथदर्शक प्रयोग करून दाखवतो. त्या प्रयोगांतून, त्या प्रयोगाच्या यशामधूनच आपल्या अडाणी शेतकऱ्यांच्या मनात शेतीच्या आधुनिक तंत्राबद्दल विश्वास निर्माण होईल. प्रयोग फसले तर माझ्या जमिनीचं नुकसान होईल, शेतकऱ्यांच्या नाही. प्रयोग फलद्रूप झाले तर त्यातून इतरांना मार्गदर्शन होईल. हजारो शेतकऱ्यांचा फायदा होईल. सरकारला माझं म्हणणं पटलं."

"तुम्ही आता माझी सुधारित शेती पहा म्हणजे तुमच्या लक्षात येईल की, गेल्या आठ-दहा वर्षांत मी इथं किती घामाचं पाणी केलंय. अर्थात जे घडलंय ते अल्लाच्या कृपेनं. माझ्यासारखा मामुली माणूस स्वत:ला ह्या यशाचा मानकरी कधीच म्हणवून घेणार नाही! जे केलं ते देशासाठी. माझ्या गरीब देशबांधवासाठी आणि ह्या कामासाठी प्रेरणा घेतली शहेनशहाकडून आणि तुमच्या गांधीजीकडून! ..."

पोर्चमध्ये लॅंडरोव्हर तयार असल्याची वर्दी मिळाली. देशभक्त नमाझींनी बोलणं थांबवलं. जुनाट वयाच्या प्रौढेला करड्या आवाजात काही सूचना दिल्या आणि आम्ही प्रॉजेक्ट फार्म बघायला निघालो.

नमाझींची बागायती शेती क्षितिजापर्यंत पसरली होती. आजूबाजूला नुसती नजर फिरवली तरी पंधरा-वीस ट्रॅक्टर्स नजरेस पडत होते. शेतामध्ये काम करणारे शेतमजूर आमची लॅंडरोव्हर बाजूनं जाताच अदबीनं सलाम करीत होते. नमाझी त्यांना आशीर्वाद दिल्याप्रमाणे हात उंचावीत होते. सर्वत्र हिरवीगार बागायत! पी. व्ही. सी. पाइप्समधून थेंब थेंब ठिबकणाऱ्या पाण्यापासून ते फवारे आणि कारंजी ह्यांच्या सहाय्यानं सिंचन करण्याच्या सर्व आधुनिक तंत्राचा वापर जागोजागी दिसत होता. नमाझींच्या दोनशे हेक्टरवर जे दिसत होतं ते खरोखरीच विस्मयकारक होतं मी प्रश्न केला—

"शेतीमध्ये ह्या सर्व आधुनिक सोयी उपलब्ध करण्यासाठी तुम्हाला प्रचंड भांडवली खर्च सोसावा लागला असणार. त्या भांडवलाची गुंतवणूक आणि ह्या शेतीमधून मिळणारं उत्पादन ह्यांचा ताळमेळ तुम्ही कसा बसवला?"

प्रसन्नपणे हसत नमाझी म्हणाले—

"आगा-ए-पारुलकार—आजकाल स्वत:चं भांडवल गुंतवून शेती किफायतशीर ठरणं अत्यंत कठीण इराणमध्ये तर महाकठीण; पण प्रगती करायची असेल तर भांडवलासाठी अडून बसता कामा नये. मी सरकारला सांगितलं—मी तर व्यवसायातून निवृत्त झालो आहे. माझ्याकडून भांडवलाची अपेक्षा करू नका! मी माझी जमीन प्रयोगासाठी द्यायला तयार आहे पैसा नाही गुंतवणार! मग सरकारनं आमच्याकडील काही विकास प्रतिष्ठानांना आदेश दिले त्यांनी भांडवल पुरवलं. मी प्रयोग केले. आता ह्या वर्षी आम्ही ह्या प्रॉजेक्ट फार्मचं 'फाउंडेशन' मध्ये रूपांतर करणार आहोत. (म्हणजे आपल्या भारतामधील ट्रस्टसारखा प्रकार) त्यानंतर आम्ही मग तुमच्या युनोसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना आमच्या ह्या उपक्रमात सामील होण्याची विनंती करणार आहोत."

नमाझींचं प्रोजेक्ट फार्म खरोखरीच पहाण्यासारखं होतं; पण मनात नाना शंका विनाकारणच गोंधळ घालत होत्या. वारंवार गांधीजींचं नाव घेणारा हा इराणी व्यापारी आणि कारखानदार—ह्याचं देशसेवेचं व्रत कुठं तरी खटकत होतं. ह्याच्या फार्मवर काम करणारे मजूर वास्तविक कायद्यानं त्या जमिनीचे मालक; पण नमाझींनी पथदर्शक प्रयोगाला जमीन अर्पण केल्यामुळं त्यांचा मालकी हक्क शेतीमधील आधुनिक प्रयोगाच्या निमित्तानं केलेल्या होमात आहुती म्हणून पडला असावा.

काही तरी, कुठं तरी चुकत असल्यासारखं वाटत होतं; पण उमजत नव्हतं. बागायती शेती बघून झाल्यावर नमाझींनी जेव्हा मला त्यांच्या दीड-दोनशे जर्सी गायींच्या गोठ्याकडे नेलं, तेथील अत्याधुनिक सामग्री दाखवून एका विशाल कुक्कुटपालनकेंद्रापाशी आणलं, तेव्हा माझ्या मनात पाल चुकचुकली. उगाचच वारणानगर, अकलूज, उरळीकांचन वगैरे नावं आठवू लागली. नमाझींच्या प्रॉजेक्ट फार्मवरील शेतीविषयक सुधारणा सामान्य इराणी शेतकऱ्याला कितपत झेपतील हा प्रश्न सतावू लागला होता; पण सामान्य इराणी शेतकरी असतो कसा, दिसतो कसा, बोलतो कसा, रहातो कसा ह्या सर्वंच बाबतीत मी संपूर्णपणे अनभिज्ञ! आतापर्यंत जे इराणी पाहिले ते सारे टाय-सूट घालणारे. नमाझींच्या बागायतीमध्ये काम करणारे मजूर देखील पॅंट-कोट परिधान केलेले. त्यांच्या तुलनेत आमचा फाटक्या शरीराचा, चिंध्या परिधान करणारा शेतमजूर म्हणजे सुदाम्यापेक्षा दरिद्री दिसणारा! नमाझींच्या खासगी शेतीमध्ये, सरकारी पैशानं केलेल्या प्रयोगातून इराणच्या शेतकऱ्याला कदाचित मार्गदर्शन मिळेलही. ते प्रयोग स्वत:च्या शेतीमध्ये करण्याइतकी कुवत सामान्य इराणी शेतकऱ्यामध्ये असेलही. नसली तर खनिज तेलापासून अमाप पैसा मिळवणारं इराणी सरकार त्याला आर्थिक सहाय्य करेल देखील!

—पण अंतर्मन मात्र सांगत होतं, 'आपल्या दरिद्री शेतकऱ्याला जर उरळीकांचनच्या—अगदी ओरिजिनल गांधी तत्त्वज्ञानावर आधारित—सुधारणा पेलवत नाहीत तर इराणच्या शेतकऱ्याला आगा-ए-नमाझींच्या तथाकथित गांधीवादी पण अमेरिकी थाटाच्या सुधारणा खरोखरीच पेलवणार का?

फार्म बघून आम्ही शहाअब्बास हॉटेलवर परतलो. सर्फराझ गप्प होता. हैदरीदेखील गप्प होता. पर्शियन गालिचे तुडवत आम्ही खोलीकडे निघालो तेव्हा सर्फराझ म्हणाला, "हे आमचे लाटसाहेब—हे सरकारी पोळ—माजलेले..." त्यावर हैदरी देखील काही तरी बोलला. काय ते मला समजलं नाही. सर्फराझनं भाषांतर करण्याची तसदी घेतली नाही!

(क्रमश:)

पुस्तके । फिनिक्स निवड

# The People's Almanac 2

By David Wallechinsky and Irving Wallace.

Exit Irving Wallace.

लोकप्रियतेच्या यादीवरून हा लेखक एकदम जरी नाहीसा झाला नसला तरी तो त्या मार्गावर आहे. आयर्विंग वॉलेसनी आत्तापर्यंत १६-१७ पुस्तके लिहिली आहेत. त्याची 'द सेव्हन मिनिटस्' व 'द प्राईज्' ही सर्वात अधिक लोकप्रिय (in that order) पुस्तके आहेत. या पुस्तकाचा सह-लेखक डेव्हिड वॉलेचिन्स्की हा त्याचा मुलगा.

आयर्विंग वॉलेस आटला. म्हणून तो आता गनिज बुकासारखी बुकं (बाइंडरच्या शद्वात) लिहायला लागलाय.

गिनिज् बुकामध्ये कशाला महत्त्व असते हे तुम्हाला परिचित असेलच. जगात मोठ्यातला मोठा गाढव (म्हणजे literally—figuratively नव्हे) कुठे आहे, जगात सर्वांत लांब नखं कुणी वाढवली, जगात सर्वांत लांब केस कुणाचे वगैरे रिलेटेड ट्रॅश गिनीज्मध्ये असते. अर्थात् कधीकधी उपयुक्त माहितीही असते. पण बऱ्याच वेळेला इतकी सवंग माहिती दिलेली असते की जगात सर्वात महामूर्ख पब्लिशर म्हणून त्यानी गिनिज्च्या प्रकाशकाचे किंवा कंपायलरचे सुद्धा नाव टाकायला पाहिजे. आता ही वॉलेसची पुस्तके People's Almanac II 2 व Book of Lists ही गिनिज्च्या धर्तीवरच आहे. फक्त गिनिज् इतका ट्रॅश त्यात नाहीं. गिनिज्सारख्या जगप्रसिद्ध पुस्तकावर मी असे लिहावे हे कदाचित काही लोकाना पटणार नाही; पण मी बुवा आपलं मनात येईल तेच लिहितो. कदाचित् गिनिज् थोडसं ओव्हरहोल केलं की पीपल्स आलमनॅक सारखं होईल.

पण या वॉलेसनी या पुस्तकाला हे असे काय पंचांगासारखे नाव दिले? त्यापेक्षा गिनिज्चे नाव बघा. भारदस्त. पूर्वी आमच्या ग्रंथालयात वॉलेसच्या पुस्तकाच्या चार चार प्रती घ्याव्या लागत. एखाद्या पुस्तकाची मागणी पुरी झाली नाही की हळूहळू आम्ही एकेक कॉपी वाढवत जातो. न्यूजपेपर वगैरे मिडियामध्ये भरपूर चर्चा झाली की असे वाटते की, अमक्या एका नव्या पुस्तकाची मागणी एकदम वाढेल; परतु तसे क्वचितच होते. पॅट्रिक मॉयनिहान यानी लिहिलेल्या A Dangerous Place या पुस्तकाची संसदेत व वर्तमानपत्रात इतकी चर्चा झाली की, आता हे पुस्तक बहुतेक वाचक मागतील असे वाटले; पण या पुस्तकाची मागणी स्पिरिट – (म्हणजे Poltergeist नाही; पण Volatile) – सारखी उडाली. अलीकडे 'द मॅन हू केप्ट सीक्रेटस्' या पावर्सच्या पुस्तकाचेही असेच झाले. त्यानंतरचे एक उल्लेखनीय पुस्तक म्हणजे श्री. डॉम मॉरॅसचे 'द बॉबे.' शिवसेनेने ते पुस्तक जाळले, कस्टमनी त्या पुस्तकाची काही वाक्ये व एक चित्र शाई ओतून खोडून काढले वगैरे बऱ्याच बातम्या मी पेपरमध्ये वाचीत असे; पण या बातम्यांच्या प्रमाणात मात्र त्या पुस्तकाची मागणी नाही. म्हणजे असं, पुस्तकातही काही सबस्टन्स हवा आणि मग जर त्याला वर्तमानपत्रात प्रसिद्धीची जोड मिळाली तरच पुस्तकाच्या मागणीचे गियर्स हळूहळू शिफ्ट व्हायला लागतात. मग आमच्या वाचनालयात हळूहळू फर्स्ट, सेकंड, थर्ड, फोर्थ कॉपीज् पडायला लागतात. जास्तीत जास्त आमच्या वाचनालयात आठ गियर्स पडले आहेत. तर सबस्टन्स नसलेल्या पुस्तकाची मागणी वाढवायला वर्तमानपत्रे व इतर मास मिडियाकडे धाव घेऊनही फायदा होणार नाही.

या पुस्तकात बिकिनी या शब्दाचा समावेश आहे. जे लोक नुसतेच अती कामुक असतील त्याना बिकिनी सूटमध्ये बॉडी व तोकडी चड्डी घातलेली बाई दिसेल. जे मानवतावादी असतील त्याना बिकिनी अॅटॉलमधला अणुस्फोट आठवेल. जे कामुक मानवतावादी असतील त्यांना दोन्ही बिकिनी एकदम आठवतील. खरं म्हणजे बिकिनी अॅटॉलवर स्फोट झाल्यापासून चार दिवसांनी म्हणजे ५-७-१९४६ रोजी पॅरिसमध्ये फॅशन शो झाला. हा फॅशन शो रिअर्ड नावाच्या गृहस्थानी भरवला होता व बिकिनीचे (म्हणजे सूट) डिझाइनही त्यानीच बनविले होते. या रिअर्डनीच या सूटला बिकिनी असे नाव दिले Reard Coined 'bikini' to reflect his concept of the ultimate असे वॉलेस म्हणतात. ज्या बाईने पहिला बिकिनी सूट घातला तिला ५०,००० फॅन लेटर्स आली. (मला पाच वर्षात अजून पाचशे पुरी व्हायची आहेत. म्हणजे V I P किंवा डॉन अडरवेअरबद्दल नव्हे, पण एक वेगळ्या पद्धतीचे ग्रंथालय चालवण्याबद्दल व माझ्या लिखाणाबद्दल).

मला वाटते बिकिनी सूटमध्ये कुणाला बघून शरिराच्या पेशीत अणुस्फोटासारखा स्फोट होत असेल असे रिअर्डला वाटले म्हणून त्यानी हे नाव दिले असावे.

रेडिओ कंपनीवाले जाहिरातीचा भडिमार करून पब्लिकची फसवणूक कशी करतात् याची प्रचीती मला हे पुस्तक वाचून परत एकदा आली. खरं म्हणजे हे साले रेडिओवाले फक्त बाहेरची कॅबिनेट वदलून, नवीन नॉब्ज लावून, वर्तमानपत्रात Now किंवा New ला दोन-तीन-चार उद्गारचिन्हे देऊन किंवा ती अक्षरे एकदम मोठी छापून, जणु सूर्यासारखे किरण निघत आहेत असे भासवून, पुढची जाहिरात अशी काही देतात की, आपला बिचारा कन्झ्युमर जुना रेडिओ विकून तो जाहिरातीतील रेडिओ घेऊन बसतो! तसे पहाता रेडिओमध्ये आता फारसे काही नवीन निघण्यासारखे नाही. हे नवीन रेडिओ म्हणजे जुन्या बाटलीतली दारू नवीन बाटलीमध्यें; परंतु हे नुसते रेडिओमध्येच असे चालते असे नाही. किरण निघणारे Now किंवा New साबण, अत्तरे, ब्लेडस् वगैरे सर्व वस्तू खपविण्याकरिता त्याचा वापर होत असतो. विकसनशील देशात क्वचित एखादा राल्फ नाडेर निघतो. लाल बावटयाच्या देशात तो जर हातपाय हलवायला लागला तर सरकार त्याला टपली मारून गप्प बसवील! अविकसित देशातच खरं तर एखाद्या राल्फ नाडेरची आवश्यकता आहे. कारण इथला कन्झ्युमर एक तर गरीब आणि त्याच्यावरच सर्व इंटरनॅशनल, मल्टिनॅशनल व नॅशनल टपून बसलेले. हा कन्झ्युमर पाहिला की, लक्ष्मणच्या you said it मधील कार्टूनची आठवण येते. तो चष्मेवाला, हात मागे

असलेला, कसलाही प्रतिकार न करणारा, माइल्डली सरप्राईज् झालेला, किंचित डोकं वर असलेला कॉमन मॅन !

या पुस्तकात (Frequency Modulation ) F. M. रेडियोचा शोध १९३३ मध्ये एडविन् आर्मस्ट्रॉंगने लावला असे लिहिले आहे. हे वाचून मला काही दिवसांपूर्वीची एका नामांकित रेडिओ कंपनीची जाहिरात आठवली. त्या जाहिरातीत त्या रेडिओमध्ये FM ची नवीन सुधारणा केली आहे असे चक्क लिहिले होते ! Consumer, see how you are being taken for a ride ! मुंबईत एक कन्झ्युमर सोसायटी का काय ती आहे; पण तिचा आवाज फारसा ऐकू येत नाही. या साठ लक्ष लोकांमधून एकपण राल्फ नाडेर पैदा होत नाही का ?

विकसनशील देशात लेखक, नट, नटद्या, टायकून्स वगैरे प्रख्यात लोक आपली मूळची नावे सोडून दुसरीच घेतात. या पुस्तकात त्यांची एक यादी आहे. 'लस्ट फॉर लाइफ' ही व्हिन्सेंट व्हान गॉग यांची चरित्रात्मक कादंबरी आर्यावग स्टोन यांनी लिहिली. या लेखकाचे खरे नाव आर्यावग टॅननबॉम असे या पुस्तकात वाचून आश्चर्य वाटले. काय आर्यावगसाहेब, उचलून उचलून स्टोनच उचलला ? गोल्डा मायर यांचे खरे नाव गोल्डी माबोविच. आता ह्या काय विचसारल्या वाटत होत्या की त्यांनी नाव बदलावे ?

आपल्याकडे ही प्रथा अजून कशी आली नाही याचे आश्चर्य वाटते. तिथे मुळात चांगली नावे असली तरी ते दुसरी घेतात आणि आपल्याकडे बारटक्के, बारभाई, पोटभरे, पूर्णपगारे, पोटदुखे अशी चमत्कारिक नावे असूनही आपण ती बदलत नाही ! चांगले ते उचलायलाच हवं. नाव कसं पोंडासारखं डोळस असायला हवं. त्यावरून कोब्रा का देशस्थ आहे वगैरे काहीच थांगपत्ता लागत नाही. गोव्यात पोंडा गाव असल्यामुळे मी तिथला का, असे मला अनेक वेळा प्रश्न विचारण्यात आले. माझ्या वाडवडिलांच्याच काय पण माझ्यासुद्धा (लहानपणी) पोंडा व फोंडा नावाची गावे गोव्यात आहेत हे गावीही नव्हते !

या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे सुविख्यात व्यक्तींच्या वर्तणुकीचे चमत्कारिक पैलू. हॅन्स क्रिश्चन अँडरसन ( फेरी टेल्सवाला ) याची छाती अगदी कमकुवत व आंतर्गोल ( concave ) होती. ह्या पठ्ठ्या ती छाती बुमनली नाही पण मेनली वगैरे दिसावी म्हणून शर्टखाली वर्तमानपत्रे ठेवीत असे !

आर्थर वेलस्ली हा वेलिंग्टनचा पहिला ड्यूक होता. अपॉइंटमेंटला कधीच उशीर होऊ नये म्हणून तो स्वतःकडे नेहमी सहा घड्याळे ठेवीत असे ! हा दुसरा-तिसरा कुणी नसून नेपोलियनचा वॉटरलू करणारा ड्यूक. आता कुणाचाही पराभव झाला की वॉटरलू शब्द वापरतात !

फ्लॉरेन्स नाईटिंगेलही स्वतःकडे नेहमी एक घुबडाचे पिल्लू बाळगीत असे !

बेंजामिन डिसरायली हा लिहिताना नेहमी विशिष्ट प्रकारचे कपडे घालीत असे.

आपल्या बायकोचे पत्र वाचण्याआधी नाथानाईल हाथॉर्न ( स्कारलेट लेटरवाला ) नेहमी हात धूत असे ! !

डिव्हाइन कॉमेडी लिहिणारे Dante Aligheri यांनी वाचताना आपल्या मांजराला मेणबत्तीभोवती पंजे ठेवायला शिकविले होते.

विल्यम मॅकपीस ठाकरे ( व्हॅनिटी फेअर लिहिणारा ) यांनी ज्या घरी ती कादंबरी लिहिली त्या घरापुढून जाताना तो नेहमी आपली हॅट काढीत असे. या कादंबरीमुळेच तो प्रख्यात झाला !

गॉसिपविषयी मला पण फार भय आहे; पण कॅथेरिनचं भय पॅथॉलॉजिकल होतं. कॅथरिन दि ग्रेट, रशियन राणी विग घालीत असे, ही गोष्ट फक्त तिच्या हेअर ड्रेसरलाच माहिती होती. त्याने गॉसिप करू नये म्हणून तिने त्याला तीन वर्षे लोखंडी पिंजऱ्यात डांबून ठेवले होते ! नोकर म्हणजे गॉसिप आलीच हे तिला पक्कं माहीत असेल !

रिलेटिव्हिटीवाले अल्बर्ट आइनस्टाइन हे इतके विसराळू होते की, चुकून त्यांनी रॉकफेलर फौंडेशनचा १५०० डॉलर्सचा चेक पुस्तकात ( खुणेसाठी, पुस्तकाची पाने दुमडू नयेत हे त्यांच्या मनावर किती बिंबले गेले होते ते पहा ) खूण म्हणून ठेवला होता. त्यांचा चेक तर हरवलाच ; पण थोड्या दिवसांनी त्यांचे पुस्तकही गेले !


एडगर ॲलन पो लिहिताना बऱ्याच वेळा आपली मांजरं खांद्यांवर बसवीत असत.

हे सर्व या पुस्तकात लिहिले आहे (अर्थात् पेक्टोकॅबचे सोडून) मी एकदा असेही वाचले होते की, द डॉल्स हाउस चे हेन्रिक इब्सेन हे नेहमी लिहिताना आपल्या टेबलावर एक जिवंत विंचू ठेवीत असत !

पुस्तकाचे काही भाग वाचनीय आहेत. सध्या पहिल्या किंवा दुसऱ्या गियरमध्ये असलेला वॉलेस परत टॉप गियरमध्ये येईलही. त्या वेळेला लोकप्रिय पुस्तकरूपी नाट्यभूमीवर परत एकदा 'Enter Irwing Wallace' असे म्हणावे लागेल !

–जे. एन. पोंडा


तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची मान्यता लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## हिचकॉकच्या कथा । कथा नववी

### स्वैर अनुवाद : रवींद्र गुर्जर

# त्याचा देह गेला, गगनावरी....

रिव्हरव्हिले खेड्यात दरवर्षी पंधरा दिवसांची जत्रा भरते. त्या वेळी असंख्य दुकानं थाटली जातात. लहान मुलांचे खेळ आणि मोठ्यांसाठीसुद्धा निरनिराळी आकर्षणं असतात. यंदा त्यातील ठळक वैशिष्टय म्हणजे 'मॉर्गन मायाजाल कंपनी'चं आगमन हे म्हणता येईल. खेड्याबाहेर एका मोठ्या तंबूत कपनीचा मुक्काम पडला होता. जत्रा तिथून जवळच भरायची.

आज पहिलाच दिवस. ऑक्टोबरची सुंदर संध्याकाळ. सातच्या सुमाराला तो परिसर रंगीबेरंगी लोकांनी फुलून गेला होता. ते. खेडं मोठ्या शहरापासून दूर, डोंगराळ विभागात वसलं होतं. त्यामुळं नाटक–सिनेमा किंवा मैदानी खेळ तिथल्या लोकांना कधीच बघायला मिळत नसत. मायाजाल कार्यक्रमाला त्यामुळं गर्दी होणार नाही, तरच नवल! लहानसहान गंमत बघायला मिळाली किंवा किरकोळ विनोद झाला तरी गावचे लोक काही काही वेळा पाच पाच मिनिटं हसत बसत. तोंडात दाणे किंवा लाह्या रगडत ते मजा लुटायचे!

मोहिनीविद्येचे प्रयोग ज्या ठिकाणी चालणार होते, तिथे एकजण जोरजोरात ओरडून जाहिरात करत होता. पट्ट्यापट्ट्याचा सूट घातलेला तो जाडजूड इसम तोंडाशी कर्णा धरून 'या, या'चं आवाहन करत होता, बाजूला एका लाकडी प्लॅटफॉर्मवर प्रत्यक्ष मोहिनीविद्या दाखवणारा गृहस्थ अलिप्तपणे बसला होता. त्याच्या चेहऱ्यावर किंचित त्रासिकपणा आणि अनुत्सुक भाव दिसत होते. तिथे जमलेल्या गर्दीकडे तो ढुंकूनही बघत नव्हता.

तंबूत पन्नासएक डोकी जमली कलाकार-महाशय स्टेजवरच्या प्रखर उजेडात जाऊन शांतपणे उभे राहिले. दर्शकामध्ये कुजबुज सुरू झाली. त्या कलाकाराची सर्वांवर चांगलीच छाप पडली होती. त्याची उंच पण सडपातळ आकृती, मंद आणि निर्विकार चेहरा, लक्षात राहण्याजोगं म्हणजे त्याचे काळे भेदक डोळे. तेच सर्वांचं लक्ष वेधून घेत होते. जोडीला काळ्या रंगाचा सूट आणि तसाच टाय.

त्यानं थंडपणे गर्दीचं निरीक्षण केलं. त्यात एक प्रकारची नाखुषी आणि सूक्ष्म तिरस्कार भरला होता.

तो स्टेजच्यापुढं एका टोकाला जाऊन भारदस्त आवाजात म्हणाला, 'तुमच्यापैकी कोणी तरी एक मला स्टेजवर पाहिजे. तेव्हा कोण पुढं येतंय?'

प्रत्येकानं आजूबाजूला पाहिलं किंवा शेजाऱ्याला ढोसलं; पण कोणीच जायला उठलं नाही.

कलाकारानं खांदे उडवले. 'मग खेळ होऊ शकणार नाही!' तो अधिकच संथपणे म्हणाला. 'तुमच्यापैकी एकानं इथे येण्याची कृपा करावी. मी तुम्हाला असं आश्वासन देतो की, प्रयोग अगदी निर्धोक आणि निरुपद्रवी आहे!'

त्यानं समोर अपेक्षेनं पाहिलं. एक तरुण लोकांमधून वाट काढत पुढं जाऊ लागला.

कलाकारानं त्याला हात देऊन स्टेजवर घेतलं आणि एका खुर्चीवर बसवलं.

'अगदी आरामात बसा!' कलाकार म्हणाला. 'तुम्हाला लवकरच शांत झोप लागेल आणि नंतर मी तुम्हाला जे काही सांगेन, ते बरहुकूम तुम्ही कराल.'

तो तरुण खुर्चीत आळोखेपिळोखे देत पण लोकाकडे आत्मविश्वासानं हसून बघत बसला.

मोहिनीविद्येच्या कलाकारानं त्याचं लक्ष वेधून घेतलं. आपले विशाल डोळे त्याच्यावर रोखले, त्याबरोबर त्या तरुणाची हालचाल थांबली.

अचानक बाहेरच्या प्रेक्षकांमधून कोणी तरी रंगीत लाह्यांचा उघडा पुडा स्टेजवर भिरकावला. त्याबरोबर खुर्चीतल्या तरुणावर लाह्यांचा पाऊस पडला. तो एकदम धडपडून उठला, अगदी पडता-पडता वाचला. ते पाहून प्रेक्षक पोट धरधरून हसू लागले.

तो कलाकार संतप्त झाला. त्याचा चेहरा लालबुंद बनला. गर्दीकडे बघताना तो अक्षरशः रागानं थरथर कापू लागला.

'हे कोणी फेकलं?' त्यानं धारदार आवाजात विचारलं.

समोरची मंडळी गप्प झाली.

कलाकार डोळे वटारून सगळ्यांकडे बघतच होता. हळूहळू तो शांत झाला आणि त्याचा कंप थांबला. त्याचे डोळे मात्र अजूनही लालसर होते.

अखेर त्यानं मान हलवून स्टेजवरच्या तरुणाला परत जायला सांगितलं. नंतर तो पुन्हा प्रेक्षकांकडे वळला.

'खेळात व्यत्यय आल्यामुळं आता नव्या व्यक्तीवर पुन्हा प्रयोग करावा लागेल,' तो हलक्या आवाजात म्हणाला. 'जर लाह्या फेकणारे गृहस्थ पुढे येतील तर अधिक चांगलं!'

गर्दीतल्या दहाबाराजणांनी मागे वळून बघितलं. तिथे एकजण, सगळ्यात मागे अंधारात उभा होता.

संमोहन-कलाकारानं त्याला चटकन टिपलं. त्याच्या डोळ्यांतून जणू ठिणग्या पडू लागल्या. तो उपहासाच्या स्वरात म्हणाला, 'कदाचित त्या खोडसाळ माणसाला पुढे यायची धास्ती वाटत असेल. अंधारात छपून लाह्या फेकणं अगदीच सोपं आहे!'

दोषी माणसानं जोरात हुंकार दिला आणि तो तीरासारखा स्टेजकडे धावला. तो पहिल्या तरुण माणसासारखाच सर्वसामान्य इसम होता. बहुतेक श्रमिक शेतकरी असावा.

तो खुर्चीवर बसला. कलाकाराच्या स्थिर नजरेशी मुकाबला करत तो मोठ्या तल्लखपणे बसला होता. मोहिनीविद्येचा अंमल स्वतःवर होऊच शकणार नाही, अशी त्याची जवळजवळ खात्रीच होती. समोरच्या प्रेक्षकांची तो वाहवा मिळवणार होता.

पण हळूहळू त्याची बेदरकारी निवळली.

कलाकाराच्या आज्ञेप्रमाणे तो उघड्या डोळ्यांनी जणू निद्राधीन झाला.

एकदोन मिनिटात त्या कलाकाराच्या आज्ञेप्रमाणे दुसरा तरुण उभा राहिला आणि स्टेजवर पाठ टेकून आडवा झाला. प्रेक्षक श्वास रोखून बघू लागले.

'तू आता गाढ झोपशील !' कलाकारानं त्याला सांगितलं. 'तू गाढ झोपला आहेस. तू झोपेतच आहेस. मी तुला जे जे सांगेन ते निमूटपणे तू करशील. अगदी जे काही सांगेन ते...'

कलाकार गंभीर आवाजत तीच तीच वाक्ये पुन्हा म्हणत होता. समोरच्या प्रेक्षकात स्मशानशांतता !

एकदम कलाकाराचा स्वर बदलला आणि लोकांच्या छातीत धडधडू लागलं.

'उभा राहू नकोस--पण तसाच स्टेजवर उंच उंच चढत राहा !' संमोहन-कलाकारानं ठणकावलं. 'वर चल, वर चल !' त्याचे काळे डोळे हिंस्र बनले. प्रेक्षकाचा सामुदायिक थरकाप.

'ऊठ !'

लोकांनाच धाप लागली.

तो स्टेजवर ताठ आडवा झोपलेला तरुण हळूहळू जमिनीला समांतर असा वर जाऊ लागला. प्रथम हळूहळू पण नंतर स्थिर आणि अचूक वेगानं.

'आणखी वर !' कलाकाराचा बुलंद आवाज. तो तरुण स्टेजपासून जवळजवळ दोन फूट वर गेला होता.

ही काही तरी युक्ती असणार, अशी लोकांना खात्री होती; पण तरीही ते आ-वासून बघू लागले. कुठल्याही आधाराशिवाय तो तरुण इसम अधांतरी लोंबकळल्यासारखा दिसत होता.

नंतर लोकांचं लक्ष एकदम दुसरीकडे वळलं. कलाकारानं एक हात छातीशी नेला होता. तो वेदनेनं विव्हळला आणि पायातलं त्राण जाऊन स्टेजवर कोसळला.

'डॉक्टर, डॉक्टर !' असा प्रेक्षकांत पुकारा झाला. थोड्या वेळापूर्वी जाहिरात करणारा पट्ट्यापट्ट्याच्या सुटातला माणूस त्वरेनं स्टेजवर गेला. तिथल्या निश्चल आकृतीच्या छातीवर त्यानं कान टेकला.

नंतर त्यानं कलाकाराची नाडी बघितली आणि डोकं हलवून तो उभा राहिला. कोणी तरी व्हिस्कीची बाटली त्याच्यापुढे केली; पण त्यानं खांदे नुसतेच उडवले.

अचानक एका बाईची किंचाळी सर्वांना ऐकू आली.

प्रत्येकानं तिच्याकडे वळून पाहिलं; नंतर ती जिकडे बघत होती त्या दिशेला नजर वळवली.

आणि किंचाळ्या वाढू लागल्या--कारण कलाकारानं ज्या तरुणाला भारून टाकलं होत तो अजूनही वर चालला होता हृदयविकाराच्या झटक्यानं कलाकार कोसळला, तरीही त्याची गती थांबली नाही. आता तो जवळजवळ सात फूट वर तरंगत होता. स्टेजपासूनचं हे अंतर अव्याहत वाढतच चाललं. कलाकाराच्या मृत्यूनंतरही त्याची अखेरची आज्ञा तो तरुण पाळत होता.

लोकांना ओरडून जमवणाऱ्या त्या माणसानं स्टेजवर जोरजोरात उड्या मारून तरंगणाऱ्या तरुणाला खाली खेचायचा प्रयत्न सुरू केला; पण त्याच्या कमी उंचीमुळं तो सफल होत नव्हता. जेमतेम त्याची बोटं 'उडणाऱ्या' तरुणाला लागली आणि तो धपकन् खाली पडला !

एखादया अदृश्य चलकप्पीनं वर उचलावं त्याप्रमाणे आडवी आकृती वर जात राहिली.

बायका वेड्यासारख्या किंचाळत होत्या; पुरुषही आरडाओरडी करत होते; पण काय करावं हे कोणालाच कळत नव्हतं. स्टेजवरचा जाड इसम भयव्याकुल होऊन वर बघत होता. त्यानं कलाकाराच्या शवाकडे एक तीव्र कटाक्ष टाकला.

'फ्रँक, खाली ये ! खाली ये !' लोक ओरडू लागले. 'फ्रँक ! जागा हो, थांब, थांब ! खाली ये, फ्रँक !'

पण फ्रँक आता ऐकण्याच्या स्थितीत नव्हता. तो जवळजवळ सर्वांत उंच झाडाइतका वर गेला होता. त्याला अटकाव करायला डोक्यावर छत नव्हतंच.

ऑक्टोबरच्या शीतल चंद्रप्रकाशात तो आकाशाच्या रोखान ठराविक गतीनं जात होता.

गर्दीतल्या कित्येकांनी भयानक घाबरल्यामुळे चेहरे झाकून घेतले आणि माना वळवल्या.

अजूनही जे लोक वर बघण्याचं धाडस करत होते त्यांना आता आकाशात एक लहानसा ठिपका फक्त दिसत होता. तो चंद्राच्या दिशेला सरकत होता.

नंतर 'तो' पूर्णपणे दिसेनासा झाला ! □

(मूळ लेखक : जोसेफ ब्रेनन)

चित्रपट । सदानंद बोरसे

# झाकोळ

## काही टवके उडालेला इंद्रधनुषी लोलक

सध्या पुण्याची 'अिये मराठीचिये नगरी' झाली आहे एखाद्या आठवड्याच्या फरकाने येऊन धडकत पुण्यात सध्या 'तिखट मिरची घाटावरची', 'पैज', 'सवत', 'दरोडेखोर' आणि 'झाकोळ' असे पाच मराठी चित्रपट सुरू आहेत; तर 'सावज' आणि 'ह्योच नवरा पाहिजे' हे दोन येऊ घातले आहेत.

या सगळ्याच 'माझा मऱ्हाटाचि बोल'-पटामध्ये सर्वाधिक उत्कंठा होती ती झाकोळबद्दल. अभिनयाचे क्षेत्र सांभाळून डॉ. श्रीराम लागू प्रथमच दिग्दर्शनाच्या (त्याबरोबरच पटकथा व संवादाच्या) क्षेत्रात या चित्रपटाद्वारे उतरले आहेत. चित्रपटाची निर्मितीही डॉक्टरांच्या 'रूपवेध' या स्वतःच्या संस्थेच्या बॅनरखाली आहे.

चित्रपट सुरू झाला.

पडद्यावर एक मस्त टुमदार बंगला. त्याच्याबाहेर पोर्चमध्ये एक फिकट हिरवी अँबॅसॅडर. बंगल्यातून एका छोट्या पोरीचा आवाज, 'ए आई, ओ बाबा, चला ना लवकर !' मग काही वेळ एका पुरुषी आणि एका बायकी हास्यांचा आवाज. पाठोपाठ बाळ (डॉ. श्रीराम लागू), त्याची पत्नी चित्रा (तनुजा) आणि छोटी मुलगी सोना (बेबी उर्मिला) बंगल्यातून बाहेर पडले. (हे 'हम दो-हमारी एक' असे छोटे कुटुंब-सुखी कुटुंब.) मग (माधुरी पुरंदरेच्या आवाजातील 'झेलिले तुला, फुला, झेलिले तुलाच मी' हे पु. शि. रेग्यांचे गीत चालू असताना) हे तिघेजण पोहायला जातात, सहलीला वगैरे जातात, मध्येच एकदा सुनील गावस्करबरोबर क्रिकेट वगैरे खेळतात, एका छोट्याशा गावात एक देवीचा गोंधळ कम दारुड्याचे नाटक पाहतात, मग घरी 'बाळ

व चित्राचे सोनावर आणि एकमेकावरही खूप, खूऽप म्हणजे अगदी खूऽऽऽप प्रेम आहे,' असे ठासून सांगणारे काही संवाद आणि इंदिरा संतांची एक कविता होते आणि—

अचानक चित्राच्या ओटीपोटात प्रचंड कळ आल्याने ती चेहरा प्रचंड वेडावाकडा करीत पडते. या क्षणापासून आतापर्यंत आलेला आणि अंगभर पसरत चाललेला कंटाळा धाडकन बाजूला फेकत मी सावरून बसलो आणि थोड्या-फार फरकाने 'झाकोळ'ने आपली पकड जवळजवळ शेवट-पर्यंत कायम ठेवली.

बाळ कारखानदार असल्याने उत्तम साप-त्तिक स्थिती, आयुष्याचा पुरेपूर आनंद घेण्यासाठी आवश्यक तितकी रसिकता आणि असे भरभरून सुख देणाऱ्या जीवनाच्या रेशमातून विनासायास सरकणाऱ्या काळ्या-पाढऱ्या मण्यांचा प्रवास एकदम एका निर-गाठीत अडकतो. चित्राला कॅन्सर झालेला असल्याने ती फारच थोड्या दिवसाची सोबती असल्याचे कळल्यानंतर एक उदास सावट ('झाकोळ' हे सावटचेच सौम्य रूप.) या सुखी संसारावर पसरते. आपले मरण अटळ आहे, हे ओळखून चित्रा आपल्यानतर आपल्या धाकट्या बहिणीचे—उमाचे (सरला येवलेकर) लग्न बाळशी व्हावे असे प्रयत्न करायला लागते. ती उमाला आपल्या घरी बोलावून घेते. नंतर उमाला बाळपासून दिवस जाणे, त्यानंतरचे चित्राचे अकांडताडव, चित्राचा मृत्यू, त्याबद्दलची अपराधी जाणीव मनात ठेवल्याने बाळचे कुढणे या घटनामधून हे सावट अधिकाधिक गडद होऊ लागते. छोट्या सोनालाही ही काळी छाया ग्रासायला लागते आणि सबंध संसाराचे चित्रच उध्वस्त होण्याची वेळ आली असतांना एक दिवस अचानक गैरसमजाचे धके वितळून जाऊन सुखाचे सोनेरी वगैरे सूर्यकिरण, इकडे तिकडे चोहीकडे आनंदी आनंद गडे आणि इत्यादी इत्यादी.

तर अशी ही डी. एस्. सुलतानियांची कथा. 'चित्राने आत्महत्या केली आणि या आत्महत्येस आपण व उमा जबाबदार आहोत, पर्यायाने आपण खुनी आहोत,' अशी घट्ट समजूत मनात वागवणारा बाळ एक दिवस टुंबळ नशा करून आला असताना उमाने सांगितलेल्या एका फुटकळ स्पष्टीकरणावर विश्वास ठेवतो हा अल्लाउद्दीनच्या जादूच्या पोतडीतून काढलेला गोड शेवट वगळता बाळ, चित्रा आणि उमा यांच्यातील जुळणारे, निखळणारे, साधणारे, ताणणारे, जोडणारे, तुटणारे, हेलकावणारे, थरथरणारे धागे कथेत फार सुदर रेखाटले आहेत. विशेषत: नवऱ्यावर निरतिशय प्रेम करणारी, स्वत:चे मरण दिसत असताना प्रयत्नपूर्वक त्याच्यात व उमामध्ये जवळीक निर्माण करण्यासाठी धडपडणारी, उमाशी लग्न करण्याच्या कल्प-नेनेही बाळ भडकला आहे—हे पाहताच सुखावणारी, प्रत्यक्षात बाळ व उमामध्ये प्रेम निर्माण झालेले पाहताच अस्वस्थ होणारी, उमाला दिवस गेले आहेत हे कळल्यानंतर ज्वालामुखीच्या स्फोटाप्रमाणे भडकणारी आणि तरीही बाळच्या कुशीत शिरून 'मला मरायचं नाहीये' म्हणून आक्रोश करणारी चित्रा विलक्षण प्रभावी बनली आहे! ती नवऱ्यावर प्रेम करते; पण या प्रेमात (निदान हयात असताना) प्रत्यक्षात कोणी वाटेकरी बनतंय, हे सहन करण्याइतकी उदार हृदयी नाही; म्हणूनच ती आकाशात पंख लावून फिरणारी परी वा देवी वाटत नाही; तर मातीच्या पायाची माणूस राहते. पत्नीच्या प्रेमात गुंतलेला पण तरीही उमाच्या व्यक्तित्वात अडकत जाणारा बाळ, थोरली बहीण आणि भावी नवरा यांच्यात हिंदकळ-णारी उमा, साऱ्यांच्याच बाबतीत हे माणूस-पण खरे आहे आणि म्हणूनच ही माणसे फक्त काळी वा पांढरी नाहीत, त्यांच्यात निरनिराळ्या रंगांच्या छटा आहेत आणि त्यांच्यातील बंधांची गुंतागुंत त्या छटांनी अधिकच नाजूक, अधिकच कुसरदार बनवली आहे. सुरुवातीची आधी उल्लेखलेली काही कंटाळवाणी मिनिटे सोडल्यास (आणि कथे-चाच काहीसा दोषपूर्ण शेवट वगळल्यास) . डॉ. श्रीराम लागूंनी दिग्दर्शक, पटकथाकार आणि संवादकार म्हणून योग्य न्याय दिला आहे. विशेषत: चित्राच्या मृत्यूनंतर बाळमध्ये पडलेला फरक दाखविण्यासाठी गुंफलेले प्रसंग फारच वेधक बनले आहेत. उदा. चित्रा-बरोबर एकदा ट्रिपला गेल्याचा प्रसंग—एका प्रचंड डेरेदार वृक्षाच्या थंड सावलीत बाळ आणि चित्रा पहुडलेले. छोटी सोना एक कच्चे सीताफळ घेऊन येते आणि बाळला विचारते, 'बाबा, याला इंग्रजीत काय म्हणतात हो?' बाळ उत्तर देतो, 'काय म्हणतात बरं? आपण घरी गेल्यावर पाहू हं.' चित्राच्या मृत्यू-नंतर—तेच प्रचंड डेरेदार झाड, तशीच थंड सावली; पण चित्राऐवजी उमा आणि बाळही अत्यंत विमनस्क. छोटी सोना एक सीताफळ घेऊन येते आणि बाळला म्हणते, 'बाबा, हे बघा, मला कस्टर्ड ॲपल सापडलं.' बाळ ते घेऊन न पाहताच म्हणतो, 'छी, कुजकं आहे हे!' आणि सीताफळ फेकून देऊन एकटाच रणरणत्या उन्हात चालत जातो. बाळ आणि उमा याची मने साधली जात असताना, चित्रा हॉस्पिटलमध्ये मरण-घटका मोजत असताना त्याचे एकत्र येणे, त्या वेळची कुमार गंधर्वांची मैफील आणि त्यातही 'आज अचानक गाठ पडे' किंवा चित्राच्या मृत्यूनंतर बाळ आणि उमा शोभा गुर्टूंच्या मैफिलीला गेलेले. बाईंनी 'बोलो पिया, कब आओगे' सुरू केल्यानंतर त्यात रंगलेली उमा, मध्येच उठून जाणारा बाळ आणि उमाच्या एकटेपणाला अधिकच एकटे बनवणारे ते आर्त शब्द! (या गाण्याला साथीसाठी केलेला सारंगीचा वापर, नंतर बाळची वाट पाहात रात्री जागवणाऱ्या उमाच्या मनात घोळणारे तेच सारंगीचे सूर ही आर्तता अधिकच वाढवतात.) या संगी-ताच्या मैफिली हीही अशा प्रसंगाची उत्तम उदाहरणे. जवळजवळ संपूर्ण चित्रपटात अत्यंत सुंदर हाताळणी केली असताना काही प्रसंगीच लाबण लावणे वा डायरेक्शनचे खिळे ठोकणे असे उद्योग डॉ. लागूंनी का केले न कळे. सुरुवातीला उल्लेख केलेले देवीचा गोंधळ कम दारुड्याचे नाटक हा एक असा पीळप्रसंग. या प्रसंगाला विनोदी प्रसंग म्हणणे हीच विनोदाची मोठी शोकांतिका आहे. त्यातून सुमारे साडेतीन ते चार मिनिटे चालणाऱ्या या प्रसंगात निम्मा वेळ अत्यंत कृत्रिम हसणे पाहण्यास आणि ऐकण्यास मिळतो. बाळ दारू पिऊन झिंगलेला असताना 'आपण - लगाम घातलेल्या घोड्याप्रमाणे पळतोय आणि प्रथम चित्रा, मग उमा आपल्याला चाबकाचे फटके मारत आहे' असा त्याला झालेला भास आणि चित्राला कॅन्सर झाल्याचे कळताच चित्राचा चेहरा कुरतडणारा खेकडा असे प्रतीक, हे अनुक्रमे

जरा जास्तच मनोविश्लेषण आणि अत्यंत ओबडधोबड होत होते. या दोन्ही प्रसंगी बाळचा मुद्राभिनय पुरेसा बोलका आणि निःसंशय त्या दृश्यापेक्षा वा चिन्हापेक्षा अधिक प्रभावी होता.

'झाकोळ' मध्ये सर्वांत प्रभाव पाडते तनुजा. अतिशय गुंतागुंतीची चित्राची व्यक्तिरेखा तनुजाच्या वाटयाला आली आणि तिनेही ती जीव ओतून संस्मरणीय बनवली. मराठीपुरता तरी या वर्षीची सर्वोत्कृष्ट अभिनेत्री कोण हा प्रश्न तनुजाने सोडवून टाकलेला दिसतोय. बाकी डॉ. श्रीराम लागू, सरला येवलेकर आणि बेबी उर्मिला या प्रमुख कलाकारांची कामगिरीही उत्तम.

गोविंद निहलानींचे छायाचित्रण हे 'झाकोळ' च्या अत्यंत प्रमुख वैशिष्टयांपैकी एक. इतक्या उच्च दर्जाचे छायाचित्रण मराठीत अभावाने आणि हिंदीतही क्वचितच पाहण्यास मिळते. बहुतेक सगळयाच प्रसंगांमध्ये स्थळांची केलेली निवड, त्या त्या प्रसंगी घेतलेली प्रकाशयोजना, रंगसंगती यांचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतील; तरीही काही प्रसंगांचा उल्लेख करायलाच हवा !

(१) आधी सांगितलेला ट्रिपचा प्रसंग. त्या प्रसंगात संपूर्ण पडदा भरून आणि भारून टाकणारा गर्दगार कंच हिरव्या झाडाचा डेरा म्हणजे नुसत्या दर्शनानेच डोळे निववणारे निसर्गचित्रच होते. (२) उमाला दिवस गेल्याची बातमी कळल्यानंतर त्याच्यावर काय उपाय करावयाचा, यावर बाळ आणि उमा बोलत असतात. तोही प्रसंग असाच. संध्याकाळची कातरवेळ. काहीसे खिन्न शांत वातावरण. उदास धूसर तांबूस प्रकाशाने विटलेले आभाळ. या सगळयाचाच गंभीरपणा वाढविणारे वेडेवाकडे वाढलेले एक झाड-एकटे, अगदी निष्पर्ण, सुकलेले नाही, अगदी फुललेले नाही–जणू उमाच्या शरीरातील अर्धवट जीव आणि त्याच्याच अस्तित्वाच्या साक्षीने त्याच्याबद्दल चर्चा करणारे बाळ आणि उमा. (३) कुमार गंधर्वांच्या मैफलीहून बाळ व उमा परतत असतानाचा प्रसंग. 'आज अचानक गाठ पडे' या रेंगाळणाऱ्या सुरांतील भलती वेळ, भलता मेळ, बरोबर उभे करणारी धुकाळ पावसाळी हवा, अस्पष्ट चमकणारे गाडीचे दिवे, आहे रे–नाही रे असा प्रकाश.

या तीन प्रसंगांप्रमाणेच किती तरी प्रसंग सांगता येतील. या सगळयांतील चित्रदर्शीपणा आणि विशेषणे व भाववाचक नामे नेमकी नजरेसमोर साकार करण्याचे काम गोविंद निहलानींचा कॅमेरा करतो. मराठीपुरता सर्वोत्कृष्ट छायाचित्रकाराचाही प्रश्न 'झाकोळ' मधून सुटला आहे.

झाकोळचे संगीतकार आहेत भास्कर चंदावरकर. आधी उल्लेख केलेला सारंगीचा वापर वा तशाच आणखी काही जागा वगळता ही बाजू फारशी भक्कम नाही. चित्रपटाच्या शेवटी एक रहस्यमय वगैरे वातावरण निर्माण करण्यासाठी जे 'ढँटणॅण्' किंवा 'टा टा ट्रूं डॅ ऽ ऽ' संगीत दिले आहे त्या वेळी आपणच एक 'आ ऽ ऽ ऽ ऽ' अशी किंकाळी फोडावी म्हणजे तरी हे थांबेल असे बरेचदा वाटून गेले.

पती-पत्नी-धाकटी मेहुणी असाच त्रिकोण घेऊन त्यावर एक अत्यंत सुमार आणि उथळ चित्रपट 'धाकटी मेहुणी' या नावाने येऊन गेला. त्या पार्श्वभूमीवर त्याच त्रिकोणाचे थोडेसेच टवके उडालेल्या लोलकात रूपांतर करणारा 'झाकोळ' डॉ. श्रीराम लागूंबद्दल म्हणजे दिग्दर्शक डॉ. श्रीराम लागूंबद्दल आम्हाला खूपच आशा करायला लावणारा आहे, जरी 'झाकोळ लागूंचा सिनेमा म्हणून त्याच्याकडून काही वेगळया अपेक्षा ठेवू नका !' असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले असले तरीही ! □

---

चित्रपटाबाहेर

## एका महिन्यात अठ्याण्णव पौंड !

---

तुम्ही फक्त तिच्या खांद्याच्यावर पाहिलेत, तर ती अतिशय गोड वाटेल; पण त्या गोड चेहऱ्याखाली मात्र एक भले बुलंद पिंप ठेवल्याचा भास होतो. या आडव्या–तिडव्या पसरलेल्या अजस्र देहाच्या बाबतीत एक टुणटुणच काय ती तिला खुन्नस देऊ शकत होती. 'प्रीती गांगुली' हे नाव वाचल्यानंतर सबंध पडदा आपल्या भव्य शरीराने व्यापून टाकत, अजागळ हालचालींनी विनोद निर्माण करणारी नटी असेच चित्र डोळयांपुढे येते ना ? पण परवाच 'थोडीसी बेवफाई' पाहिला आणि संपूर्ण चित्रपटात जेव्हा जेव्हा प्रीती पडद्यावर असे तेव्हा तेव्हा मी वारंवार स्वतःला चिमटा काढत होतो, डोळे चोळून आणि फाड–फाडून बघत होतो. अगदी 'कॅमेऱ्याची करामत' म्हटली तरीही प्रीती गांगुली आणि इतकी कमी जाड, खरे म्हणजे सडपातळच. या परस्परविरोधाचा छडा लावायचे ठरवले आणि या रहस्याचा शोध लागला–ब्रीच कँडी हॉस्पिटलचे डॉ. आनंद नाथवानी.

चित्रपटात विनोद म्हणून पडद्यावरील प्रीतीची जाडी पाहणे प्रेक्षकाच्या दृष्टीने ठीक असले तरी प्रीतीला स्वतःच्या जीवनात मात्र या जाडीचा प्रचंड त्रास व्हायचा. रस्त्याने हिंडायची चोरी, कोणाकडे भेटीला जायची लाज. स्वतःच्या सिनेमाला जायची सुद्धा मारामार ! कारण आपण सीटमध्ये मावू की नाही ही भीती. अखेर रणजित चौधरी (हां, तोच–खट्टामीठा, बातोंबातों मे आणि खूबसूरतमधला) तिच्या पाठीशीच लागला. त्याने तिची समजूत पटवली, 'तू जाड राहिल्यानं वा बारीक झाल्यानं आपल्या 'relation' मध्ये काही फरक पडणार आहे, असं नाही; पण आयुष्य अधिक enjoy करण्यासाठी, तुझ्या स्वतःसाठीच तू बारीक होणं आवश्यक आहे.'

प्रीतीने ते मानले, ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये डॉ. नाथवानींच्या देखरेखीखाली एक महिना घालवला आणि एक महिन्यात अठ्याण्णव पौंड वजन उतरवून सडपातळ, अधिक सुंदर प्रीती गांगुली हॉस्पिटलमधून बाहेर पडली.

